इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक - ७० ■ वर्ष - ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव



भिलवडी-औदुंबर दत्त मंदिरात कृष्णेचे पाणी शिरल्याने मंदिर परिसर जलमय झाला आहे. (छाया.- घन:शाम मोरे)

शुक्रवार,ता. १० जुलै २०२६ | निज ज्येष्ठ कृ.१० | www.emahasatta.com | E-mail : mahasatta@gmail.com | पाने १२+४=१६ | किंमत ₹ ५.००

## मराठवाड्याला भूकंपाचे धक्के

■ नांदेड,ता.९ -

राज्याच्या मराठवाडा विभागातील नांदेड, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यांमध्ये गुरुवारी मध्यरात्रीनंतर भूकंपाचे सलग ४ धक्के जाणवले. रात्री १.३७ ते ३.२३ या कालावधीत हे धक्के बसले असून, रिक्टर स्केलवर त्यांची तीव्रता ३.६ ते ४.६ दरम्यान नोंदविण्यात आली.

सुदैवाने या भूकंपामुळे कोणतीही जीवित किंवा वित्तहानी (पान २ वर)



## कर्नाटकात अपघात ; ७ ठार , २ जखमी

■ यल्लापूर,ता.९-

उत्तर कन्नड जिल्ह्यातील यल्लापूर तालुक्यात अरबैल घाटाजवळ गुरुवारी पहाटे मल्टी-युटिलिटी वाहन आणि ट्रक यांच्यात झालेल्या भीषण अपघातात धारवाड येथील ७ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर (पान २ वर)

## पीओकेमध्ये असंतोष तीव्र

■ इस्लामाबाद,ता.९-

पाकिस्तानच्या ताब्यातील काश्मीरमध्ये (पीओके) तणाव सातत्याने वाढत आहे. जम्मू-काश्मीर संयुक्त अवामी ॲक्शन कमिटी (जेएएसी)ने पाकिस्तान सरकारला ४८ तासांचा अल्टिमेटम दिला आहे.जेएएसी ने इशारा दिला आहे की त्यांच्या ३८ मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास सरकारला तीव्र (पान २ वर)

### जिल्ह्यातील प्रमुख धरणांचा पाणीसाठा

| धरण | क्षमता (टीएमसी) | साठा (टीएमसी) |
|---|---|---|
| कोयना | १०५.२५ | ४९.७५ |
| राधानगरी | ८.३६ | ०४.९७ |
| तुळशी | ३.४७ | ०१.९२ |
| वारणा | ३४.४० | १९.८६ |
| काळम्मावाडी | २५.३९ | ०७.३२ |
| कासारी | २.७७ | ०१.५१ |
| कडवी | २.५२ | ०१.३७ |
| कुंभी | २.७२ | ०१.३५ |
| पाटगाव | ३.७२ | ०१.७३ |
| चिकोत्रा | १.५२ | ०.५९ |
| चित्री | १.८९ | ०१.०१ |
| जंगमहट्टी | १.२२ | ०.७७ |
| घटप्रभा | १.५४ | १.५६ |
| जांबरे | ०.८२ | ०.८२ |
| आंबेआहोळ | १.२४ | ०.९१ |
| सर्फनाला | ०.६७ | ०.५८ |
| धामणी | १.२९ | ०१.२९ |

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १४३९०० रु. | २२७००० रु. |

अंडी ७२० रुपये शेकडा

### हास्यतुषार -सुरेंद्र दास



कधी निवडणुका तर कधी बी एल ओ , कधी जनगणना तर कधी प्राणी गणना , अरे त्या शिक्षकांनी शाळेत शिकवायचं तरी कधी..? या सगळ्या विरोधातच मोर्चा काढला होता त्यांनी..!

हिवाळी अधिवेशनात

## समान नागरी कायद्याचा मसूदा आणणार-मुख्यमंत्री

■ मुंबई,ता.९-

**नागपूर येथे होणाऱ्या आगामी हिवाळी अधिवेशनामध्ये समान नागरी कायद्याचे विधेयक आणण्यासाठी प्रयत्न करू, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, गुरुवारी विधानसभेत दिली. या कायद्याचा मसूदा तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीची माहितीही फडणवीस यांनी दिली.**



भारताच्या संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून राज्यात समान नागरी कायदा (युसीसी) लागू करण्याच्या दिशेने राज्य सरकारने अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये या कायद्यासाठी समिती स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय तज्ज्ञ समिती गठीत करण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत केली. या समितीने पुढील सहा महिन्यांत आपला अहवाल सादर करणे अपेक्षित असून, (पान २ वर)

# पावसाचा जोर कमी

## पंचगंगेचे पाणी ओसरले : ४२ बंधारे पाण्याखाली

■ कोल्हापूर,ता.९(प्रतिनिधी)-

**गेल्या आठवडाभर धुवॉंधार सुरु असलेल्या पावसाचा जोर गेल्या दोन दिवसापासून काहीसा मंदावला आहे. दमदार पावसामुळे नद्यांच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली होती. पंचगंगा नदीची पाणीपातळी गुरुवारी सकाळी सात वाजता ३७.१ फुटापर्यंत पोहोचली होती. मात्र पावसाने उघडीप दिल्यामुळे नद्याच्या पाणीपातळीत उतार होऊ लागल्याने पंचगंगा नदीची पातळी गुरुवारी सायंकाळी जवळजवळ अर्धा फुटांनी कमी होऊन ती ३६.७ फुटापर्यंत खाली गेली.**



पावसाने उघडीप दिल्यानंतर रोप लावणीच्या कामाला वेग आला आहे.

सततच्या दमदार पावसामुळे जुलैच्या पहिल्या आठवड्यातच जिल्ह्यातील नद्यांच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होऊन ६१ बंधारे पाण्याखाली गेले होते. पण गेल्या दोन दिवसात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पाण्याखाली गेलेल्या बंधाऱ्यावरुन पाणी हळूहळू कमी होऊ लागल्याने गुरुवारी सायंकाळी ४२ बंधारे पाण्याखाली राहीलेत. पावसाची अशीच उघडीप राहिल्यास पंचगंगा नदीसह जिल्हयातील बरेचशा बंधाऱ्यावरील पाणी कमी होईल व विस्कळीत झालेले जनजीवन सुरळीत होण्यास मदत होईल. मंगळवारपर्यंत पावसाचा जोर वाढता राहिल्याने नदीकाठावरील नागरिक महापुराच्या भीतीने भयभीत झाले होते. पंचगंगेच्या वाढत्या पाणीपातळीमुळे नदीकाठावरील लोकांना २०१९ व २०२१ च्या महापुराची आठवण येऊन धडकी (पान २ वर)

### एसटीचे सहा लाखाचे उत्पन्न बुडाले

जिल्ह्यात निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे महाराष्ट राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कोलहापूर विभागाला मोठा फटका बसला असून जवळपास ६ लाखाचे उत्पन्न बुडाले आहे. जिल्ह्यात १६ हजार ७६२ किलोमिटरच्या ३०० फेऱ्या रद्द झाल्या आहेत. रस्ते तसेच पुलावरील आलेले पाणी कमी होताच पुन्हा एसटीच्या फेऱ्या सुरु करण्याचे नियोजन असल्याचे विभाग नियंत्रक वृशाली भोसले यांनी सांगितले.

## पीडित मुलीचा आत्महत्त्येचा प्रयत्न

### उपचारासाठी इस्पितळात दाखल; प्रकृती स्थीर

■इचलकरंजी,ता.९-

**नग्न व्हिडीओ काढल्याचा धाक दाखवत सामुहिक अत्याचार आणि विनयभंग केल्याच्या प्रकरणातील पीडित अल्पवयीन मुलीने झोपेच्या गोळ्या खाल्ल्याने तिला उपचारासाठी इस्पितळात दाखल करण्यात आले आहे. संबंधित प्रकरणाचा मानसिक त्रास आणि झोप येत नसल्याच्या कारणातून तिने या गोळ्या घेतल्याचे पोलीस निरीक्षक शरद मेमाणे यांनी सांगितले. तिच्यावर कोणीही कोणत्याही प्रकारचा दबाव टाकला नसल्याचेही त्यांनी सांगितले. खबरदारीचा उपाय म्हणून संशयीत राहत असलेल्या परिसरात पोलिसांची गस्त सुरु करण्यात आली आहे.**





चार दिवसांपूर्वी एका अल्पवयीन शाळकरी मुलीला तिचे नग्न व्हिडीओ काढल्याचा धाक दाखवत तिच्यावर सामुहिक अत्याचार करत तिचा शारिरीक, मानसिक छळ केल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात ४ अल्पवयीन मुलांसह सात जणांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. त्यापैकी अमन आदम शेख (वय २०), अल्ताफ बशीर नायकवडे (२१), अनिकेत संजय भोरे (२३) हे तिघे सध्या तुरुंगात असून उर्वरीत अल्पवयीन मुलांना बालसुधारगृहात पाठविण्यात आले आहे.

या घटनेनंतर पिडीत मुलीला मानसिक त्रास (पान २ वर)

## तामगावच्या फार्महाऊसवर पोलिसांची धाड

### मद्यपार्टीसह अश्लील नृत्य; पाच महिलांसह १४ जणांवर गुन्हा

■ कोल्हापूर,ता.९(प्रतिनिधी)-

**करवीर तालुक्यातील तामगाव येथील एका फार्महाऊसमध्ये बेकायदेशीररीत्या मद्यपान, मोठ्या आवाजात साऊंड सिस्टीमवर गाणी आणि अश्लील नृत्य सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा (एलसीबी) आणि गोकुळ शिरगाव पोलिसांनी संयुक्त धाड टाकून पाच महिलांसह १४ जणांना ताब्यात घेतले. बुधवारी रात्री साडेदहाच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली असून, याप्रकरणी गोकुळ शिरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फार्महाऊसचे मालक धनराज भोसले (रा. नागाळा पार्क) आणि व्यवस्थापक सचिन जयसिंग कांबळे (रा. हेर्ले) यांनी कोणतीही परवानगी न घेता फार्महाऊस अशा प्रकारच्या (पान २ वर)

## मालमत्तेच्या वादातून वृध्देला जिवंत जाळले

### तपासातून जळीत प्रकरणाचा उलगडा ; नातजावई जेरबंद

■ सांगली,ता.९(प्रतिनिधी)-

**चोरीच्या उद्देशाने मध्यरात्रीच्या सुमारास घरात घुसून वृध्देला जिवंत जाळणारा संबंधित महिलेचा** नातजावईच असल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी राजेश दिलीप गायकवाड (वय ३०, रा. बलवडी, ता. खानापूर) याला अटक केली आहे. (पान २ वर)

## इराणच्या अणुस्थळाजवळ हल्ला

■ वॉशिंग्टन,ता.९-

**अमेरिकन सैन्याने रात्री पुन्हा इराणवर नव्या हल्ल्यांची मालिका सुरू केली आहे. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने दोन दिवसात इराणच्या सुमारे ९० लष्करी तळांसह १७० ठिकाणी क्षेपणास्त्र, ड्रोन हल्ले केले. होर्मुझ सामुद्रधुनीत जहाजांवर होणारे इराणी हल्ले रोखण्यासाठी ही कारवाई करण्यात येत आहे. दुसरीकडे,**



- ९० लष्करी तळ लक्ष्य केल्याचा अमेरिकेचा दावा
- प्रत्युत्तरात अमेरिकेच्या सैन्य तळावर हल्ले

**प्रत्युत्तर देताना इराणने अमेरिकेच्या सैन्य तळावर हल्ले केले. इराणच्या सरकारी वृत्तसंस्थाने सांगितले की, खुजेस्तान प्रांतातील अहवाज शहराच्या बाहेरील भागात झालेल्या हल्ल्यात ३ लोकांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले आहेत.**

सेंटकॉमने दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकन सैन्याने इराणमधील सुमारे ९० लष्करी तळांना लक्ष्य केले. (पान २ वर)

## कुडची-उगार पुलावर पाणी
## महाराष्ट्र-कर्नाटक आंतरराज्य मार्ग बंद

■ चिक्कोडी,ता.९ (प्रतिनिधी)-

**महाराष्ट्रातील पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे कृष्णा नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. बेळगाव जिल्ह्यातील रायबाग तालुक्यातील कुडची-उगार दरम्यान असलेल्या पुलावर मोठ्या प्रमाणात पाणी वाहत आहे. यामुळे कर्नाटक आणि महाराष्ट्र या दोन राज्यांना जोडणारा प्रमुख रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला असून आंतरराज्य वाहतूक काही प्रमाणात ठप्प झाली आहे. यावर पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून या पुलावरील वाहतूक बंद केली आहेत.** (पान २ वर)

# महापालिकेतील पाणीपुरवठा,बांधकाम विभागात सक्षम अधिकाऱ्यांची गरज

## ५२० कोटींच्या भुयारी गटार योजनेसह कोट्यवधींच्या विकासकामांबाबत प्रश्नचिन्ह

■ इचलकरंजी,ता.९-

**शहराच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंध असलेले महानगरपालिकेचा पाणीपुरवठा विभाग आणि बांधकाम विभाग हे दोन्ही अत्यंत महत्त्वाचे विभाग सध्या सक्षम, पूर्णवेळ अधिकाऱ्यांच्या अभावामुळे सक्षमपणे काम होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. या दोन्ही विभागांच्या कामकाजाचा थेट परिणाम शहराच्या विकासावर होत असून पाणीपुरवठा, रस्ते, विकासकामे, नागरी सुविधा आणि सार्वजनिक सेवांबाबत नागरिकांचा रोष दिवसेंदिवस वाढत आहे.**

महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत नगरोत्थान योजनेअंतर्गत सुमारे ५२० कोटी रुपयांचा भुयारी गटार प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्याचबरोबर बांधकाम विभागामार्फत शासनाच्या विविध योजना, नगरोत्थान योजना तसेच महानगरपालिकेच्या स्वतःच्या निधीतून लाखो-कोट्यवधी रुपयांची विविध विकासकामे शहरभर सुरू आहेत. सिमेंट कॉंक्रीट रस्ते, डांबरी रस्ते, गटारे, पेव्हर ब्लॉक, अशी अनेक विविध कामे सुरू आहेत. मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी खर्च होत असतानाही अनेक कामांच्या गुणवत्तेबाबत सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत.

> ५२० कोटी रुपयांच्या भुयारी गटार योजनेसह सर्व कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांचे स्वतंत्र तांत्रिक (थर्ड पार्टी) लेखापरीक्षण करणे, निकृष्ट दर्जाच्या कामांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणे, शहरातील सर्व रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करणे, पाणीपुरवठ्याचे शास्त्रीय आणि पारदर्शक नियोजन जाहीर करणे आवश्यक आहे.



खोदकामामुळे शहरातील रस्त्यांची झालेली प्रचंड दुरवस्था.

पाणीपुरवठा विभागाकडे केवळ भुयारी गटार योजनेची जबाबदारी नसून संपूर्ण शहराच्या पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थापनाची धुरा आहे. शहराला नियमित पाणीपुरवठा करणे, नवीन पाणीपुरवठा पाइपलाइन टाकणे, जुन्या व जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलणे, पाणी गळती तातडीने दुरुस्त करणे, जलवाहिन्यांची देखभाल-दुरुस्ती करणे, पंपिंग स्टेशन, जलकुंभ व वितरण यंत्रणेचे व्यवस्थापन करणे तसेच कृष्णा पाणीपुरवठा योजना, पंचगंगा पाणीपुरवठा योजना, कट्टीमोळ पाणीपुरवठा योजना आणि शहरातील (पान २ वर)

> बांधकाम खात्याकडून सुरू असलेले बांधकामाची तपासणी केली जाते का? संबंधित अधिकारी प्रत्यक्ष पाहणी करतात का? निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या ठेकेदारांवर दंडात्मक कारवाई होते का? पाणीपुरवठ्याच्या नियोजनाचा नियमित आढावा घेतला जातो का? याची उत्तरे अद्याप नागरिकांना मिळालेली नाहीत.



तुटलेला चेंबर दर्जाहिन पध्दतीने दुरूस्त करतानाचे छायाचित्र.

(पान १ वरून)

## भूकंपाचे धक्के

झाल्याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. प्राथमिक माहितीनुसार, पहिला धक्का रात्री १.३७ वाजता सिरलीपांगरा शिंदे गावाजवळ जाणवला. या धक्क्यामुळे नागरिकांची झोपमोड झाली आणि भीतीपोटी अनेकांनी घराबाहेर धाव घेतली. या भूकंपाचे केंद्र जमिनीखाली सुमारे १० किलोमीटर खोलीवर असल्याचे सांगण्यात आले.त्यानंतर रात्री २.१५ वाजता ककडधाबा गावाजवळ दुसरा धक्का जाणवला. त्याची तीव्रता ३.६ इतकी नोंदविण्यात आली. त्यानंतर अवघ्या दोन मिनिटांनी, २.१७ वाजता तिसरा आणि ३.२३ वाजता चौथा धक्का जाणवला. भूकंपाचे धक्के जाणवताच अनेक नागरिक घाबरून घराबाहेर पडले. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अवघ्या दोन तासांच्या आत चार वेळा भूकंपाचे धक्के जाणवले.

यापूर्वी याच वर्षी एप्रिल महिन्यात हिंगोली परिसरात ४.७ तीव्रतेचा भूकंप झाला होता. त्यावेळी पांगरा शिंदे गावातील काही घरे आणि सामुदायिक सभागृहाला तडे गेले होते. तसेच नांदेड, अर्धापूर, हदगाव, हिमायतनगर आणि परभणी परिसरातही भूकंपाचे धक्के जाणवले होते.

## कर्नाटकात अपघात; ७ ठार ,२ जखमी

जखमी झाले आहेत. यासंदर्भातील माहितीनुसार अपघातात मृत्यूमुखी पडलेले सर्वजण धारवाडचे रहिवासी असून, बुधवारी रात्री ते एमयूव्हीद्वारे धर्मस्थळ आणि इतर धार्मिक स्थळांच्या दर्शनासाठी निघाले होते. पहाटेच्या सुमारास अरबैल घाट परिसरात त्यांच्या वाहनाची ट्रकशी जोरदार धडक झाली. अपघात इतका भीषण होता की एमयूव्हीचा पूर्णपणे चुराडा झाला. यामध्ये कारमधील ७ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये वाहनचालक संजय अंगडी, बसवराज, अभिषेक ईश्वर, अक्षय, अभिषेक आणि मंजूनाथ चुलकी यांचा समावेश आहे. सातव्या मृत व्यक्तीची ओळख अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आलेली नाही.दुर्गाप्पा मडिवाळ, चन्नबसय्या संपगाव आणि सचिन हे या अपघातात गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे बोलले जाते.

## पीओकेमध्ये असंतोष तीव्र

जनआंदोलनांचा सामना करावा लागेल.सध्या २७ जुलै रोजी होणाऱ्या प्रादेशिक निवडणुकांचा मुद्दा केंद्रस्थानी आहे. ९ जूनपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर जेएएसी ने मुझफ्फराबादपर्यंत भव्य निषेध मोर्चाची घोषणा केली आहे. त्यामुळे अलीकडच्या काळातील या प्रदेशातील सर्वात मोठ्या राजकीय संघर्षांपैकी हा एक ठरू शकतो, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

पीओकेमधील सुरू असलेल्या आंदोलनांचे प्रमुख कारण म्हणजे पाकिस्तानमध्ये स्थायिक झालेल्या काश्मीरी निर्वासितांसाठी राखीव असलेल्या १२ विधानसभा जागा रद्द करण्याची मागणी. जेएएसी चा दावा आहे की या जागांमुळे इस्लामाबादला पीओकेच्या राजकारणावर अतिप्रमाणात प्रभाव राखता येतो.या वादात आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे पीओके सर्वोच्च न्यायालयाने ७ जून रोजी दिलेला निर्णय. न्यायालयाने स्पष्ट केले की या १२ राखीव जागांना घटनात्मक संरक्षण आहे आणि त्या केवळ कार्यकारी आदेशाद्वारे रद्द करता येणार नाहीत. त्यासाठी घटनादुरुस्ती आवश्यक आहे.

## समान नागरी कायद्याचा मसूदा आणणार

राज्य सरकारचा असा प्रयत्न असेल की, आगामी हिवाळी अधिवेशनातच हा कायदा दोन्ही सभागृहांच्या पटलावर आणला जावा. निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली ७ जणांची समिती स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश आर.सी. चव्हाण, मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश एस.जी. मेहेरे, राज्याचे माजी मुख्य सचिव डी.के. जैन, राज्याचे माजी महाधिवक्ता वीरेंद्र सराफ, राज्यघटनेचे अभ्यासक पद्मश्री रमेश पतंगे, शिक्षणतज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सुवर्णा रावल यांचा समावेश आहे.

## फार्महाऊसवर पोलिसांची धाड

कार्यक्रमासाठी उपलब्ध करून दिल्याचा आरोप आहे.

या प्रकरणात आसिफ निसार कुडचीकर, विनोद लक्ष्मण लोंढे, रियाज सदरू देसाई, समीर उर्फ सोमनाथ जीवन ढेरे, प्रशांत उर्फ सनी बाळासो लोंढे, बाळ अशोक धनवडे, अभिजीत मारुती शेंडे यांच्यासह पाच महिलांवरही कारवाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिल्या होत्या. त्यानुसार एलसीबीचे उपनिरीक्षक संतोष गळवे यांना तामगाव येथील डी फार्महाऊसमध्ये विनापरवाना मद्यपान सुरू असून काही महिला अश्लील नृत्य करत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती.

या माहितीच्या आधारे एलसीबी आणि गोकुळ शिरगाव पोलिसांच्या संयुक्त पथकाने छापा टाकला. कारवाईदरम्यान फार्महाऊसमध्ये मद्यपान आणि अश्लील नृत्य सुरू असल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# महापालिकेतील पाणीपुरवठा,बांधकाम विभागात सक्षम अधिकाऱ्यांची गरज

(पान १ वरून)

विविध कूपनलिकांद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्याचे नियोजन व देखरेख करणे ही सर्व महत्त्वाची कामे याच विभागाकडे आहेत. मात्र एकाच आधिकाऱ्याकडे दोन-तीन विभागाचे कार्यभार सोपवल्यामुळे कामांमध्ये अपेक्षित समन्वय, नियोजन, नियंत्रण आणि वेळेवर निर्णय होत नाहीत. त्यामुळे नागरिकांची कामे प्रलंबीत पडत आहेत.

शहरातील अनेक भागांमध्ये आजही आठवड्यातून केवळ एकदा किंवा दोनदाच पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी कायम आहेत. दुसरीकडे, ५२० कोटी रुपयांच्या भुयारी गटार योजनेच्या कामांबाबतही नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर तक्रारी होत आहेत. शहरभर करण्यात आलेल्या खोदकामानंतर अनेक ठिकाणी करण्यात आलेले पॅचवर्क निकृष्ट दर्जाचे असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. काही ठिकाणी रस्ते खचत आहेत, पावसात चिखलाचे साम्राज्य निर्माण होत आहे.

याचबरोबर बांधकाम विभागामार्फत शासनाच्या विविध योजना आणि महानगरपालिकेच्या निधीतून सुरू असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. काही सिमेंट काँक्रीट रस्ते, डांबरी रस्ते, गटारे आणि इतर विकासकामे पूर्ण झाल्यानंतर अल्पावधीतच भेगा पडणे, खड्डे निर्माण होणे, कामे निकृष्ट दर्जाची असल्याच्या तक्रारी, अपूर्ण कामे आणि दर्जाबाबत सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे सार्वजनिक निधीचा योग्य आणि दर्जेदार वापर होत आहे का, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

> **शहरात कोट्यवधीची विकास कामे होत असताना सदरची कामे योग्यरित्या होत आहेत किंवा नाही हे पहाण्याची जबाबदारी नेमकी कोणाची? सदर कामांवर आयुक्तांसह संबधित अधिकाऱ्यांनी वेळोवेळी लक्ष देऊन पहाणी करणे तसेच त्याच्या दर्जाबाबत विचारणा करणे अपेक्षित आहेत. मात्र याबाबत कोणतीच दखल घेतली जात नसल्याचे दिसते.**

नागरिकांमध्ये आता एकच प्रश्न उपस्थित केला जात आहे की, कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांवर आणि ५२० कोटी रुपयांच्या भुयारी गटार योजनेवर नेमका कोणाचा वचक आहे? कामांच्या गुणवत्तेवर अपेक्षित नियंत्रण दिसत नसल्याची भावना व्यक्त केली जात आहे. महापालिका आयुक्त, संबंधित विभाग, तांत्रिक अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी नियमित पाहणी करून कामांची गुणवत्ता सुनिश्चित करणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.



कुडची : कृष्णा नदीवर असलेला कुडची उगार दरम्यान असलेल्या पूलावर पाणी आल्याने हा मार्ग बंद झाला आहे.

## कुडची-उगार पुलावर पाणी

(पान १ वरून)

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे कृष्णा नदीने रौद्ररूप धारण केले आहे. बेळगाव जिल्ह्यातील रायबाग तालुक्यातील कुडची आणि कागवाड तालुक्यातील उगार दरम्यान असणारा हा पूल पूर्णपणे पाण्याखाली जाण्याच्या मार्गावर आहे. हा पूल कर्नाटक आणि महाराष्ट्राला जोडणारा एक अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र पूल जलमय झाल्याने दोन्ही राज्यांमधील संपर्क आता पूर्णपणे तुटला आहे.

सुरक्षेचा उपाय म्हणून प्रशासनाने पुलाच्या दोन्ही बाजूंना बॅरिकेटस लावून वाहतूक पूर्णपणे बंद केली आहे. महाराष्ट्रातून येणाऱ्या पाण्याच्या विसर्गामुळे नदीच्या पातळीत सतत वाढ होत असून परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवले जात आहे. जमखंडी-मिरज राज्य महामार्गावरील वाहतूक या पुरामुळे पूर्णपणे विस्कळीत झाली असून वाहनधारकांना लांबच्या मार्गाने प्रवास करावा लागत आहे.

# सरकारचे तीन मूलभूत मंत्र प्रत्येकाने जपावेत

### मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार

■ बेळगांव,ता.९(प्रतिनिधी)–

**जनतेने आम्हाला सत्तेवर आणले आहे; आता सरकार जनतेच्या दारापर्यंत पोहोचवणे ही आमची जबाबदारी आहे. अधिकारी जनतेमध्ये असले पाहिजेत; कार्यालयाच्या भिंतींपुरते मर्यादित राहता कामा नये. विकास, पारदर्शकता आणि शिस्त हे सरकारचे तीन मूलभूत मंत्र प्रत्येकाने जपले पाहिजेत, प्रशासनातील शिस्तीबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी दिला.**

बेळगांव सुवर्ण सौध येथे झालेल्या बेळगाव विभागीय प्रगती आढावा बैठकीत प्रशासनाची कामगिरी, जनसेवा, विकास आणि अधिकाऱ्यांची जबाबदारी यावर स्पष्ट आणि कडक संदेश देताना ते बोलत होते.

पुढे बैठकीत मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री डी.के. शिवकुमार म्हणाले, आम्ही राजकारणी पाच वर्षांतून एकदा जनतेसमोर जातो आणि जनादेश मागतो.पण अधिकाऱ्यांना दररोज जनतेच्या विश्वासाला उत्तरदायी राहावे लागते. कर्तव्य न बजावणे हे केवळ प्रशासनाचे अपयश नाही, तर तो जनतेचा विश्वासघात आहे. प्रशासनातील शिस्तीबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, जर कोणताही अधिकारी बैठकीदरम्यान मोबाईल फोनवर बोलताना आढळला, तर बैठक संपेपर्यंत त्याच्या निलंबनाचा आदेश तयार असेल. शिस्त हा प्रशासनाचा पहिला नियम आहे. जिल्हा आणि तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातच राहावे. लोकांच्या समस्या ऐकण्यासाठी अधिकाऱ्यांनी लोकांसोबत असले पाहिजे. छोट्या-छोट्या कामांसाठी लोकांना एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात फिरवण्याची संस्कृती संपुष्टात आणली पाहिजे. शक्यतोवर समस्या स्थानिक पातळीवरच सोडवल्या पाहिजेत. प्रत्येक जिल्हास्तरीय अधिकाऱ्याला त्याच्या हाताखालील कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कामांची माहिती दिली जावी, असे त्यांनी सुचवले. ते म्हणाले, कोणत्या अधिकाऱ्याने कोणत्या गावाला भेट दिली आणि कोणती समस्या सोडवली, याची नोंद दररोज अद्ययावत केली पाहिजे. शिक्षण क्षेत्रात एका नव्या परिवर्तनाची घोषणा केली. केपीएस शाळांच्या यशस्वी धर्तीवर सीएसआर शाळा विकसित केल्या जातील. ग्रामीण मुलांनाही शहरी स्तराचे शिक्षण मिळाले पाहिजे, असे ते म्हणाले.



बेळगांव:सुवर्णसौधमध्ये अधिकाऱ्यांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री डी.के.शिवकुमार.

बैठकीस मंत्री एम.बी. पाटील, सतीश जारकीहोळी, यू.टी. खादर, ईश्वर खांद्रे, विधानसभेचे प्रभारी अध्यक्ष रुद्रप्पा लमानी, शासनाच्या मुख्य सचिव डॉ. शालिनी रजनीश, माजी मंत्री लक्ष्मी हेब्बाळकर, एच.के. पाटील, तसेच विविध जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# मालमत्तेच्या वादातून वृध्देला जिवंत जाळले

(पान १ वरून)

स्थावर मालमत्तेच्या वादातून हे कृत्य घडल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज असून त्या दृष्टीकोनातून पोलिसांचा तपास सुरु आहे. कोणताही पुरावा तसेच परिसरात कोठेही सीसीटिव्ही नसताना पोलिसांनी कौशल्याने तपास केल्याने या जळीत प्रकरणाचा उलगडा झाला असल्याची माहिती पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी पत्रकारांना दिली.

घटनेची माहिती अशी, फिर्यादी विठ्ठल मारुती जाधव (रा. लेंगरेवाडी, ता.आटपाडी) यांची आई मालन जाधव (वय ८५) या शेटफळे येथे एकट्याच राहत होत्या. दि.३० जून रोजी पहाटेच्या सुमारास त्या लघुशंकेकरिता घराबाहेर जावून परत येत असताना दबा धरुन बसलेल्या संशयिताने घरात घुसून त्यांच्या अंगावर रॉकेल ओतून त्यांना पेटवून दिले. उपचार सुरु असताना मालन जाधव यांचा दि. ३ जुलै रोजी मृत्यू झाला. घटना घडल्यानंतर आटपाडी पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. परंतु परिस्थितीजन्य कोणताच पुरावा पोलिसांच्या हाती लागला नाही. तसेच त्या परिसरात सीसीटिव्ही नसल्याने चोरट्याचाही मागणीस लागणे कठीण होते. दरम्यान स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने तपासाची सूत्रे हाती घेतली.

मयत मालन जाधव यांना तीन मुले, एक मुलगी तसेच नातवंडे आणि नात सून असा परिवार होता. कुटुंबातील सदस्यांसमवेत तसेच माहेरील लोकांसमवेत मालन यांचे पटत नव्हते. त्यामुळे बऱ्याच वर्षापासून विभक्त राहून त्या उदर निर्वाह करीत होत्या. मालन यांच्या नावावर त्यांचे माहेर असलेल्या बलवडी (ता.खानापूर) येथे आणि शेटफळे गावी त्यांची शेतजमीन आहे. सदरची जमीन तिने मुलांना न देता थेट एकाच नातवाच्या म्हणजेच प्रविण जाधव याच्या नावावर केली होती. त्यामुळे कुटुंबातील सदस्य त्यांच्यावर चिडून होते. गेल्या दिड महिन्यापासून मालन या त्यांचा नातू प्रविण जाधव राहत असलेल्या घरातील एका खोलीत राहण्यास होत्या. दि. ३० जून रोजी पहाटेच्या सुमारास मयत मालन यांच्या नातीचा नवरा राजेश गायकवाड हा तिच्या घरात घुसला. त्याने त्यांना मारहाण करुन त्यांच्या अंगावरील सोने - चांदीचे दागिने जबरदस्तीने काढून घेतले. यावेळी त्यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी संशयित नातजावयाने मालन जाधव यांना पेटवून दिले.

तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी नात जावई राजेश गायकवाड यास ताब्यात घेवून चौकशी केली. त्यावेळी त्याने वृध्देला पेटवून दिल्याची कबुली दिली. दागिने देण्यास विरोध केल्याने पेटवून दिल्याचे कारण पुढे आणले जात असले तरी या कृत्यामागे स्थावर मालमत्तेचे कारण असावे असा पोलिसांना अंदाज आहे. त्यामुळे त्या दृष्टीने तपास सुरु केल्यावर जमिनवादातील आर्थिक कारणातूनच वृध्देला पेटवून दिल्याचे पोलीस तपासात पुढे आल्याचे समजते.

## अजित पवार यांना मरणोत्तर पद्मविभूषणने सन्मानित करा

■ मुंबई,ता,९–

**राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभा मुख्य प्रतोद चेतन तुपे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.**

दरम्यान स्वर्गीय अजित पवार यांच्या नावाचा पद्मविभूषण (मरणोत्तर) पुरस्कारासाठीचा शिफारस प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्यावतीने केंद्रसरकारकडे तातडीने पाठवण्यात यावा अशी विनंती या निवेदनात करण्यात आली आहे.

## पीडित मुलीचा आत्महत्त्येचा प्रयत्न

(पान १ वरून)

होत असल्याने तिच्यावर मानसोपचार तज्ञांच्या सल्ल्यानुसार औषधोपचार सुरु आहेत. परंतु, पोलीस ठाण्यातील तक्रार मागे घेण्यासाठी पिडीत मुलगी आणि तिच्या कुटुंबियांवर वारंवार दबाव टाकला जात असल्याचा आरोप होत आहे. मात्र असा कोणताही प्रकार झाला नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. गुरुवारी सकाळी पिडीत मुलीला चक्कर येणे आणि सतत गुंगीत असल्याचा त्रास होऊ लागल्यामुळे नातेवाईकांनी तिला तातडीने तिला इंदिरा गांधी रुग्णालयात दाखल केले. अतिदक्षता विभागात प्राथमिक उपचारानंतर ती शुद्धीवर आल्यानंतर मानसिक त्रासामुळे बुधवारी रात्री मानसोपचार तज्ञांनी दिलेली सर्व औषधे तिने एकाचवेळी खाल्याचे सांगितले. शिवाजीनगर पोलिसांनी तिचा जबाब घेतला असून सध्या तिची प्रकृती

# इराणच्या अणुस्थळाजवळ हल्ला

(पान १ वरून)

यामध्ये हवाई संरक्षण यंत्रणा, किनारपट्टीवरील देखरेखीसाठी वापरली जाणारी उपकरणे, क्षेपणास्त्र आणि ड्रोन साठवण केंद्रे, नौदलाशी संबंधित तळ तसेच इराणच्या समुद्रकिनारी असलेली लष्करी रसद पायाभूत सुविधा यांचा समावेश होता. अमेरिकन सैन्याचा दावा आहे की, या हल्ल्यांमुळे इराणच्या नौदल क्षमतेला मोठा फटका बसला आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या 'ट्रुथ सोशल' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर इराणवरील हल्ल्याचा व्हिडीओ आणि एक पोस्ट शेअर केली. त्यात म्हटले आहे की, स्थानिक अधिकाऱ्यांनी आता पुष्टी केली आहे की अमेरिकन हल्ल्यांमध्ये इराणच्या आग्नेयेकडील शहरातील विमानतळ आणि हवाई तळाला लक्ष्य करण्यात आले होते. या तळाचा वापर इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स एरोस्पेस फोर्सकडून केला जात असल्याचे सांगितले जाते.

दरम्यान इराणच्या वृत्तसंस्थांच्या माहितीनुसार, बंदर अब्बास आणि सीरिक येथे जोरदार स्फोट झाले. या घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे, तर दुसरी व्यक्ती गंभीर जखमी झाल्याचे वृत्त आहे. अहवालांनुसार, चाबहार आणि कोनारक येथे अमेरिकन सैन्याने हवाई हल्ले केले.

या हल्ल्यांमुळे चाबहारमधील वीजपुरवठा खंडित झाला आहे. तसेच, एका वृत्तानुसार अमेरिकन सैन्याने अक्काला येथील रेल्वे पूल उडवून दिला आहे.

**अमेरिकेच्या दबावाला झुकणार नाही**

इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अलीकडील वक्तव्यांवर प्रतिक्रिया देताना म्हटले की, इराण अशोभनीय भाषेला शब्दांनी नव्हे तर कृतीतून उत्तर देतो. ते म्हणाले, 'ट्रम्प यांची विधाने इराणी जनतेचे महानत्व, स्वाभिमान आणि दृढनिश्चय कमी करू शकत नाहीत.'त्यांनी पुढे स्पष्ट केले की, इराण आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांचे आणि सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे आणि कोणत्याही दबावाला किंवा अपमानास्पद वक्तव्यांना झुकणार नाही.

# पावसाचा जोर कमी

(पान १ वरून)

भरली होती, पण बुधवार व गुरुवारी पावसाने विश्रांती घेतल्याने नदीकाठावरील नागरिकावरील भितीचे सावट दुर होऊन नागरिक सुखावले.

**शिवारात खरीपाची लगबग**

गेल्या आठवडाभरापासून जिल्ह्यात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे काही प्रमाणात जनजीवन विस्कळित झाले असले तरी शेतीसाठी उपयुक्त पाऊस पडल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित होऊन शिवारात शेतकऱ्यांची लगबग सुरु आहे.

जुलैच्या पहिल्या आठवड्यात चांगला पाऊस झाल्यामुळे जिल्ह्यातील खरीपाच्या पेरणीला गती मिळाली आहे. भात, सोयाबीन, मका, भुईमूग, नाचणी आदि पिकांच्या लागणीला जोर आला आहे, गेल्या २-३ दिवसात शेतकरी वर्ग शिवारातच दिसत आहे. दमदार पावसामुळे शिवार हिरवाईने नटला आहे. शेतकरी आता शेतीच्या कामात व्यस्त असून खरीपाला उपयुक्त पाऊस झाल्याने पेरण्या होऊ लागल्या आहेत. तसेच शिवारासह माळरानात जनावरांसाठी चाऱ्याचीही उपलब्धता झाल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही आता सुटणार आहे.

एकूणच दुग्धव्यवसाय व इतर शेतीपूरक व्यवसायामुळे शेतकरी वर्गात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.गेल्या आठवड्यापापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतांमध्ये पुरेशे पाणी असून रोप लावणीच्या कामाला वेग आला आहे.

दमदार पावसामुळे नदी नाल्यांसह विहरीच्या पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. त्यामुळे खरीप हंगामातील पिकांना आवश्यक पावसाचे पाणी उपलब्ध झाले आहे. पावसाने पिकांसह शेतकऱ्यांच्या मनातही नवी आशा पल्लवीत झाल्या आहेत. हिरवाईने नटलेले शिवार, पाण्याने भरलेले ओढे-नाले आणि भात रोप लागणी साठी तसेच माळरानात खरीप पिकांच्या लागणीची लगबग सुरू आहे.

जिल्ह्यात गेल्या दोन दिवसापासून पावसाचा जोर काहीसा मंदावला असून बुधवारी जिल्ह्यात सरासरी २१.४९ मिमी पाऊस झाला आहे. सर्वाधिक म्हणजे ३३.९ मिमी पाऊस राधानगरी तालुक्यात झाला आहे.

|| भावपूर्ण श्रध्दांजली ||



श्री. यशवंत तुकाराम मोरे सर

आमचे मार्गदर्शक,
श्री. यशवंत तुकाराम मोरे सर
यांचे गुरुवार,
दि. ९ जुलै २०२६ रोजी
दु:खद निधन झाले. त्यांच्या
आत्म्यास चिरशांती लाभो
हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

राजीव किसनराव आवळे * डॉ. सिमोन किसनराव आवळे
अब्राहम किसनराव आवळे * राहुल राजीव आवळे

किसनराव आवळे प्रतिष्ठान

|| दुःखद निधन ||



सौ. सुशिला अशोक कलागते

श्री. अशोक गणपती कलागते यांच्या
पत्नी सौ. सुशिला अशोक कलागते
यांचे गुरूवार, दि. ९/७/२०२६ रोजी
आकस्मिक दु:खद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो
हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

बाळासो मिठारी * दिपक पुजारी * दिलीप वायचळ
बापु गोरे * सचिन माळी * कुमार माळी

* रक्षाविसर्जन : शनिवार दि. ११/७/२०२६ रोजी सकाळी ८ वा. पंचगंगा नदीतीरी आहे.

|| भावपूर्ण श्रध्दांजली ||



श्री. प्रदिप कृष्णनाथ दिक्षित

आमच्या सक्सेस कलर केम
सप्लायर्स असोसिएशनचे सभासद
श्री. प्रदिप कृष्णनाथ दिक्षित यांचे
गुरूवार, दि. ९/०७/२०२६ रोजी
दु:खद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास
चिरशांती लाभो
हिच ईश्वरचरणी प्रार्थना..

सक्सेस कलर केम सप्लायर्स असोसिएशन

सर्व सभासद * इचलकरंजी

# उत्पन्न वाढीसाठी महानगरपालिकेने प्रयत्न करणे गरजेचे

## समिती नियुक्ती करून आवश्यक धोरण ठरविण्याची गरज

इचलकरंजी,ता.९–

**इचलकरंजी महानगरपालिका आर्थिक कचाट्यात सापडली आहे असे म्हणत भुई**



**बडवत बसण्यापेक्षा उत्पन्न वाढीसाठी महापालिकेने प्रयत्न करणे गरजेचे आहे. तरच शहरातील नागरी सेवा पुरवणे सोयीचे होणार आहे.हातावर हात बांधून बसण्यापेक्षा उत्पन्न वाढीसाठी एखादी समिती नियुक्त करून त्या मार्फत उत्पन्न वाढीसाठी धोरण ठरवणे आवश्यक आहे.**

एकेकाळी पश्चिम महाराष्ट्रातील सर्वाधिक उत्पन्न असलेल्या नगरपालिकेमध्ये इचलकरंजी नगरपालिकेचा समावेश होता. कोट्यावधी रुपयांचे ठेवी विविध सहकारी बँकेमध्ये नगरपालिकेने ठेवले होते.जकात बंद झाल्यानंतर खऱ्या अर्थाने नगरपालिकेचे उत्पन्नाला खीळ बसली. जकाती पोटी मिळणाऱ्या उत्पन्ना इतकी रक्कम सहाय्यक अनुदान म्हणून देण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्यामध्ये प्रत्येक वर्षी वाढ करण्याचे ही ठरले. मात्र, त्याची अंमलबजावणी झाली नाही. सहाय्यक अनुदानावर नगरपालिकेला अवलंबून राहावे लागले. सहायक अनुदानातून मिळणाऱ्या रकमेतून कामगारांचा पगार भागवला जायचा आणि उरलेल्या रकमेतून विकासकामे केली जात असत. मात्र, प्रत्येक वेळी सहाय्यक अनुदान देताना एक कोटी – दीड कोटी अशी कात्री लावण्यात आली. त्यामुळे मे २०२५ पर्यंत महाराष्ट्र सरकारकडे ३५३ कोटी रुपये सहाय्यक अनुदान थकीत आहे. त्याच्यामध्ये पुन्हा वाढ होत गेली परंतु शासनाकडे हे थकलेले अनुदान आणण्यासाठी लोकप्रतिनिधींनी कोणतेही प्रयत्न केलेले दिसत नाहीत. सहाय्यक अनुदान न मिळाल्यामुळे महापालिकेला आर्थिक फटका मोठ्या प्रमाणात बसला आहे. थकीत रक्कम आणण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.त्याचबरोबर जीएसटी ची रक्कम ही कमी धरल्याने आधीच संकटात सापडलेल्या महानगरपालिकेला आता दिलासा देण्यासाठी शासनाने मदत करण्याची गरज आहे.

त्याचबरोबर महानगरपालिकेकडून उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.त्यासाठी तज्ञांची एक समिती नियुक्त करून कशातून उत्पन्न वाढवता येईल.याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.महानगरपालिकेला घरफाळा वाढ करण्या व्यतिरिक्त उत्पन्नाचे दुसरे साधन दिसत नाही. मात्र, घरफळा न वाढवता अनेक माध्यमातून उत्पन्न वाढविता येते याचा सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे. आपल्याकडे आर्थिक तरतूद नाही,निधी नाही असे म्हणत भुई बडवत बसण्यापेक्षा त्यासाठी पदाधिकाऱ्यांनी व अधिकाऱ्यांनी उत्पन्न वाढीचा सखोल अभ्यास केला पाहिजे. तरच या आर्थिक संकटातून उभारी घेता येईल. नागरिकांना मूलभूत सुविधा देता येतील आणि शहर पुन्हा एकदा वेगाने यंत्रमागाच्या चाकाप्रमाणे धावू लागेल.

**प्रशासनाने काटकसरीचे धोरण राबविण्याबरोबर पाणी चोरी,पाणी गळती थांबवावी तसेच अनावश्यक खर्च टाळावा असे धोरण राबवावे.**

**उत्तम वाढीचे मार्ग**

- **बाहेर गावाहून येणाऱ्या मालवाहू गाड्यावर कर लावणे.**
- **महापालिकेच्या मोकळ्या जागा विकसीत करणे.**
- **बंद पडलेल्या शाळा आणि इमारती कार्यक्रम कधी न होणारे मंगल कार्यालय दुरूस्ती करुन भाडेतत्वावर देणे.**
- **विविध गाळ्यांचे फेर लिलाव करुन उत्पन्न वाढविणे.**



पावसाने उसंत घेतली असली तरी पंचगंगा नदीची पातळीत संत गतीने वाढतच आहे. नदी घाट परिसरातील विविध मंदिरामध्ये शिरलेले पाणी. (छाया : सारंग दास)

# पावसाची उसंत; पाणी पातळीत वाढच

### २४ तासात १० इंचांनी वाढ

इचलकरंजी,ता.९–

**आठवडाभरापासून संततधार धरलेल्या वरुणराजाने शहरासह परिसरात मध्यरात्रीनंतर गुरुवारी दिवसभरात उसंत घेतली. मात्र पंचगंगा नदीच्या पाणी पातळीत वाढ कायम दिसून आली असून मागील २४ तासात पाणी पातळी १० इंचांनी वाढली आहे. गुरुवारी सायंकाळी पातळी ६२ फुटांवर पोहचली होती.**

मागील आठवडाभरापासून शहर परिसरासह धरण पाणलोट क्षेत्रात पावसाने हाहाकार माजवल्याने बहुतांशी सर्वच नद्यांना पुर येऊन अनेक ठिकाणचे पुल, बंधारे पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे वाहतूक बंद होऊन अनेक गावांचा संपर्क तुटला. सततच्या पावसामुळे संपूर्ण जनजीवनही विस्कळीत झाले आहे. पंचगंगा नदीच्या पाणी पातळीतही झपाट्याने वाढ होत आहे.

आठवडाभरातील पावसाच्या तुलनेत गुरुवारी दिवसभरात पावसाने काहीशी उसंत घेतली असली तरी धरण पाणलोट क्षेत्रात हजेरी लावलेली आहे. त्यामुळे नदीच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. पंचगंगेच्या पाणी पातळीत २४ तासात १० इंचांची वाढ झाली असून ती ६२ फुटांवर पोहचली होती. नदीकाठावरील स्मशानभूमीला नदीच्या पाण्याने वेढा घातल्याने आता अंत्यसंस्कार शहापुरमधील स्मशानभूमीत केले जात आहेत. ढगाळ वातावरण असले तरी थांबून थांबून सुर्यनारायणाचे दर्शन होत होते. महापालिका प्रशासनाने नदीकाठावर यांत्रिक बोटीसह आवश्यक आपत्कालीन यंत्रणा २४ तास सज्ज ठेवली आहे.

# घरात घुसून कोयताचा धाक; एकाविरुद्ध गुन्हा दाखल

मिरज,ता.९ (प्रतिनिधी)–

**मिरजेतील मंगळवार पेठ येथील तांबडे गल्ली येथे घरामध्ये कोयता घेऊन येऊन धमकावून शिवीगाळ केल्याची फिर्याद पोलिसात देण्यात आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी कुपवाड येथील एका विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.**

रात्री साडेआठ वाजता ही घटना घडली आहे. अर्जुन संजय कोकाटे (वय ३६) यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. दत्तात्रय उर्फ निलेश परशुराम सलगर (रा. कुपवाड) याच्या विरुद्ध मिरज शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. जुन्या भांडणाचा राग मनात धरून घरामध्ये कोयता घेऊन येऊन शिवीगाळ व दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. कोकाटे यांनी दिलेल्या या फिर्यादीवरून पोलिसांनी सलगर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# डेक्कन चौक परिसरात सशस्त्र हल्ल्यात युवक जखमी

### चार ते पाच जणांचे कृत्य

इचलकरंजी, ता. ९–

**येथील डेक्कन चौक परिसरात एका युवकावर ४–५ जणांनी सशस्त्र हल्ला केला. यात युवक गंभीर जखमी झाला. रोहित विलास पाटील (वय२५, मुळ रा.जवाहरनगर, सध्या रा. कागल) असे जखमीचे नाव आहे.**

हल्लेखोरांनी पाठलाग करुन हल्ला केल्याने त्या परिसरात नागरीकांत भितीचे वातावरण निर्माण झाले होते. जखमीवर आयजीएम रुग्णालयात उपचार सुरु आहेत. हल्ला नेमका कोणत्या कारणातून झाला हे समजु शकले नाही. मात्र, पूर्ववैमनस्यातून हा प्रकार घडला असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत होता.

जवाहरनगर परिसरात राहणारा रोहित पाटील हा कागल सध्या परिसरात राहण्यास होता. गुरूवारी दुपारी तो खोतवाडी परिसरात आला होता. तेथे काहीजणांशी वाद झाल्याची चर्चा होती. संध्याकाळी डेक्कन चौक परिसरात एका हातगाड्यावर तो आला असता हल्लेखोर व त्याच्यात वादावादी झाली. वादाचे पर्यवसन हल्ल्यात झाले.

तोंडाला रुमाल बांधलेल्या हल्लेखोरांनी रोहित याच्यावर वार करण्यास सुरुवात केली. भितीने रोहित पाटील याने पळ काढला. यावेळी दोघा नागरीकांनी त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र, हल्लेखारांनी त्यांना हत्याराचा धाक दाखवला. रोहित पुन्हा तेथून पळत सुटला. मात्र, हल्लेखोरांनी त्याचा पाठलाग करुन त्याच्यावर वार केले. तो रेशनदुकानात शिरला. त्यामुळे तो बचावला. हल्लेखोरांनी तेथून पळ काढला. गंभीर जखमी झालेल्या रोहित पाटील याला उपचारासाठी आयजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. हल्ल्याचे कारण समजु शकले नाही. हल्ल्याची माहिती समजताच रुग्णालयात मोठी गर्दी झाली होती. घटनास्थळी तसेच रुग्णालयात पोलीस निरीक्षक शरद मेमाणे यांनी भेट देऊन तपासाबाबत सुचना केल्या.



पावसाच्या उघडीपीनंतर शहरातील अनेक रस्त्यांची मोठी दुरावस्था झाली. (छाया : मयूर चिंदे)

# पावसाच्या उघडीपीनंतर रस्ते कामाची पोलखोल

## अनेक लहान – मोठ्या रस्त्यावर खड्डे खडी पसरून अपघाताचा धोका

इचलकरंजी,ता.९–

**गेल्या आठवड्याभरापासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत बनले होते. मात्र, गुरुवारी नागरिकांना दिलासा मिळाला पावसाने दिवसभर उघडीप दिली होती. मात्र, आठवडाभर पडलेल्या पावसामुळे रस्त्याच्या कामाची पोलखोल उघड झाली असून रस्त्यावर लहान–मोठे खड्डे पडले आहेत. तर खड्ड्यातील खडी इतरत्र पसरून अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तेव्हा महानगरपालिका प्रशासनाने तातडीने पॅचवर्कची काम हाती घ्यावे अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे.**

शहरातील विविध रस्त्या कामांची सातत्याने उलट सुलट चर्चा होत असते. रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबत अनेक वेळा प्रश्नचिन्ह निर्माण होतात. त्यामध्ये गेल्या काही महिन्यापासून विविध कारणामुळे रस्त्यांची खुदाई करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. त्यामध्ये महासत्ता चौक ते थोरात चौकापर्यंत रस्त्याची अत्यंत खराब अवस्था झाली आहे. त्यामध्ये पडत असलेल्या पावसामुळे या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखलाचे साम्राज्य पसरले होते. या रस्त्यावरून जाताना पादचाऱ्यांना तसेच वाहनधारकांना तारेवरची कसरत करावी लागत होती.

या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून पाचवर्क करण्यात यावे अशी मागणी होत आहे. तर आठवड्याभराच्या पावसानंतर गुरुवारी पावसाने दिवसभर उघडीप दिली होती. त्यामुळे अनेक रस्त्यावर लहान मोठे खड्डे पडले आहे.अनेक खड्ड्यांमधील खडी एकत्र पसरून अपघाताची भीती व्यक्त करण्यात येत आहे तेव्हा महानगरपालिका प्रशासनाने तातडीने रस्त्याचे पॅचवर्क करण्यात यावे अशी मागणी नागरिकांतून केली जाते.

# आवाडे जवाहर कारखान्यात मिल रोलरचे पूजन

इचलकरंजी,ता.९–

**हुपरी येथील कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२६–२७ या ३४ व्या गाळप हंगामासाठी मिल रोलरचे पूजन कारखान्याचे संस्थापक चेअरमन माजी खास. कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या हस्ते विधिवत झाले.**



मिल रोलरच्या पूजनप्रसंगी कल्लाप्पाण्णा आवाडे,प्रकाश आवाडे,उत्तम आवाडे, बाबासो चौगुले व सचालक मंडळ.

यावेळी ज्येष्ठ संचालक प्रकाश आवाडे यांनी, चालू गळीत हंगामात २० लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.सभासद तसेच बिगर सभासद ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला संपूर्ण ऊस कारखान्याकडे गाळपासाठी पाठवून कारखान्याच्या प्रगतीत मोलाचे योगदान द्यावे, असे आवाहन केले.शेतकरी, सभासद, संचालक मंडळ, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या एकत्रित सहकार्यामुळे यंदाच्या हंगामात ऊस गाळपाचे उद्दिष्ट साध्य करील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी व्हा. चेअरमन बाबासो चौगुले, माजी चेअरमन उत्तम आवाडे, केन कमिटीचे चेअरमन दादासो सांगावे, संचालक संजयकुमार कोथळी,अभयकुमार काश्मिरे, सूरज बेडगे, गौतम इंगळे, प्रकाश पाटील, शितल आमणावर, महेश पाटील, पार्श्वनाथ उर्फ सुनिल नारे, प्रशांत कांबळे, सुभाष जाधव, वंदना कुंभोजे, कमल पाटील आणि कार्यकारी संचालक मनोहर जोशी तसेच महावीर मगदूम,पापा पाटील व अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.


भावपूर्ण श्रद्धांजली



स्वर्गवासी प्रदिपजी दिक्षित

जन्म : 20 सप्टेंबर 1963 - मृत्यू : 09 जुलै 2026

आता सहवास जरी नसला, तरी स्मृति सुगंध देत राहील,
जीवनाच्या प्रत्येक वळणावर आठवण तुमची येत राहिल..

शोकाकुल : सुरिंदर मंगलानी, नरेश चंदवानी | सतिश डाळ्या, राजेश मंगलानी

मंगलानी ट्रेडिंग कंपनी । श्री रामदेव इंपेक्स । शिवा टेक्स्टाईल
तलीसमान बायोटेक एल.एल.पी । सर्व ऑफिस स्टाफ


# दोन कोटी १५ लाखाचे अंमली पदार्थ जाळून नष्ट

सांगली, ता. ९(प्रतिनिधी)–

**सांगली जिल्हा पोलीस दलाने जिल्हयातील १७ पोलीस ठाणेकडील वेगवेगळया ६५ गुन्ह्यात जप्त केलेल्या २ कोटी १५ लाखाचे अंमली पदार्थ गुरुवारी जाळून नष्ट केले.**



अंमली पदार्थ नाश कमिटीच्या वतीने मिरज एमआयडीसीतील सुर्या सेंटर ट्रटमेंट फॅसिलिटीच्या बॉयलरमध्ये संबंधित अंमली पदार्थ जाळून नष्ट कण्यात आले. अंमली पदार्थ मुद्देमाल नाश कमिटी अध्यक्ष पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांच्या मार्गदर्शनाखाली सदस्य अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती कल्पना बारावकर, सदस्य गृह पोलीस उपाधीक्षक गजानन सरगर, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक संजीव झाडे, रासायनिक विश्लेषक, शास्त्र सहायक वैधमापन शास्त्र विभागाचे निरीक्षक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयातील अधिकारी, हवालदार संकेत मगदुम,सोमनाथ पतंगे उपस्थित होते. ६५ गुन्ह्यातील १ हजार २१ किलो, गांजा व २७६ ग्रॅम कोकीन या कारवाईत नष्ट करण्यात आले.

# विजेच्या धक्क्याने शेतकऱ्याचा मृत्यू

अ.लाट,ता.९–



**शेतात तण काढतेवेळी विजेच्या अर्थिंग वायरचा हाताला शॉक बसून सम्मेद बाळासो गिरमल यांचा मृत्यू झाला.ही घटना गुरूवारी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास घडली.**

गिरमल हे नेहमीप्रमाणे शेतात गेले होते.ते शेताच्या बांधावरील तण खुरप्याने काढत असताना त्यांचा हात विजेच्या अर्थिंग वायरला लागल्याने त्याना जोराचा शॉक बसल्याने जागीच कोसळले.बराच वेळ झाल्याने वडील शेतातून घरी परतले नसल्याने त्यांच्या मुलाने फोनवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला.परंतू संपर्क होत नसल्याने त्यांच्या शेताशेजारील एका शेतकऱ्याला संपर्क करत आपल्या शेतात जाण्यास सांगितले.त्यावेळी गिरमल हे घटनास्थळी बेशुध्दावस्थेत मिळाले.त्यांना रूग्णालयात नेले असता डॉक्टरांनी ते मृत झाल्याचे घोषित केले.या घटनेची माहिती गावात समजताच गिरमल यांच्या घरासमोर नागरिकांनी गर्दी केली.याबाबत कुरूंदवाड पोलिसांत नोंद झाली आहे.सम्मेद गिरमल हे जय जिनेंद्र मंडळाचे माजी अध्यक्ष होते.


CHANGE IN NAME

My Old Name was
ADITYARAJ
RAJARAM TODKAR
Do Hereby Solemnly
Declare My New Name as
ADITYA
RAJARAM TODKAR
For Passport Issuance



इचलकरंजी एज्युकेशन एन्डोवमेंट फंड

आयएलएस विधी महाविद्यालय कॅम्पस, लॉ कॉलेज रोड, पुणे ४११ ००४

भारतात व भारताबाहेर उच्चशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या, गुणवत्ताधारक, मराठी भाषा जाणणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रवास खर्च / शैक्षणिक फी / शैक्षणिक साधनांसाठी ४% दराने कर्जाऊ शिष्यवृत्ती सन २०२६–२७ या वर्षासाठी देण्यात येईल. शिष्यवृत्तीसाठी अर्ज दि. ३१ जुलै २०२६ पर्यंत विहीत नमुन्यात भरून द्यावेत. अधिक माहितीसाठी आयएलएस विधी महाविद्यालय कार्यालयात मोबा. नं. ९७६४४५१९९८ वर सकाळी १० ते ४ या वेळात संपर्क साधावा.

मॅनेजिंग ट्रस्टी


# मिरजेत पार्किंग शेडला भीषण आग; टँकरसह दोन दुचाकी जळून खाक

मिरज,ता.९ (प्रतिनिधी)–

**मिरजेत भारती हॉस्पिटलच्या पाठीमागील बाजूस असलेल्या मिरज – माधवनगर रोडवर असलेल्या पार्किंग शेडला आग लागल्याने तेथे उभा केलेला रिकामा टँकर व दोन दुचाकी जळाल्या. आगीमध्ये शेडसह लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.**

जीवनसिंग रजपूत यांच्या मालकीचे हे शेड, टँकर व दुचाकी आहेत. पहाटे चार ते पाच वाजण्याच्या दरम्यान येथील शेडमध्ये आग लागली. यावेळी शेडमध्ये रिकामा टँकर उभा केला होता. पहाटेच्या दरम्यान येथे आग लागल्यानंतर परिसरातील नागरिकांनी रजपूत यांना माहिती दिली. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली. मात्र, आगीमुळे तीन वाहनांचे व शेडचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.




श्री देवांग समाज (रजि.) इचलकरंजी
श्री चौंडेश्वरी देवी उत्सव समिती, इचलकरंजी

नम्र निवेदन

सर्व समाज बंधु–भगिनींना व भाविक भक्तांना कळविणेत येते की श्री चौंडेश्वरी देवी उत्सव सप्ताह मंगळवार दि. ०७/०७/२०२६ ते मंगळवार १४/०७/२०२६ अखेर संपन्न होणार आहे. त्यानिमित्त्य...

| | |
|---|---|
| शुक्रवार दि. १०/०७/२०२६ वेळ– सायं ५.०० वा. | मानाची बोली बोलण्याचा कार्यक्रम १) महाभिषेक २) पालखी बाहेर नेणे ३) पालखी आत आणणे |
| शनिवार दि. ११/०७/२०२६ वेळ– सायं ४ ते ६ वा. | समाजातील ज्येष्ठ नागरिकांचे कराओके गायन, 'स्वर तरंग' |
| ज्येष्ठ अमावस्या प्रमुख दिवस मंगळवार दि. १४/०७/२०२६ वेळ– स. ९.०० वा. | श्री चौंडेश्वरी देवी पालखी मिरवणूक सोहळा |

तरी सर्व समाज बंधू–भगिनी व भाविक भक्तांनी सहभागी व्हावे ही विनंती

● आपले नम्र ●

श्री देवांग समाज (रजि.) विश्वस्त मंडळ, इचलकरंजी

महासत्ता

सुविचार :- अडचणींचा सामना करणे हे यशाचे प्रवेशद्वार आहे.



■ संपादकीय ■

# पुन्हा युद्धसंकटाचे ढग

पश्चिम आशियातील युद्धाचा हा नवा भडका अत्यंत चिंताजनक, वेदनादायी आणि तितकाच मानवी मूल्यांना काळीमा फासणारा आहे. इराण आणि अमेरिका यांच्यातील तात्पुरती युद्धबंदी अखेर संपुष्टात आली आहे. तुर्किये येथील नाटो (NATO) शिखर परिषदेदरम्यान अमेरिकी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी थेट हल्ल्याची घोषणा करत 'आता इराणसोबत कोणतीही चर्चा करणे म्हणजे निव्वळ वेळ वाया घालवणे आहे' अशा शब्दांत आपला आक्रमक पवित्रा जाहीर केला. ट्रम्प यांनी वापरलेली भाषा आणि त्यांची तल्खी जागतिक राजनैतिक संकेतांना धक्का देणारी आहे. काही दिवसांपूर्वीच युद्धबंदीच्या करारावर स्वाक्षरी करताना आनंद व्यक्त करणारे ट्रम्प अचानक इतके आक्रमक होतील, असे कोणालाही वाटले नव्हते. मात्र, आपल्या लहरी स्वभावाला जागून त्यांनी पुन्हा एकदा अनपेक्षित निर्णय घेतला असून, आता ते या संघर्षात थेट आरपारची लढाई लढण्याच्या मनःस्थितीत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. या संपूर्ण युद्धात ट्रम्प प्रशासनाला आतापर्यंत केवळ जागतिक स्तरावर टीकेलाच सामोरे जावे लागले आहे. दुसरीकडे, इराणमधील सामान्य जनता मात्र या दोन्ही शक्तींच्या संघर्षात स्वतःचा जीव मुठीत धरून बसली आहे. या युद्धबंदीचा भंग होण्यास नेमके कोण जबाबदार आहे, हे शोधणे आज अत्यंत अवघड झाले आहे; कारण दोन्ही बाजू एकमेकांवर गंभीर आरोप करत आहेत. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या व्यापारी जहाजांवर इराणने केलेले हल्ले, विशेषतः कतारच्या जहाजाला लक्ष्य करणे, हे आंतरराष्ट्रीय नौकानयन स्वातंत्र्याचे आणि मानवाधिकारांचे उघड उल्लंघन आहे. शांतता चर्चा आणि युद्धबंदी टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत संयम आणि मुत्सद्देगिरीची आवश्यकता असते, ज्याचा अभाव सध्या दोन्ही बाजूंकडे प्रकर्षाने जाणवत आहे. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या निधनानंतर त्यांच्या अंत्यविधीसाठी जमलेल्या जनसमुदायात ज्या प्रकारे अमेरिकाविरोधी घोषणाबाजी आणि थेट बदला घेण्याचे आवाहन केले जात आहे, त्यावरून तिथले प्रशासन या हिंसक भावनेला आवर घालण्यात अपयशी ठरल्याचे दिसते. चर्चा आणि शत्रुत्व एकाच वेळी चालू शकत नाही, ही ट्रम्प यांची चिंता रास्त असली, तरी इराणवर अमेरिकेने केलेले लष्करी हल्ले समर्थनीय ठरू शकत नाहीत. खामेनी यांच्या अंत्यविधीच्या पूर्वसंध्येला इराणने थोडा संयम बाळगणे गरजेचे होते, परंतु त्याऐवजी तणाव आणखी वाढवला गेला. ट्रम्प आता उघडपणे बोलत आहेत की, इराणमधील ज्या राजवटीने आपल्याच ५४ हजारहून अधिक नागरिकांचा बळी घेतला आहे, त्यांना सोडले जाणार नाही. परंतु, ट्रम्प ही लढाई खरोखरच अंतिम टप्प्यापर्यंत नेणार का, हा खरा प्रश्न आहे. इतिहास साक्षी आहे की, अमेरिकेने आजवर पाकिस्तान, अफगाणिस्तान, इराण, इराक आणि पॅलेस्टाईनमध्ये खेळलेल्या अर्ध्या-अधुऱ्या लढायांनी तिथल्या सामान्य माणसाचे जीवन नरकमय करून सोडले आहे. ही एक मोठी शोकांतिका आहे की, जो अमेरिका दहशतवाद संपवण्याच्या बाता मारतो, त्याला आज पाकिस्तानसारख्या देशाची मध्यस्थ म्हणून मदत घ्यावी लागत आहे. यावरून अमेरिकेला खरोखरच दहशतवाद आणि मानवाधिकार उल्लंघनाविरुद्ध प्रामाणिक लढाई लढायची आहे का, याबद्दल शंका निर्माण होते. युद्धात शौर्य दाखवणे गैर नाही, परंतु कोणत्याही देशाला मानवतेच्या मर्यादा ओलांडण्याचा अधिकार नाही. इराणने बहरीन आणि कुवेत येथील अमेरिकी लष्करी तळांना लक्ष्य करून क्षेपणास्त्रे आणि ड्रोन डागले आहेत. या कारवाईला कोणत्याही प्रकारे युद्धबंदी टिकवण्याचा प्रयत्न म्हणता येणार नाही. इराणचा इरादा स्पष्ट आहे; जर त्याच्यावर आर्थिक किंवा लष्करी निर्बंध लादून कोंडी केली, तर तो होर्मुझची सामुद्रधुनी रोखून संपूर्ण जगाची नाकेबंदी करेल. या जागतिक तणावाचे थेट परिणाम आता आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर दिसू लागले आहेत. भारतासह जगभरातील शेअर बाजार कोसळले असून कच्च्या तेलाच्या किमतीत पाच टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे, जी आगामी आर्थिक संकटाची स्पष्ट नांदी आहे. ही वेळ केवळ सत्तासंघर्षाची नसून,संपूर्ण जगाने एकत्र येऊन हा हिंसाचार थांबवण्यासाठी प्रयत्न करण्याची आहे. हे युद्ध जगाला क्रूरतेच्या अंधाराकडे नेण्याऐवजी,मुत्सद्देगिरी आणि मानवतेच्या प्रकाशाकडे घेऊन जावे, हीच या घडीला सर्वात मोठी अपेक्षा आहे.होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी खनिज तेलाची वाहतूक विस्कळीत झाल्यामुळे कच्च्या तेलाचे दर भडकले असून, त्याचा थेट ताण भारताच्या आयात बिलावर आणि पर्यायाने चालू खात्यातील तुटीवर पडणार आहे. चलनवाढ म्हणजेच महागाईचा आलेख वाढल्यास रिझर्व्ह बँकेला व्याजदरांबाबत कठोर पावले उचलावी लागतील, ज्याचा फटका देशांतर्गत आर्थिक विकासाला बसू शकतो. मुंबई शेअर बाजारातील निर्देशांक आणि 'निफ्टी ५०' मध्ये झालेली मोठी घसरण ही जागतिक गुंतवणूकदारांमधील अस्वस्थता आणि भीती स्पष्टपणे अधोरेखित करते.

# विश्वासार्हतेची कसोटी

**अयोध्येतील श्रीराम मंदिर तीर्थ क्षेत्रासाठी स्थापन करण्यात आलेल्या न्यासाच्या बैठकीत महासचिव चंपत राय आणि सदस्य अनिल मिश्रा यांचे राजीनामे स्वीकारण्यात आल्यानंतर मंदिराच्या दैनंदिन प्रशासनासाठी स्वतंत्र मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) नियुक्त करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या पदासाठी योग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी तीन सदस्यीय शोध समिती स्थापन करण्यात आली असून, तोपर्यंत न्यासाचे सदस्य कृष्ण मोहन यांची तात्पुरते महासचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.**

कृष्ण मोहन हे वन विभागातील निवृत्त अधिकारी असून श्रीराम मंदिर आंदोलनाशी त्यांचा दीर्घकाळ संबंध राहिला आहे. सक्षम प्रशासक म्हणूनही त्यांची ओळख आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या निवडीसाठी ज्या तीन सदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली आहे,तिच्या विश्वासार्हतेवर सहजपणे प्रश्नचिन्ह उपस्थित करता येणार नाही, अशी रचना करण्यात आली आहे. या समितीत निवृत्त न्यायमूर्ती प्रमोद कोहली, निवृत्त लेफ्टनंट जनरल विष्णुकांत चतुर्वेदी आणि सुरेश हावडे यांचा समावेश आहे.राममंदिरातील देणगी चोरीचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर न्यासाच्या प्रतिमेला मोठा धक्का बसला होता.त्यानंतर जनमानसात निर्माण झालेला अविश्वास दूर करून न्यासाची विश्वासार्हता पुन्हा प्रस्थापित करण्यासाठीच ही संपूर्ण पुनर्रचना करण्यात येत असल्याचे स्पष्ट दिसते. उत्तर प्रदेशसह देशातील विरोधी पक्षांनी या प्रकरणावरून सत्ताधारी भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर जोरदार टीका सुरू केली आहे.मात्र,या टीकेत रामभक्तीपेक्षा राजकारणाचा अंश अधिक असल्याचेही अनेकांचे मत आहे. कारण २०२७ च्या मध्यावर उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुका होणार आहेत. २०१७ पासून मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे सरकार राज्यात सत्तेवर आहे आणि त्यांची लोकप्रियताही मोठ्या प्रमाणात कायम आहे.मात्र,२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत समाजवादी पक्ष आणि काँग्रेसच्या आघाडीने भाजपपेक्षा अधिक जागा जिंकल्या होत्या. त्यामुळे विधानसभा निवडणुकांपर्यंत देणगी चोरीचा मुद्दा जिवंत ठेवून भाजपला त्याच्याच हिंदुत्व आणि राममंदिराच्या मुद्द्यावर अडचणीत आणण्याचा विरोधकांचा प्रयत्न असल्याचे दिसते.दुसरीकडे, आरोप समोर आल्यानंतर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी तातडीने विशेष तपास पथकाची स्थापना करून पंधरा दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. या निर्णयामुळे विरोधकांना धक्का बसला आणि त्यांनी तपास प्रक्रियेवरच प्रश्न उपस्थित करण्यास सुरुवात केली.मात्र, विशेष तपास पथकाने




अवघ्या पाच दिवसांत अंतरिम अहवाल सादर करून देणगी चोरी झाल्याची पुष्टी केली.या प्रकरणात मंदिर व्यवस्थापनातील आठ कर्मचाऱ्यांबरोबरच काही अन्य व्यक्तींवरही संशय व्यक्त करण्यात आला. त्यानंतर आठ कर्मचाऱ्यांविरुद्ध पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले आणि त्यांना अटक करून न्यायालयासमोर हजर करण्यात आले. तपास पथकाने ज्यांच्यावर संशय व्यक्त केला,त्यामध्ये सर्वप्रथम महासचिव चंपत राय यांचे नाव चर्चेत आले. मंदिराच्या एकूण प्रशासनाची जबाबदारी त्यांच्याकडे असल्याने त्यांच्यावर नैतिक जबाबदारी निश्चित होत असल्याचे मानले गेले.तसेच कर्मचारी भरती प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावणारे न्यासाचे सदस्य अनिल मिश्रा यांच्यावरही प्रश्न उपस्थित करण्यात आले. याशिवाय, विशेष निमंत्रित सदस्य म्हणून बैठकींना उपस्थित राहणारे कर्नाटकचे गोपाल राव यांनाही न्यासापासून दूर करण्यात आले. विरोधी पक्षांचा आरोप आहे की, ते केवळ निमंत्रित सदस्य असतानाही मंदिराच्या कारभारात त्यांचा मोठा हस्तक्षेप होता. त्यांच्या कथित पुतण्यामार्फत देणगीची रोकड पोत्यांमध्ये भरून रेल्वेने कर्नाटकला पाठवली जात असल्याचे आणि संबंधित व्यक्ती विमानाने अयोध्येला परत येत असल्याचे आरोपही करण्यात आले. विरोधकांचे म्हणणे आहे की,रोजच्या देणगीची मोजणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना तुरुंगात पाठवून सरकार मोठ्या जबाबदार व्यक्तींना वाचवत आहे. या पार्श्वभूमीवर झालेल्या न्यासाच्या बैठकीनंतर कोषाध्यक्ष गोविंद गिरी महाराज यांनी स्पष्ट केले की,

**दैनंदिनी**

विशेष तपास पथकाने केलेल्या प्रत्येक शिफारशीची अंमलबजावणी केली जाईल आणि दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल. श्रीरामावरील जनतेच्या श्रद्धेला धक्का देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला या जगातही कोणतीही सवलत दिली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला.विरोधी पक्षांच्या भूमिकेबाबत बोलताना त्यांनी राजकीय हेतूंचाही उल्लेख केला.जे लोक कालपर्यंत प्रभू श्रीरामांचे अस्तित्वच काल्पनिक असल्याचे सांगत होते किंवा अयोध्येतील राममंदिर आंदोलनादरम्यान आंदोलनकर्त्यांवर गोळीबार करणाऱ्या सरकारांचा भाग होते, तेच आज रामभक्त असल्याचा आव आणत असल्याची टीका करण्यात येत आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अशा व्यक्तींना यापूर्वीच 'कालनेमी'अशी उपमा दिली होती. तथापि,या सर्व राजकीय आरोप-प्रत्यारोपांपासून वेगळा ठेवला, तरी देणगी चोरीचा मुद्दा अत्यंत गंभीर आहे आणि तो उपस्थित करण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला तसेच कोणत्याही सामाजिक वा राजकीय संघटनेला आहे. मात्र,याचा अर्थ मनमानी आरोप करून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करणे असा होत नाही. मंदिराला अर्पण केलेल्या मौल्यवान वस्तूही गायब झाल्याचे काही आरोप करण्यात आले; मात्र त्यासंदर्भात कोणतेही ठोस पुरावे अद्याप समोर आलेले नाहीत. न्यासाने यासंदर्भात सविस्तर माहिती जाहीर केली आहे.यावरून न्यासाच्या पदाधिकाऱ्यांना परिस्थितीचे गांभीर्य पूर्णपणे लक्षात आल्याचे दिसून येते.संस्थेची विश्वासार्हता अबाधित राखण्यासाठी पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि शिस्त या तत्त्वांचा अवलंब करण्याची तयारी त्यांनी दर्शविली आहे.त्यामुळे आता विरोधी पक्षांनीही कोणताही आरोप करण्यापूर्वी पुराव्यांचाआधार घेणे आवश्यक आहे.अन्यथा,रामाच्या नावावर केवळ राजकीय लाभ मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या पक्षांची प्रतिमा हिंदू समाजात अधिक ठळक होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

# सत्ताधाऱ्यांमधील राजकीय मुजोरी चिंतनीय

## मर्यादा ओलांडणाऱ्यांवर कठोर कारवाईची गरज

संस्कृतीचे माहेरघर म्हटल्या जाणाऱ्या डोंबिवलीत सध्या सत्ताधाऱ्यांची मुजोर संस्कृती दिसून आली.केडीएमसी शास्त्रीनगर रुग्णालयात सत्ताधारी शिवसेनेचे नगरसेवक रमेश म्हात्रे आणि त्यांच्या आडदांड सहकाऱ्यांनी दोन डॉक्टर, नर्सेस आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना बेदम मारहाण केली. एका अडलेल्या गर्भवतीची आणि बाळाची प्रकृती गुंतागुंतीच्या असल्यामुळे त्यांना अधिक चांगले उपचार मिळावे, या उद्देशाने आणि केडीएमसी शास्त्रीनगर रुग्णालयात अत्यावश्यक सेवेत जागा उपलब्ध नसल्यामुळे डॉक्टरांनी त्यांना अधिक चांगल्या रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला. मात्र म्हात्रे आणि टोळीला डॉक्टरांचा हा सल्ला त्यांचा अवमान करणारा वाटला. बस्सं,मग काय कल्याण-डोंबिवलीच्या शिवसैनिकांनी डॉक्टरांना शिवसेनेचा झटका दाखवला. कर्तव्यावर असलेल्या महिला आणि पुरुष डॉक्टरांना झोडपून काढण्यात आले. ज्येष्ठ परिचारिकांना धक्काबुक्की करण्यात आली. डॉक्टरांनी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना दुसऱ्या दवाखान्यात जाण्याचा सल्ला का दिला. खरंच पालिकेच्या रुग्णालयात खाटांची उपलब्धता नव्हती तर त्याचे कारण काय, याचा जाब आरोग्य सभापती,पालिका आयुक्तांना विचारण्याऐवजी रुग्णसेवेत २४ तास खपणाऱ्या तरुण डॉक्टरांवर हात उचलणे यालाच शिवसेना स्टाईल म्हटले जात असेल तर आता या स्टाईलचा सुसंस्कृत डोंबिवलीकरांनीच रस्त्यावर



**सामान्य माणसासाठी डॉक्टर म्हणजे साक्षात देवदूत असतात. रुग्णाची अतिशय गंभीर स्थिती असताना सर्वसामान्यांना एकच आशेचा किरण असतो तो म्हणजे डॉक्टर. वैद्यकीय क्षेत्रातील नर्स, सेवक, हे सर्वच रुग्णांच्या सेवेत असतात. या सर्वांच्या सांघिक प्रयत्नाने गंभीरातील गंभीर रुग्णालाही जीवदान मिळते. मात्र या सर्वांचा आताच्या सत्ताधाऱ्यांना विसर पडला आहे. त्यांना सर्वकाही त्यांच्या तोंडातून शब्द बाहेर पडल्याबरोबर हजर हवे आहे.**

उतरून विरोध केला पाहिजे. निषेध केला पाहिजे.

शिंदेंची शिवसेना राज्यापासून ग्रामपंचायतीपर्यंत सत्तेत आहे. या शिवसेनेत प्रवेशाचा निकष तसा नव्याने सांगण्याची गरज नाही. आमदार निवासातील कँटिनमध्ये टॉवेल बनियनमध्ये कर्मचाऱ्यांना मारता आलं पाहिजे.प्रकाशकांना आई-बहिणीवरून अर्वाच्च शिव्या घालता आल्या पाहिजे. पत्रकारांना शिवीगाळ करून ऑन कॅमेरा मारण्याची, धमकावण्याची ताकद असली पाहिजे. हीच जर शिवसेनेचा लोकप्रतिनिधी असण्यासाठीची पात्रता असेल तर रमेश म्हात्रे यांचा बायोडेटा यासाठी अगदी परिपूर्ण आहे. महिला डॉक्टरवरही हात उचलण्यात जो नगरसेवक मागेपुढे पाहत नाही, त्यांचा तर पक्षप्रमुखांनी, नगरविकास खात्याच्या मंत्र्यांनी जाहीर सत्कारच केला पाहिजे. पंचायतीपासून संसदेपर्यंत तुमची सत्ता असताना रुग्णालयांमध्ये सोयीसुविधा का नाहीत,याचा विचार हे असले लोकप्रतिनिधी कधी करू शकणार नाहीत. असे लोकप्रतिनिधी असणं हीच शिवसेनेची आणि सत्ताधारी पक्षांची आता गरज झाली आहे. मनी, मसल पॉवरवरच सत्तेचा डोलारा उभा राहिल्यावर सुसंस्कृत राजकारणाची अपेक्षा करणेच मुळात चुकीचे आहे.त्यामुळे सार्वजनिक सेवेतील डॉक्टर, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.गृहमंत्र्यांनीही आता हंटर हाती घेतला पाहिजे. हा आपला आणि तो त्यांचा असे वर्गीकरण करत बसण्याऐवजी जो गुन्हेगारी कृत्यात सापडत असेल त्याला योग्य शासन करण्याचा रामशास्त्रीबाणा त्यांनी दाखवण्याची वेळ आली आहे.

सत्ताधाऱ्यांची भाषा आणि कृती ही सुसंस्कृत, समंजसपणाच्या मर्यादा का ओलांडत आहे, हाही खरा प्रश्न आहे. अमर्याद सत्तेचा हा परिपाक आहेच, पण आपल्याला कोण जाब विचारणार, ही मुजोरीदेखील त्यासाठी जबाबदार आहे. आपला बॉस या ना त्या बंगल्यावर बसलेला आहे, याची पूर्ण जाणीव असल्यामुळेच डॉक्टर, नर्स, अधिकारी, कर्मचाऱ्यांवर हात उचलण्याची मजल लोकप्रतिनिधींची जात आहे. मात्र मुळात प्रश्न आहे की, पालिकेपासून संसदेपर्यंत सत्ता असल्यानंतर आणि सर्व पक्षप्रवेश हे विकासासाठी होत असताना सार्वजनिक रुग्णालय, पालिकेच्या दवाखान्यातील मूलभूत सोयी-सुविधांचा विकास का होत नाही.रुग्णालयात,अतिदक्षता विभागात खाटांची संख्या वाढवण्यासाठी, अत्याधुनिक यंत्र आणि त्यासाठीचे कर्मचारी भरतीसाठी या नगरसेवक, आमदार आणि खासदारांनी काय केले? याचा जाब यांना कधी विचारला जाणार. रुग्णालयात खाटांची, डॉक्टर, कर्मचारी वर्गाची संख्याच कमी असेल तर तिथे काम करणारे हे येणाऱ्या प्रत्येक रुग्णाची काळजी कशी घेऊ शकतील. त्यांच्याही काही मर्यादा आहेत, ज्याला सर्वस्वी हे सत्ताधारी जबाबदार आहेत. दोन रस्ते कमी बांधा पण शाळा, रुग्णालयांची संख्या वाढवा, असं म्हणणारा एक तरी लोकप्रतिनिधी आपल्याकडे सापडेल का? यांचा सर्वाधिक भर हा नगद नारायणावर आहे. टक्केवारीशिवाय एकही नस्ती हलत नाही. सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता या चक्रात सर्व सत्तासमीकरण अडल्यामुळे दोन दिवस अशा मुजोर लोकप्रतिनिधींविरोधात आंदोलन होईल, मात्र त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारण्याची हिंमत त्यांचे पक्षप्रमुख, राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री दाखवणार का? राज्याला गृहमंत्री आहेत हे दाखवून देण्याची वेळ देवेंद्र फडणवीस यांच्यावर आली आहे. काम करणाऱ्यांना मार आणि गुंडांचा सत्कार हे महाराष्ट्रात खपवून घेतले जाणार नाही, हे गृहमंत्र्यांनी खडसावून सांगितले पाहिजे, त्यांनी हे वेळीच केले नाही तर सुसंस्कृत राजकारणाचा गळा तुमच्या कार्यकाळात घोटला गेला, याचे पातक तुमच्या नावावर कायमचे लागल्याशिवाय राहणार नाही.

■ शिवाजी चौगुले,कागल

## वाचकांचा पत्रव्यवहार

### मारहाण करणाऱ्यांना शिक्षा करा

शिवसेना शिंदेगटाचे नगरसेवक रमेश म्हात्रे यांनी कल्याण डोंबिवली येथे शास्त्रीनगर केडीएमसी रुग्णालयातील डॉक्टर महिला, परिचारिका तसेच इतर कर्मचाऱ्यांना मारहाण केली आहे. ही अत्यंत निंदनीय दुर्दैवी घटना आहे. या रुग्णालयात एका नवजात बालकाला आयसीयूमध्ये ॲडमिट करायला आूले असता बालकाच्या नातेवाईकांना तेथील डॉक्टरांनी सांगितले कि, आमच्याकडे बेड शिल्लक नाही. तुम्हाला दुसऱ्या रुग्णालयामध्ये जावे लागणार इतकेच कारण होते. त्यानंतर बालकाच्या नातेवाईकांनी रमेश म्हात्रे या नगरसेवकाला फोन केला असता त्यांनी रुग्णालयामध्ये येऊन एका महिला डॉक्टर व इतर महिला कर्मचारी यांना बेदम मारहाण व शिवीगाळ केली. आपला महाराष्ट्र छत्रपती शिवरायांचा आहे आणि त्यांचा विचार घेऊन महिलांना संरक्षण द्यायचे सोडून मारहाण करणे ही कुठली मर्दानगी. हे कसले नगरसेवक. हे तर सत्तेच्या उन्मादाने माजलेले गुंड. त्या नगरसेवकाचे पद बरखास्त व्हायला पाहिजे.नगरसेवक व त्याचे सहकारी यांना ताबडतोब शिक्षा झाली पाहिजे.

■ बाळासाहेब नरशेट्टी
इचलकरंजी

### कारणांचा शोध घेणे जरुरीचे

यंदाही पावसाळ्यात दरडी कोसळण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात जाणविले. विशेषतः सह्याद्रीचा घाट माथा, पुणे-मुंबई महामार्ग, मुंबई-गोवा मार्ग येथे दरडी कोसळण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर दिसून आले.गेली अनेक वर्षे पाऊस पडत आहे पण इतक्या मोठ्या प्रमाणावर दरडी यंदाचं कोसळलेल्या दिसतात. यामागे वृक्ष तोड, विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात डोंगर फोडणे, डोंगर फोडून घरे बांधणे इत्यादी कारणे आहेत कि आणखी काही कारणे आहेत ? याचे शास्त्रीय संशोधन व्हावे.यामधील तज्ज्ञांनी आपली मते व्यक्त करावीत. यातील निष्कर्षातून पुढील दक्षता सरकारी किंवा इतर यंत्रणांना घेता येईल, असे वाटते.


■ शांताराम वाघ

### नुकसान टाळण्यासाठी मालमत्तेचे स्ट्रक्चरल ऑडिट गरजेचे

पावसाळा सुरू झाला की, पूर, इमारती-दरडी कोसळणे, पूल वाहून जाणे, धरणे फुटणे, संरक्षक भिंती खचणे यासारख्या घटना दरवर्षी नियमित घडतात त्यामुळे अनेकांना प्राण गमवावा लागला आहे.प्रशासन वेळोवेळी असल्या घटनांकडे डोळेझाक करते मात्र याचा फटका जनतेला बसतो त्यासाठी याचा गांभीर्याने विचार करुन जीवितहानी, वित्तहानी व मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या अशा घटना टाळण्यासाठी स्थापत्य अभियांत्रिकी बांधकामांचे नियमित संरचनात्मक लेखापरीक्षण अर्थात स्ट्रक्चरल ऑडिट करणे आवश्यक असते. माणूस चाळीस वर्षांचा झाला की साधारणत: डॉक्टर नियमित वैद्यकीय तपासणी करण्यास सुचवितात व सुदृढ राहण्यासाठी त्या आपण करीत असतो. त्याचप्रमाणे इमारतीचे वय ३० वर्षांवरील असेल तर दर तीन वर्षांनी संरचनात्मक लेखापरीक्षण करणे कायद्याने अनिवार्य आहे.संरचनात्मक लेखापरीक्षणात इमारतीचे विविध भाग जसे की, कॉलम, बिम, स्लॅब, भिंती, पाया इत्यादींची तपासणी तज्ज्ञांकडून करून इमारतीची गुणवत्ता, क्षमता व आयुष्यमान ठरविले जाते. बांधकामांतील भिंतीमध्ये निर्माण झालेल्या तडा, विविध भागांत निर्माण झालेला ओलावा, धरलेले पोपडे, काँक्रीटमधील सळ्यांना लागलेले गंज, विविध भागांत निर्माण झालेले बाक, विविध पाईपलाईनमधील गळती यावरून बांधकाम सुरक्षित आहे की नाही हे ठरवू शकतो. इमारतीप्रमाणे विविध स्थापत्य अभियांत्रिकी बांधकामे जसे की धरण, पूल, उंच पाण्याच्या टाक्या, संरक्षक भिंती इत्यादींचे वेळोवेळी संरचनात्मक लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. महत्त्वाच्या स्थापत्य अभियांत्रिकी बांधकामांचे संरचनात्मक लेखापरीक्षण नियमित करून अहवालाप्रमाणे कार्यवाही केल्यास पावसाळ्यातील भविष्यातील बऱ्याच दुर्घटना तसेच मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी टाळणे शक्य होऊ शकते. याकरिता संबंधित शासकीय बांधकाम विभाग, महापालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत यासारख्या विभागांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील बांधकामाचे संरचनात्मक लेखापरीक्षण बंधनकारक करून त्याची अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे.

■ राजू जाधव,मांगूर

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शुक्रवार,ता.१०.७.२०२६,** विक्रमसंवत २०८२, शिवशक ३५३, शालिवहन शके १९४८,पराभवनाम संवत्सरे दक्षिणायणे,ग्रीष्म ऋतो,ज्येष्ठ मासे, कृष्ण पक्षे, दशमी तिथी ८.१७ नंतर, एकादशी तिथी २९.२४ पर्यंत,भरणी नक्षत्र,१३.१६ नंतर कृतिका नक्षत्र,मेष रास,१८.४६ नंतर वृषभ रास,धृतियोग ७.१५ नंतर, शुलयोग २७.५१ पर्यंत,विष्ठीकरण ८.१७ नंतर, बव करण१८.५४ नंतर, बालव करण २९.२४ पर्यंत,दिनमान १२.५७, सुर्योदय ६.०९, सुर्यास्त १९.०६ (कोल्हापूरचे), राहू काळ दुपारी १.३० ते १२, योगिनी स्मार्त एकादशी, एकादशीचा क्षय, भद्रा ८.१७ पर्यंत, घबाड ८.१७ पर्यंत,संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ यात्रा त्र्यंबकेश्वर.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष-** मेष राशीच्या लोकांना नवीन नोकरीची संधी मिळू शकते. या काळात तुम्ही नोकरीच्या नवीन संधी शोधून पुढे जाऊ शकता. वेळ चांगली असल्याने यश मिळणार आहे.

**वृषभ-** आर्थिक लाभाचे नवीन मार्ग खुलतील. मानसिक तणाव कमी होईल. व्यवसायात मोठी डील मिळू शकते. संयम ठेवून अडचणींवर उपाय शोधा.

**मिथून-**. मानसिक व्यग्रता जाणवेल. अति विचार करू नका. लबाड लोकांच्यावर विश्वास ठेऊ नका. नसत्या वादात लक्ष घालू नका. फसवणुकीपासून सावध राहावे.

**कर्क-**व्यवसाय करणाऱ्यांना पैसे कमावण्याच्या नवीन संधी मिळतील. योग्य नियोजन करून यश मिळवू शकता. मात्र भावनेच्या भरात निर्णय घेणे टाळा.

**सिंह-**मित्रांसोबत आनंदाचे क्षण घालवण्याची संधी मिळेल. नातेसंबंध अधिक गोड आणि मजबूत होतील. मात्र या काळात आरोग्याची काळजी घ्या.

**कन्या-**दूरवर राहणाऱ्या नातेवाईकांकडून अनपेक्षितपणे गोड बातमी मिळेल.अधिकचा पैसा स्थावर जंगम मालमत्तेत गुंतवाल.कलात्मक गुणांना वाव मिळेल.

**तुळ-** खूप काळापूर्वी सुरू केलेल्या प्रकल्पाचे काम आज पूर्ण झाल्याने तुम्हाला खूप समाधान लाभेल. तुमच्या व्यक्तिमत्वामुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल.

**वृश्चिक-**नोकरीत पदोन्नती मिळण्याची शक्यता आहे. व्यवसायात नफा मिळण्याचे मार्ग खुलतील. रखडलेली कामे पूर्ण करण्यासाठी हा योग्य काळ आहे. आनंदाची बातमी मिळू शकते.

**धनु-**या राशीच्या लोकांसाठी नवीन संधींचे दरवाजे उघडतील आणि आयुष्य आनंदाने भरून जाईल. या काळात तुम्ही तुमची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी पुढे जाल.

**मकर-**स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना यश मिळू शकते. प्रेमसंबंध अधिक घट्ट होतील. शिक्षण आणि सर्जनशील क्षेत्रात चांगली कामगिरी करता येईल.

**कुंभ-** मन शांत ठेवा आणि तणावापासून दूर राहा. या काळात तुम्ही एखादी मोठी खरेदी करू शकता, मात्र खर्चाचाही विचार करा.नकारात्मक लोकांपासून दूर राहिल्यास अधिक चांगले.

**मीन-**मीन राशीच्या लोकांना करिअरमध्ये नवीन संधी मिळू शकतात. एखाद्या चांगल्या कंपनीकडून नोकरीची ऑफर मिळू शकते. कामाच्या ठिकाणी तुमच्या कामाचे कौतुक होईल.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# दुर्गंधीयुक्त पाण्यातून प्रवास कधी थांबणार?

## सांडपाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात;कारदगा-ढोणेवाडी रस्त्यावरील चित्र

बारवाड,ता.९(वार्ताहर)-

**गेल्या कित्येक दिवसापासून सरकारी दवाखान्यापासून थोड्या अंतरावर कारदगा ढोणेवाडी रस्त्याच्या कडेने गटारी नाहीत.त्याचबरोबर स्वच्छतेकडे लक्ष दिले गेले नाही. त्यामुळे या आवारातील सर्व गटारींचे तसेच सांडपाणी रस्त्यावर व विद्यार्थ्यांसाठी असलेल्या हॉस्टेल आवारात थांबत असल्याने हॉस्टेलमधील विद्यार्थ्यांना व रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना फार त्रास होत आहे तर दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे या रस्त्याकडेनवास्तव्यास असलेल्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.**



कारदगा-ढोणेवाडी रस्त्यावर साचलेल्या पाण्यातून प्रवास करताना वाहनधारक.

याबाबत अधिक माहिती अशी की, कारदगा ढोणेवाडी हा रस्ता मुख्य आहे. मात्र या रस्त्यावर सरकारी दवाखान्याच्या पुढे थोड्या अंतरावर मुख्य वळणावर गटारींचे तसेच पावसाचे पाणी येते. मात्र इथून पुढे हे पाणी जाण्यासाठी गटारी नसल्याने सर्व पाणी या रस्त्यावरच थांबत आहे.या पाण्यामुळे हा रस्ता आहे की तलाव आहे हेच समजत नाही.तर माळभागातील सर्व गटारींचे पाणी शालेय विद्यार्थ्यांच्यासाठी असलेल्या हॉस्टेल समोरून काढून देण्यात आले आहे. पण हॉस्टेलपासून पुढे गटारी नसल्याने सर्व गटारीचे पाणी या हॉस्टेल आवारात व या मुख्य रस्त्यावरच राहत आहे. आणि या गटारींच्या पाण्याच्या दुर्गंधीमुळे हॉस्टेलमधील मुलांना तसेच या रस्त्याकडेने वास्तव्यास असलेल्या नागरिकांना त्रासदायक बनून त्यांना विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे हॉस्टेलमध्ये व या रस्त्याच्या कडेने वास्तव्यास असलेल्या नागरिकांना फारच अडचणीचे झाले आहे. दुर्गंधीयुक्त पाणी पाहून काही पालकांनी आपली मुले घरी घेऊन गेले आहेत. त्यामुळे या मुलांच्या शिक्षणावर परिणाम होणार हे निश्चित आहे.विशेष म्हणजे काही दिवसापूर्वी या ठिकाणी तहसिलदार, एईओ यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करून ही समस्या दूर करतो,असे आश्वासन दिल्याचे समजते.पण अद्याप इकडे कोणीच लक्ष दिले नाही. अद्याप ही समस्या तशीच असल्याने आरोग्याचा व या रस्त्यावरून प्रवास करण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

या रस्त्यावर राहिलेल्या पाण्यातून प्रवास करताना अनेक वाहनधारक पडून जखमी होण्याचे प्रकार वाढले आहेत. तसेच प्रत्येकाच्या घरासमोर दुर्गंधीयुक्त पाणी साचून राहत असल्याने डेंग्यू, मलेरिया सारख्या आजारांना सामोरे जावे लागणार अशी भीती निर्माण झाली आहे.हा सर्व प्रकार गेल्या कित्येक दिवसांपासून सुरू आहे.पण अद्याप इकडे कोणीही लक्ष दिलेले नाही.याचेच आश्चर्य वाटत असल्याचे येतील नागरिकांतून बोलले जात आहे.तेव्हा आता तरी संबंधितांनी याकडे लक्ष देऊन ही समस्या दूर करावी,अशी मागणी होत आहे.

# कर्नाटकात निवडणूक आयोगाकडून ग्रा.पं.निवडणुकीची तयारी

निपाणी,ता.९(प्रतिनिधी)-

**राज्यातील सर्व ग्रामपंचायतींचा कार्यकाळ जवळपास संपला असून राज्य निवडणूक आयोगाने नियोजित वेळेनुसार निवडणुका घेण्याची तयारी सुरू केली आहे. मतदार यादी पुनर्तपासणी, ग्रामपंचायत प्रभागांची पुनर्रचना व मतदारसंघ आरक्षण यासह आवश्यक कार्यवाही करण्यासाठी प्रत्येक ग्राम पंचायतीसाठी एका अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दिले आहेत.**

राज्य निवडणूक आयोगाने यासंदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहून सचिव व अधिकाऱ्यांच्या नियुक्तीसह अनेक आवश्यक उपाययोजना कराव्यात असे देखील म्हटले आहे. तसेच निवडणुकी पूर्वीच्या तयारीसाठी प्रत्येक ग्राम पंचायतीकरिता गट-ब संवर्गातील एका अधिकाऱ्याची निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती केली जाणार असून ते संबंधित पंचायतीचे निवडणूक अधिकारी म्हणून देखील काम पाहतील, असे म्हटले आहे.या निवडणूक अधिकाऱ्यांना त्यांच्या कामात सहाय्य करण्यासाठी शिरस्तेदार, अधीक्षक किंवा व्यवस्थापक दर्जाच्या अधिकाऱ्याची सहायक निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती केली जावी,असे सुचवण्यात आले आहे. कोणत्याही परिस्थितीत त्यांची त्यांच्या स्वतःच्या शहरात किंवा मतदारसंघात निवडणूक कर्तव्यावर नियुक्ती केली जाऊ नये, असे स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर पंचायतींमधील सदस्य जागांच्या संख्येनुसार तैनात अधिकाऱ्यांची संख्या निश्चित केली जावी. जर कोणत्याही पंचायतीमध्ये २५ सदस्य असतील तर एक निवडणूक अधिकारी व एक सहाय्यक निवडणूक अधिकारी असेल. सदस्य संख्या २५ ते ३५ च्या दरम्यान असल्यास एक निवडणूक अधिकारी व दोन साहाय्यक निवडणूक अधिकारी नियुक्त केले जातील. ३५ पेक्षा जास्त सदस्य जागा असलेल्या मोठ्या पंचायतींच्या बाबतीत दोन निवडणूक अधिकारी व दोन सहाय्यक निवडणूक अधिकारी ही जबाबदारी विभागून घेतील, असे म्हटले आहे. राज्य निवडणूक आयोगाने यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक ती तयारी करण्याचे निर्देश दिले असून निवडणूक प्रक्रिया कोणत्याही त्रुटींशिवाय पार पाडण्यासाठी आवश्यक कर्मचारी तैनात करण्यास सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.

### प्रत्येक ग्रा.पं.साठी एक अधिकारी नियुक्तीचे आदेश



निपाणीः संततधार पावसाने जवाहर तलावाच्या पाणीपातळीत झालेली वाढ.

# निपाणीत जवाहर तलावाची पाणीपातळी ३३.११ फुटांवर

निपाणी,ता.९(प्रतिनिधी)-

**गेल्या ६ दिवसांपासून निपाणी शहर आणि परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे शहराचा मुख्य पाण्याचा स्रोत असलेल्या ऐतिहासिक जवाहर तलावाच्या पाणी पातळीत ३३.११ फुटाने वाढ झाली आहे. तसेच, तलावाच्या पाणलोट क्षेत्रातून येणारा शिरगुप्पी ओढा प्रवाहित झाला आहे. यमगर्णी नदीतून तलावात पाण्याचा उपसा सुरू असून पालिकेकडून शहरास ४ दिवसाआड पाणीपुरठा सुरू करण्यात आला आहे.**

### शहरास ४ दिवसाआड पाणी पुरवठा सुरू

गेल्या १ महिन्यापासन मान्सून पावसाने ओढ दिली होती. त्यामुळे शहरवासियांमध्ये चिंतेचे ढग दाटले होते.मोठ्या प्रमाणात पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले होते. ५ ते ६ दिवसात दमदार पाऊस झाल्याने डोंगराळ व सखल भागातून येणारे पाणी आता थेट जवाहर तलावात जमा होऊ लागले आहे.काही दिवसांपूर्वी कोरडा पडू लागलेल्या या तलावात आता पाण्याचा साठा निर्माण होत आहे. तलावात पाणी वाढू लागल्याने नागरिक हे दृश्य पाहण्यासाठी गर्दी करत आहेत.

गतवर्षी जून महिन्यातच तलाव ओव्हरफ्लो झाला होता.यावर्षी जूनच्या प्रारंभी पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने तलावाने तळ गाठला होता, ज्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईची चिंता सतावत होती. मात्र,जुलैच्या सुरुवातीच्या काळात दमदार पावसाने तलावाची पातळी काही प्रमाणात वाढत आहे.सध्या शहरास ७५ व १०० एचपी विद्युतपंपाव्दारे शहराला पाणीपुरवठा केला जात आहे.

तसेच यमगर्णी नदीपासून डॅम व थेट फिल्टर हाऊसला पाणीपुरठा सुरू आहे.त्यामुळे सध्या पालिकेकडून ४ दिवसाआड पाणीपुरवठा केला जात असल्याने शहरवासियांवर निर्माण झालेले पाणीटंचाईंचे सकंट काही प्रमाणात दूर झाले आहे.मात्र तलाव ओव्हरफ्लो होईपर्यंत पाण्याचा जपून वापर करणे आवश्यक आहे.तलाव ओव्हरफ्लो होण्यासाठी आणखी दमदार पावसाची गरज असून शहरवासियांना आणखी काही काळ प्रतिक्षा करावी लागणार आहे.

### पाण्यासाठी आम्ही निपाणीकर संघटना आक्रमक

**दरम्यान शहरात सुरळीत पाण्यासाठी आम्ही निपाणकर संघटनेने आक्रमक भूमीका घेऊन लोकप्रतिनिधी व प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला आहे.त्यासाठी पालिकेसमोर १ दिवसाचे धरणे आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे तसेच निपाणीच्या पाणीप्रश्नावर अधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्यासमवेत १५ दिवसात बैठकीची मागणी केली आहे.**

## बेडकिहाळात रस्ता कामाचा शुभारंभ

बेडकिहाळ,ता.९(वार्ताहर)-

**येथील सिद्धार्थनगर ते चिकोडी इंचलकरंजी या प्रमुख रस्त्यास जोडणारा रस्ता अत्यंत खराब झाला होता.त्यामुळे या भागातील नागरिकांसह विद्यार्थ्यांची गैरसोय होत होती. ही अडचण लक्षात घेऊन युवानेते दत्तकमार पाटील व सुप्रिया पाटील यांनी स्वप्रयत्नाने या रस्त्याच्या खडीकरणासाठी सुमारे १ लाख ३५ हजार तरतूद करून दिली आहे.या रस्ता कामाचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते झाला.**

यावेळी सावंता कोरे, दत्तकुमार पाटील,ताजुद्दीन मुल्ला, सलीम मुल्ला, अमोल माळगे,मनोज जाधव, किरण देसाई, महमद मुल्ला, महेश सोनावणे प्रमुख उपस्थित होते.अनिल गोसावी यांनी आभार मानले.

# विकासासाठी सर्वांनी एकदिलाने पुढे यावे

## रोहन निर्मळ

मुरगूड,ता.९(प्रतिनिधी)-

**रोहन निर्मळ फाउंडेशनच्या माध्यमातून आम्ही समाजहिताचे विविध उपक्रम सातत्याने राबवत असतो. समाजाच्या विकासासाठी पक्ष, गट आणि राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्वांनी माणुसकीच्या नात्याने एकत्र येणे ही काळाची गरज आहे.**

निवडणुकीच्या काळात राजकारण असणे स्वाभाविक आहे, मात्र इतर वेळी विकासकामांच्या आड राजकारण येता कामा नये. गाव, शेतकरी आणि समाजाच्या हितासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम केल्यास विकासाला निश्चितच गती मिळेल. मतभेद विसरून विकासाच्या कामांसाठी सर्वांनी एकदिलाने पुढे यावे, असे आवाहन युवा शिवसेना नेते रोहन निर्मळ यांनी केले.



शेतकऱ्यांना फवारणी पंप वाटप करताना रोहन निर्मळ व अन्य.

ते हमिदवाडा (ता.कागल) येथे स्वराज्य कल्याण सेवाभावी संस्था व रोहन निर्मळ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शेतकऱ्यांना मोफत इलेक्ट्रिक कृषी फवारणी पंप वाटप कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्षस्थानी महा एनजीओ डेव्हलपमेंट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.युवराज येडुरे हे होते. कार्यक्रमात लाभार्थी शेतकऱ्यांना मोफत इलेक्ट्रिक कृषी फवारणी पंपांचे वितरण करण्यात आले.या उपक्रमाचे शेतकरी वर्गातून मोठ्या प्रमाणात स्वागत करण्यात आले

या कार्यक्रमात बोलताना डॉ.युवराज येडुरे यांनी शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती देत सीएसआर निधीच्या माध्यमातून शेतकरी व ग्रामीण भागाचा विकास कशाप्रकारे साधता येईल, शेतकऱ्यांना आर्थिक मदत, आधुनिक सुविधा आणि विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देता येईल, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच येत्या काळात हमीदवाडा गावाच्या विकासासाठी सीएसआर निधीतून मोठा निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

कार्यक्रमास हमीदवाडा सरपंच कृष्णात बुरटे,रोहन निर्मळ फाउंडेशनचे उपाध्यक्ष अनिल निर्मळ, अक्षय सुळकुडे, विनायक सुळकुडे,अंकुश दुरडे, मनोज माणगावकर, कमलेश रंगापुरे, महेश जाधव, भगवान ठाणेकर, एकनाथ ठाणेकर,सचिन पाटील तसेच शेतकरी उपस्थित होते.

# निम्मा वेळ अभ्यासासाठी राखल्यास उच्च कामगिरी शक्य-लोळगे




निपाणी,ता.९(प्रतिनिधी)-

**मोबाईलच्या व्यसनाबद्दल सर्वांनाच माहिती आहे पण ते सोडणे शक्य होत नाही. एका नवीन अभ्यासानुसार, प्रत्येकजण सुमारे १० ते १२ तास मोबाईल स्क्रीनवर असतो. त्यापैकी फक्त अर्धा वेळ अभ्यासासाठी राखून ठेवल्यास उच्च कामगिरी करणे शक्य आहे, असे मत प्रसिद्ध वक्ते प्रा.गणेश लोळगे यांनी व्यक्त केले.**

ते व्हीएसएम स्वतंत्र पदवीपूर्व महाविद्यालय, निपाणी येथे आयोजित सांस्कृतिक आणि क्रीडा उपक्रमांच्या उद्‌घाटनप्रसंगी आणि २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात बोलत होते. अध्यक्षस्थानावरून बोलताना, विद्या संवर्धक मंडळाचे चेअरमन सहकाररत्न चंद्रकांत कोठीवाले म्हणाले,'तुम्ही ज्या संस्थेत शिक्षण घेत आहात, त्या संस्थेला तुमच्या घरासारखे मानले पाहिजे. तुम्ही शिक्षकवर्गाचा आदर तुमच्या आई-वडिलांप्रमाणे केला पाहिजे. प्राचार्य रुपेश पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमात दहावीच्या परीक्षेत अक्षता जाधव, अथर्व इंगळे, सोहम बेनाडे, तनुजा पोतदार आणि पीयूसी परीक्षेतील सानिका अडसुल, सुष्मिता महाजन, शिवलीला खाडे, प्रतीक्षा चंद्रकुडे, समीक्षा भोसले यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रजत ढोले, समीर बागेवाडी, संजय मोळवाडे, रावसाहेब पाटील, अविनाश पाटील, दादा जनवडे, प्रा.बसवराज करोशी, प्रा. रमेश गोडसे व विद्यार्थी उपस्थित होते.



लखनापूरः शाळेच्यासमोर पावसामुळे झालेला चिखल.

# लखनापूर शाळेच्या आवारात चिखलाचे साम्राज्य

निपाणी,ता.९(प्रतिनिधी)-

**लखनापूर येथील शाळेला १०० वर्षांचा गौरवशाली इतिहास लाभला असला तरी आजही प्रत्येक पावसाळ्यात शाळेच्या परिसरात मोठ्या प्रमाणात चिखल व पाणी साचत असल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.**

शाळेत ये-जा करताना विद्यार्थ्यांचे हाल होत असून त्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.विशेष म्हणजे, शाळेसाठी पेव्हर ब्लॉक मंजूर असूनही त्याच्या कामास अद्याप सुरुवात झालेली नाही. मंजुरी मिळूनही कामात होत असलेल्या दिरंगाईमुळे पालक व ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.शाळेचे सध्या शतकमहोत्सवी वर्ष सुरू असून या ऐतिहासिक वर्षात तरी संबंधित विभागाने पेव्हर ब्लॉकचे काम तातडीने पूर्ण करून शाळेला चिखलमुक्त करावे, अशी मागणी अध्यक्ष सुनील कांबळे यांनी केली आहे.

# कागल तालुक्यात पावसामुळे हजारो एकरातील ऊसपीक भुईसपाट

निढोरी,ता.९(वार्ताहर)-

**कागल तालुक्यातील ऊस पिकाला वादळी वाऱ्याचा फटका बसला असून हजारो हेक्टर ऊस पीक भुईसपाट झाले आहे.तसेच निढोरीसह वेदगंगा नदीकाठावरील ११ गावातील ऊस, भात, पिके गेल्या सात दिवसांपासून पाण्याखाली गेली आहेत.**

धुवाँधार पावसापेक्षा सोसाट्याच्या कोरड्या वादळी वाऱ्यामुळे पिकांसह कच्च्या घरांचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे तसेच विद्युत तारा तुटण्याचे प्रमाण वाढले आहे. अनेक जुने वृक्ष जमिनदोस्त झाल्यामुळे काही ठिकाणी खंडित वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी कर्मचाऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे.



मुरगूडमधील प्राथमिक शाळेसमोरील मैदानात झालेला चिखल.

# मुरगूडच्या शाळा मैदानावर चिखलाचे साम्राज्य

मुरगूड,ता.९(प्रतिनिधी)-

**मुरगूड येथील शाळा नं १ जीवनशिक्षण विद्यामंदिर व कन्या विद्यामंदिर या दोन प्राथमिक शाळासमोरील मैदान पावसामुळे चिखलमय झाले असून या चिखलातूनच मुलांना जा - ये करावी लागत आहे.पायी जाताना अनेक वेळा विद्यार्थी या चिखलात पाय घसरून पडली आहेत. याबद्दल पालक वर्गात नाराजी आहे.**

मुरगूड शहराच्या मध्यवर्ती असलेल्या भागात मुलांची व मुलींची स्वतंत्रपणे प्राथमिक शाळा भरते.या शाळांचे क्रिडांगण प्रशस्त आहे. या पटांगणाचा क्रीडा स्पर्धा भरविण्यासाठी, पार्किंगसाठी व वेगवेगळ्या कार्यक्रमासाठी वापर होतो पण या शाळेच्या मुलांना या पटांगणाचा पुरेसा वापर होताना दिसत नाही.पावसाळ्यात या मैदानाची दुर्दशा होते मात्र त्याकडे कोणीही लक्ष देत नाही.चिखलाच्या मैदानावरच मुलांना उड्या मारत शाळेत जावे लागते.या मैदानातूनच वाहनांची ये-जा होते.त्यामुळे येथे चिखलगुठ्ठ्याची शर्यत तर नाही ना?अशी पालकांतून विचारणा होते.शाळकरी लहान मुलांना या शाळेत येताना प्रथम चिखलासी सामना करावा लागतो.नगरपालिका व जिल्हापरिषद प्रशासनाने मुलांच्या या खेळाच्या मैदानाकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे.मुलांना पावसाळ्यात जा-ये करण्यासाठी मार्ग बनवून देण्याची मागणी पालक वर्गातून होत आहे.

# बसमध्ये तंबाखू,गुटखा खाणाऱ्यांवर होणार कारवाई

## कर्नाटक परिवहन मंडळाचा महत्वपूर्ण निर्णय

निपाणी,ता.९(प्रतिनिधी)-

**कर्नाटक परिवहन मंडळाने आपल्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी धावत्या बसमध्ये तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करुन खिडकीतून थुंकल्यास प्रवाशांवर आता कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. तसेच कारवाईपोटी त्या प्रवाशांकडून दंड वसूल केला जाणार आहे.**

प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत उत्तर-पश्चिम कर्नाटक राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एनडब्ल्यूकेआरटीसी) हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. अलीकडेच एका १७ वर्षीय विद्यार्थ्याचा बसमधून थुंकण्यासाठी खिडकीबाहेर डोके काढल्याने मागून येणाऱ्या टिप्परची धडक बसून मृत्यू झाल्याच्या दुर्दैवी घटनेनंतर ही कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

धावत्या बसमध्ये तंबाखू चघळणे, गुटखा किंवा पानमसाला खाऊन थुंकणे यामुळे केवळ सार्वजनिक स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होत नाही तर प्रवाशांच्या जीवितालाही गंभीर धोका निर्माण होतो. त्यामुळे अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत बस



प्रवासादरम्यान तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करताना किंवा खिडकीतून थुंकताना आढळलेल्या प्रवाशांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. बस वाहक व इतर कर्मचाऱ्यांना नियमभंग करणाऱ्यांवर लक्ष ठेवून तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश देण्यात येणार आहेत.

अलीकडील काळात थुंकण्यासाठी खिडकीबाहेर डोके काढल्यामुळे दोन प्रवाशांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर धावत्या बसमध्ये तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन व थुंकण्यावर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण व प्रवाशांच्या सुरक्षेसाठी कठोर नियमांची अंमलबजावणी केली जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून दंड वसूल करण्यात येणार असून या निर्णयामुळे प्रवाशांकडून प्रवासा दरम्यान सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन होणार आहे.धावत्या बसमध्ये खिडकीबाहेर डोके काढणे किंवा थुंकण्याचा प्रयत्न करणे जीवावर बेतू शकते, असा इशाराही एनडब्ल्यूके आरटीसीकडून देण्यात आला आहे.

दंडाची नेमकी रक्कम व अंमलबजावणीची कार्यपद्धती लवकरच अंतर्गत सूचनांद्वारे निश्चित केली जाणार आहे. तसेच बसस्थानके व बसमध्ये जनजागृतीपर सूचना फलकही लावण्यात येणार आहेत. महामंडळाने यापूर्वीच सर्व बसस्थानक परिसरात तंबाखू विक्री कायद्याची कठोर अंमलबजावणी सुरु केली आहे. तंबाखूजन्य पदार्थांच्या वापरावर नियंत्रण व सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यास प्रतिबंध करण्यासाठी दंडात्मक कारवाई सुरु आहे. आता ही मोहीम धावत्या बसेसमध्येही प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

## नेताजी पाटील यांचे निधन

कोगनोळी,ता.९(प्रतिनिधी)-



मौजे मत्तीवडे(ता.निपाणी)येथील राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते व आप्पाचीवाडी ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी अध्यक्ष नेताजी तुकाराम पाटील (वय ७२) (उद्योजक) यांचे हृदयविकाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कोगनोळी येथील प्रियदर्शनी महिला को.ऑप.क्रेडिट सोसायटीच्या संचालिका कल्पना पाटील यांचे ते पती तर युवा उद्योजक प्रताप पाटील यांचे ते वडील होत. ते माजी ऊर्जामंत्री वीरकुमार पाटील यांचे खंदे समर्थक होते.

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## ✲ खरेदी विक्री ✲

**फार्म हाऊस विकणे आहे.** जागा साडे दहा गुंठा, पूर्ण डेव्हलप-२ बीएचके स्विमिंग पूल, लॉन, गार्डन. पत्ता- राजमाने हायस्कूलमागे, रूई. फोन-९८६०४०५७०४

**बझार, मॉल कपडे दुकान** इतरसाठी १०० पेक्षा जास्त रॅक देणे आहे. संपर्क-९७६६८१२२९९

**धनगर माळ कोरोची येथे** कलेक्टर बिनशेती प्लॉट विकणे आहेत. संपर्क- विजय-९६८९६९१८६२

**ओमनी गाडी विकणे-** २०००,२००७, २००८ मॉडेल फूल्ल कंडिशन संपर्क-९४२३९३९०८५

**गावभाग अवधूत आखाडा** परिसरात सर्वसोयीनियुक्त नवीनच बांधकाम असलेली ३ मजली इमारत विकणे आहे. संपर्क-९३५१६६८७२३५

**विकणे आहे.** दुकानाचे जुने फर्निचर संपर्क-९९२१०१३१२३, इचलकरंजी

**एनए प्लॉट विकणे-** कलेक्टर व तहसिल कबनूरमध्ये फॅक्टरीमागे, गणेश मंदिरमागे, जयहिंदनगर मध्ये शाहूनगर सर्वसोयीसह संपर्क-८१४९९६५६९९, ९८९०२७४१७६

**विकणे आहे.** २६.६३ गुंठे जागा १२ हजार फूट बांधकाम १४० एचपी लाईट बोअर ६० फूट व ३० फूट रोडटच विकणे आहे. संपर्क-९४२२६२२६०८

**विकणे/गहाणवट देणे.** ८०० स्के. फूट जागेमध्ये आरसीसी १ बीएचके घर नवीनच, संगमनगर बिरोबा मंदिरमागे, खोतवाडी. संपर्क-९५०३६४४४१४

**२६४६ स्के. फूट** आरसीसी शेड बांधकाम विकणे आहे. २१/२६६, २४ एचपी लाईट, व्यंकटेश कॉलनीच्या पश्चिमेस, जवाहरनगर, इचलकरंजी. फोन-९८५०९४९०८०

**प्लॅस्टिक पिशवीला** पर्यायी कापडी पिशव्या विविध साईजमध्ये/आकारात वाजवी दरात मिळतील. भेटा- तेज इंडिया समाधान हडलीजवळ, दुबे बिल्डींग, एससी, भोनेमाळ रोड, इचलकरंजी.-९५०९७२७३१७

**प्लॉट विकणे-** रूई, मानेनगर येथील सव्वा सहा गुंठेचा एनए प्लॉट ४ खोल्यासह बोअर, लाईट सर्व सोयीनियुक्त संपर्क-९४२२०३२०११

**अगरबत्ती तयार करण्याचे** मशिन चालू स्थितीत विकणे आहे. संपर्क-८८५७००३६९६

**७४ गुंठे जमीन विकणे आहे.** बस स्टॅन्डजवळ, चिकोडी रोडलगत, बोरगाव कर्नाटक. संपर्क-७०२०६०६३९९

**प्लॉट विकणे-** कोरोची, तारदाळ रोड येथे २७ बाय ६० फूट कलेक्टर एनए प्लॉट विकणे आहे. संपर्क-९९२१६९२९३९

**रोज कपडे वाळत** घालण्याचे हँगिंग स्टॅन्ड, डासांची जाळी, किचन ट्रॉली, कबुतर जाळी, राहुल एंटरप्राईजेस-७५०७७१६६६४, ७७५८९३४१६५

**जनता बँक तारा हॉटेलशेजारी** फास्टफूड कॅफे विकणे आहे. संपर्क-८७८८४१६७७९, इचलकरंजी.

**कबनूर येथे दिड गुंठा** १६ मागाची शिवणी आरसीसी शेड ५८ बाय २६ एनए प्लॉट व १ बीएचके राहतेस विकणे आहे. ८७८८०३३७९२

**जैन फार्म** हाऊस, कोंडिग्रे येथे दर्जेदार नारळ विक्रीस उपलब्ध आहे. संपर्क- ९४२२४१६२६०.

**जुने व नवीन पॉवरलूम** देवू व घेवू, ससेच फवारा कांडिमशिन डस्टींग घेवू व देवू. संपर्क-८३१७२९१००८

**सर्व व्यवसायांना उपयुक्त** अशी न्यू ब्रॅन्ड तयार केलेली ॲपे मॉडीफाय क्लास रिक्षा विकणे आहे. न्यू ब्रॅन्ड डीप फ्रिज विकणे आहे. संपर्क-९९२३६३४९६९

## ✲ नोकरी विषयक ✲

**ऑफिस कामासाठी** कामगार पाहिजे आहे. संपर्क-८३७९९१५९२१

**Required** - Computer Operator B.com. Candidate P.R. Loya and Company (Tax Consultant) Kagwade mala, Ichalkaranji. Contact- (0230) 2421311

**पाहिजेत.** लहान मुलांच्या दवाखान्यात कामासाठी मुलगा/मुलगी पाहिजेत. डॉ. ललित सोमाणी, वंसत कॉलनी, तांबे मळा, इचलकरंजी. फोन-८३२९६९११४६

**कॅशियर पाहिजे.** कपड्याच्या शोरूममध्ये लेडीज किंवा पुरुष पार्ट टाईम/फूल टाईम ट्रेनिंग दिली जाईल. पत्ता- गांधी पुतळ्याजवळ, इचलकरंजी. संपर्क-८६६८९४५३५१

**शासन मान्यताप्राप्त कंपनीमध्ये** आमचे पार्टनर बना व भरपूर मासिक उत्पन्न मिळवा. पार्टटाईम/फूलटाईम करू शकता. विद्यार्थी, नोकरदार, गृहिणी, रिटायर्ड व्यक्ती मार्केटिंग करणारे व्यापारी सध्याच्या कामासोबत अतिरीक्त उत्पन्न करू इच्छिणाऱ्यांसाठी उत्कृष्ट संधी. संपर्क-७७५८०७७६८७

**लेडीज स्टाफ पाहिजे.** वेअर हाऊसमध्ये पार्टटाईम/फूलटाईम. पत्ता- श्री साई समर्थ वेअर हाऊस, आझाद टॉकीज, इचलकरंजी. फोन-९६०७३३५७७७, ७८७५६९९९२४

**व्हीएमसी/लेथ मशिनसाठी** (प्रोडक्शन) स्कील्ड कामगार पाहिजेत. संपर्क- जय महादबा इंजिनिअरींग-९८५०८६६४४२, ८८८८७४७१३७

**मोफत कॉम्प्युटर प्रशिक्षण** योजने अंतर्गत ५० बॅचेसना प्रवेश सुरू १०० % नोकरी व व्यवसायाभिमुख प्रशिक्षण. Graphic Design, Ms-Office, Tally Prime with GST, Advance Excel कोर्सेसना प्रशिक्षण, दर्जेदार व सखोल प्रशिक्षण, नाममात्र नोंदणी फी. युनिव्हर्स कॉम्प्युटर- पत्ता- इचलकरंजी बस स्टॅन्डजवळ, बँक ऑफ महाराष्ट्रसमोर. - संपर्क-९२८४२६४९८०

**फायनान्स कंपनीसाठी** फिमी एजंट जागा-१० व सेल्स एक्झीक्युटिव्ह जागा-६, लेडीज/जेंटस (पार्ट/फूल टाईम) व सर्व्हेसाठी ५० मुले/मुली पाहिजेत. संपर्क-७०२०१७८७५५

**रंगाच्या दुकानात** कामासाठी कामगार पाहिजेत. संपर्क- नवभारत पेंटस, बंगला रोड, इचलकरंजी. फोन-९८२३१८१४४८

**ड्रायव्हर पाहिजे.** बोलेरो व पिकअप व्हेंकर ड्रायविंग कम हमालीसाठी. संपर्क-८८०५५३२२४४

**जीओ एअर फायबर कंपनीमध्ये** टेक्नीशियन पाहिजेत. आकर्षक पगार+इन्सेंटिव्ह, १२ वी उत्तीर्ण, टू व्हीलर आवश्यक. संपर्क-९२७२३४६२४१, ८९९९३१२९७१

**एक्सपोर्ट-इम्पोर्ट कामासाठी** अनुभवी सेल्समन पाहिजे. लेडीज/जेंटस. पार्वती इंडस्ट्रियल इस्टेट, यड्राव. ९९२३०३४००६, ८२०८६३७७७६

**ऑफिस कामासाठी** विवाहीत लेडीज टायपिस्ट पाहिजे. इंग्रजीचे ज्ञान आवश्यक. संपर्क- वारणा बँकेशेजारी, राजाराम स्टेडियम रोड, इचलकरंजी. फोन-९८३४९८३२१०

**प्लंबर पाहिजे.** प्लंबर १०० व गडी ६०० हजेरीवर कामासाठी. संपर्क-९०६३१७६९१७

**बेकरीसाठी** पार्टटाईम कॅंटर मॅनेजर पाहिजे. किचनच्या कामात आवड असणे आवश्यक. वेळ-५ ते १०. संपर्क-९७६४४६४७५१

**आपले सरकार सेवा केंद्रामध्ये** कॉम्प्युटरवर काम करणेसाठी अनुभवी मुले/मुली पाहिजेत. आकर्षक पगार दिला जाईल. गजानन सी.एस.सी सेंटर. जनता बँक, गावभाग शाखेसमोर, इचलकरंजी. फोन-९७३००८५९३१, ९५५२१००४५५

**कंपनीमध्ये सीएनसी बेंडिंग,** सीएनसी लेजर कटींग मशिनवर हेल्पर कामासाठी मुले/जेंटस पाहिजेत. (अनुभवी/फ्रेश) विनायक हायस्कूलजवळ, शहापूर-७०८३८४८९४६




**अकौंन्टट पाहिजे. टेक्स्टाईल पेढीवर** HITRIEX सॉफ्टवेअर करीता लेडीज अकौंन्टट पाहिजे. जीएसटी व टीडीएस चा अनुभव आवश्यक. गौतम सिंडीकेट, फिरंग गेंससमोर 'चंद्रा' बिल्डींग. मो. ९९२२५१९९९९

**डिलेव्हरी बॉय पाहिजे.** डॉमिनोज पिझ्झा येथे आकर्षक पगार, गाडी पेट्रोल कंपनीचे संपर्क-८६२३०३६०२१, ८३९०३६११९४

**पाहिजेत.** अब्दुल लाट मधील नामवंत ऑलम्पियाड ॲकॅडमीमध्ये ८, ९, १० वीसाठी गणित शिक्षक हवेत. पात्रता- बी.एससी, बी.एड. संपर्क-९६७३९२२६६६

**इलेक्ट्रॉनिक्स शोरूममध्ये** अकाउंट डिपार्टमेंटमध्ये बँक ऑफिस कामासाठी लेडीज पाहिजे. कॉम्प्युटर नॉलेज आवश्यक. ९३२५४२३७४०

**इचलकरंजी व कोल्हापूर येथे** इलेक्ट्रॉनिक्स शोरूममध्ये सेल्स डिपार्टमेंटमध्ये अनुभवी सेल्समन पाहिजेत. पगार-१३ ते २५००० अनुभवानुसार. ९२२६८८१४७०

**पाहिजे.** शिकाऊ महिला/पुरुष-२ जागा. पत्ता- पायोनियर इंजिनिअरींग, आरगे भवनसमोर, विक्रमनगर, इचलकरंजी.८२३७०९५५०८

**कामगार पाहिजेत.** शॉपमध्ये कामासाठी मुले व मुली पाहिजेत. फूलटाईम. संपर्क-सन्मित्र शॉपी, जनता चौक, इचलकरंजी. फोन-९०९६९६००६०, ९६३७५११००५

**पाणी आणि कोल्ड्रींक फॅक्टरीमध्ये** त्वरीत सेल्स मॅनेजर नेमणे आहे. अनुभवीस प्राधान्य. सुरेखा मार्केटिंग, रूई. फोन-७७४४८३८३३४

**सिक्युरिटी गार्ड पाहिजेत.** आकर्षक पगारासह डे/नाईट फिक्स ड्युटी. कोरोची शाहू पुतळा, शहापूर-इचलकरंजी परिसर. संपर्क-९६८९५६४००४, ९३२६६३३४४५

**S.P.Engineers&Suppliers** Vacancy-1) Sales Engineers-BE electrical Diploma in electrical engineer 2) Marketing Person- BE electrical Diploma in electrical engineer 3) Salesman- 10 th, 12 th pass. Attractive Salary. Contact 9561160349

**टू व्हीलर पार्किंगसाठी** कामगार पाहिजे. डे/नाईट. ८ तास ड्युटी. संपर्क-८२३७७४४४४४

**सीएनसी ऑपरेटर पाहिजेत.** शिकाऊ/अनुभवी पार्टटाईम जेंटस/लेडीज, मगरे हायस्कूलजवळ, इचलकरंजी. मो. ९५२७४९११००, ९७६६२९३३६२

**गरजू व शिकाऊ कामगार पाहिजेत.** साखरपे हॉस्पिटल समोर, कालीका साऊंड. संपर्क-९१३०९६२९०१

**ड्रायव्हर पाहिजेत.** हातकणंगले सिमेंट पाईप टेम्पो ४०७ गाडीवर हेवी लायसनधारक निवम एंटरप्राईजेस हातकणंगले. संपर्क-९८९०३०४६०८

**भरणी/उतरणीसाठी** हमाल पाहिजे. समक्ष भेटा. सरस्वती ट्रेडर्स, सरस्वती मार्केट, इचलकरंजी.

**पाहिजे.** फिनीश कापड माल गोडावूनमध्ये हेल्पर कामगार पाहिजे. आकर्षक पगार मिळेल. संपर्क-मो. ९६७३८३४९१२, ९८२३४५६८५७

**ऑफिसमध्ये साफसफाईसाठी** पुरुष/महिला कामगार पाहिजे. संपर्क- मो. ९६७३८३४९१२, ९८२३४५६८५७

**माने कॉर्नर येथे** असिस्टंट अकौंटंट पाहिजे-१ जागा. जीएसटी, इन्कम टॅक्स व टॅली-३ वर्ष अनुभवी. संपर्क-८७१३०९१२९९

**फॅब्रिक/व्हीविंग पर्चेस साठी** पार्टटाईम किंवा फूलटाईम अकौंटंट पाहिजे. संपर्क-७२७६०१३६१४

**स्वयंपाकासाठी बाई हवी.** सकाळ व दोन वेळच्या जेवणासाठी अनुभवी व विश्वासू स्वयंपाक करणारी बाई हवी. पत्ता- राधाकृष्ण चौक, रॉयल प्लाझा बिल्डींग, इचलकरंजी. संपर्क-८२६१०७७५००, ७१०२६७७३४७

**बारसाठी वेटर पाहिजेत.** फूलटाईम/पार्टटाईम. संपर्क-७५८८६२०५०५, ९८५०५९६९६५

**रेडिमेड कपड्याच्या दुकानामध्ये** अनुभवी/शिकाऊ गरजू सेल्समन पाहिजेत. संपर्क-नटराज ड्रेसेस, हॉपिंगसेंटर, इचलकरंजी. मो. ८५५२००३२६४

**प्रोसेसमध्ये दिवानजी कामासाठी** मुलगा पाहिजे. कॉम्प्युटर नॉलेज हवे. संपर्क-९५७९९९९७४३

**केबल लाईनवर काम** करणेसाठी माणूस पाहिजे. संपर्क-९४०५२५१९२२

**कागल फाईव्ह स्टार** एमआयडीसी परिसरातील नामांकित एअरजेट युनिटसाठी अनुभवी प्रॉडक्शन इंजिनिअर हवा आहे. आकर्षक पगार टोयोटा ९१० ई शेड मशिनचे लूम सेटींग, यार्न कॅल्क्युलेशन, एसी प्लांट व कॉम्प्रेसर मेंटेनन्स ज्ञान आवश्यक. संपर्क-८६५१२६८८८९९

**सीएनसी, व्हीएमसी ऑपरेटर** व क्वॉलिटी इनचार्ज व प्रोग्रॅमर पाहिजे. संपर्क-८४३२७७७१०७

**सायझिंगसाठी** १ टनी बॉयलरवर फायरमन पाहिजे व बीम सायझर वार्पर पाहिजे. ९८२३४०९९८८

**आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये** सफाई कामासाठी १ मावशी, पंचकर्म थेरपिस्ट-१, मुलगा व मुलगी- शिक्षण-१२ वी, एएनएम. वयोमर्यादा-१८ ते ३० वर्ष. संपर्क-८८८८५११५२२

**नामांकित पिझ्झा आऊटलेटमध्ये** स्टाफ भरती चालू आहे. अनुभवी/शिकाऊ. पत्ता-सुंदरबाग व बजाज शोरूमजवळ, इचलकरंजी. संपर्क-८५३०३९५९६०, ९८२२५८०५६६

**जेंटस कामगार पाहिजेत.** ऑफिस व इतर कामासाठी. संपर्क-९१६८८७७८५५

**एअरटेल कंपनीमध्ये** मुला मुलींची भरती. मुलगी-१, मुले-२, ठिकाण- हुपरी, गोकूळ शिरगांव, मुडशिंगी, गांधीनगर. आकर्षक पगार+इन्सेंटीव्ह. संपर्क-७०६७९६९३३३, ७२११९४६६६६

**पार्वती इंडस्ट्रियल इस्टेट,** यड्राव येथील सायझिंग मिलसाठी खालील पदांसाठी अनुभवी उमेदवार हवे आहेत. ✲ बॉयलर फायरमन ✲ बॉयलर हेल्पर ✲ आयटीआय इलेक्ट्रीशियन ✲ सायझिंग फिटर. संपर्क-७७२००१८४०६

**पाहिजेत.** पार्वती इंडस्ट्री मधील नामांकित कंपनीमध्ये अनुभवी ऑफिसबॉय पाहिजे. संपर्क-७७२००१८४०६

**Required Engineer-** Edu-Diploma/B.E. B.Tech. (Computer, IT, Hardware & Networking) Experience 1-3 Years. (Freshers can also apply) Location- Parvati Industrial Estate, Yadrav) Contact- 7720018406

**Require-** Audit Assistant have with Commerce and Computer Knowledge. Contact- 9595757500, 9422046871

**ऑफिस कामासाठी** प्रामाणिक मुलगा किंवा मुलगी पाहिजे. पत्ता- मालती माधव प्रेस्टिज, पुजारी मळा, इचलकरंजी. फोन-७१७५३९११५५

**दुकानात काम करणेसाठी** अनुभवी/शिकाऊ मुले व कामगार पाहिजेत. संपर्क- सोसायटी इलेक्ट्रीकल, इचलकरंजी. फोन-९४२११००५५५

**फौंड्रीमध्ये अकौंटींग व सुपरव्हीजन** करणेसाठी टॅलीची माहिती असणारा हुशार व अनुभवी जेंटस पाहिजे. संपर्क-८२६१९३१११७

**अण्णाज फॅशन शॉपमध्ये** बिलींग करण्याकरीता बिलर पाहिजे. पगार- ८ ते १० हजार. कबनूर, इचलकरंजी. संपर्क-९५६१७१४२६२.

**पीकअप बोलेरो गाडीवर** ड्रायव्हर+हमाल पाहिजे. पगार- अंदाजे १ महिना ३००००/- जयकिसान पशुखाद्य, डॉ. बडबडे हॉस्पिटल, सांगली रोड, इचलकरंजी. ९४२२०४४२९२

**A Fast Growing-** Hospital/ Laboratory Equipment Distributor Require. Office co-ordinator-Female-01. Any Graduate with Relevant Experience May apply. Contact- 9850333396/ 9371718001

**गोडाऊन कामासाठी** व ऑफिससाठी मुलगा पाहिजे. संपर्क-८७८८८९२७७७, ८६९८२८७३९७, इचलकरंजी.

**चार्टर्ड अकौंटंट फर्ममध्ये** ऑर्डर असिस्टंट पाहिजे. बी.कॉम, टॅली चे ज्ञान आवश्यक. Email.mrutturkar@yahoo.co.in

**पाहिजे.** शेती कामातील अनुभव असलेला दिवाणजी पाहिजे. बीएससी ॲग्री किंवा डिप्लोमा यांना प्राधान्य. संपर्क-९८२३३२२७६६

**फूल टाईम कामासाठी** हुशार व अनुभवी वेटर पाहिजेत. (राहण्याची व जेवणाची सोय) हॉटेल प्रतिनिधी, इचलकरंजी. ९३७१५८७७७७

**बारमध्ये वेटर पाहिजेत.** आकर्षक पगार दिला जाईल. संपर्क-अक्षय पवार-८६०५९९०२९४

**सेल्समन पाहिजे.** शिकाऊ/अनुभवी मॉडर्न इलेक्ट्रॉनिक्स, सम्राट अशोक नगर, आवळे मैदानजवळ, इचलकरंजी. ९८९०५७७०७८

**पाहिजेत.** ॲटोकॅड, आयटीआय ड्राफ्टमॅन ड्राईंगसाठी पाहिजेत. भेटा-परफेक्ट लेसर्स, कोरोची. ८७९३५४४४९७, ९३२६१०७६४४

**नोकरीची सुवर्णसंधी** सेल्स आणि डेटा कलेक्शन एक्झिक्युटिव्ह लेडीज, जेंटस मासिक फिक्स पगार अथवा कमिशन दुचाकी, लायसन्स, ॲन्ड्राईड मोबाईल आवश्यक. संपर्क-९०२२३३८३५८, ८८३०३९५८९३

**भारत वॉच** कंपनी अनुभवी सेल्समन/सेल्सगर्ल पाहिजे. आकर्षक पगार मिळेल. मो. ७२७६७३४१०९

**लोटस पार्कमधील** नवीन सायझिंग युनिटकरीता दिवाणजी पाहिजे. संपर्क- ओंकार ७७५८९८७८४५.

**मॅक्सड्राईव्ह मोटर्स यड्राव** या नामांकित कंपनीमध्ये टर्नर, सीएनसी, व्हीएमसी ऑपरेटर, हेल्पर पाहिजेत. शिकाऊ/अनुभवी. संपर्क-९३०९३६९८७७

**फॅब्रिकेशन व हॉस्पिटल** फर्निचर तयार करणेसाठी हेल्पर, Co2 वेल्डर, ऑरगन वेल्डर भरती सुरू आहे. संपर्क-९०२१२०२७३१

**कोरोचीमधील** नामांकित ॲकॅडमीमध्ये १ ली ते ४ थी आणि ५ वी ते ८ वी वर्गासाठी शिक्षक भरणेचे आहे. ७०२०४६९०२५

**गारमेंट व मॅनेजमेंट** कामासाठी लेडीज ऑपरेटर पाहिजेत व प्रिंटींगसाठी लेडीज पाहिजेत. मलाबादे चौक, शहापूर. संपर्क-८७८८६४६३२५.

## ✲ कर्ज विषयक ✲

**वाहन कर्ज,** जुन्या २०१४ मॉडेल पुढील कार, टेम्पो, ट्रक, जेसीबी, क्रेन, (ट्रॅक्टर २००८ मॉडेल पुढील) कर्ज उपलब्ध. ७०३८८१८५८४

**होमलोन-**फ्लॅट, बंगला, प्लॉट, दुकानगाळा खरेदीसाठी लोन. हॉटेल, लॉज, हॉस्पिटल, शाळा, कॉलेज, इंडस्ट्रियल. प्रॉपर्टी मॉरगेज लोन. ७७९६१०९५५५

**पर्सनल लोन-** बिझनेस लोन, डॉक्टर लोन, कमीत कमी कागदपत्रे, जास्ती मुदत, जलद कर्ज मंजुरी. ९६३७९५५५९९

## ✲ बांधकाम विषयक ✲

**सिव्हील इंजि.-** DCE, B.Tech Civil, कन्सल्टींग, २ डी/३डी डिझाईन, बँक लोनसाठी ब्ल्यू प्रिन्ट, इस्टीमेट. ऑफिस- मो. ८७६६८७३७४९

## ✲ आरोग्य विषयक ✲

**प्रचंड गुडघे दुखी-** कंबर, मान, पाठदुखी, लकवा मारला/उठता बसता चालता येत नसेल तर अत्यंत जालीम आयुर्वेदिक औषध मिळेल. ९६०४८२४३६५

## ✲ व्यवसाय विषयक ✲

**शेअर मार्केट-** सोप्या पद्धतीने माफक किंमतीमध्ये अनुभवी तज्ञांकडून सहज शिका. प्रॉफिट फर्स्ट, कल्पना टॉकीजसमोर. ९६६५४०८८२८, ७७६८९५००२१

## ✲ भाड्याने देणे/घेणे ✲

**शाहू कॉर्नर मुख्य बिल्डींगमधील** दुकानगाळे, पतसंस्था, ऑफिस, दुकानाकरीता भाड्याने देणे. संपर्क-९४२२०४४९१४, ९१७५८३३९३९

**भाड्याने किंवा गहाणस्वरूपी** दोन रूम सर्वसोयींनी देणे आहे. ठेकन उत्तर बाजूस, दत्तमंदिरजवळ. मो. ९८८११९८२८१० शहापूरकर

**दुकानगाळा भाड्याने देणे.** उत्तरमुखी, यशवंत प्रोसेससमोर, डॉ. काजवे हॉस्पिटल बिल्डींग, इचलकरंजी. संपर्क-९४२३०४१०२०

**स्वतंत्र बंगल्यातील** सर्वसोयींनीयुक्त चार रूम पहिला मजला व चार रूम तळ मजल्यावरील फोर व्हीलर पार्किंगसह एकत्रित अथवा वेगवेगळे श्रीपादनगर, इचलकरंजी येथे (छोट्या फॅमिलीसाठी) भाड्याने देणे. ८०८०१७६१६१

**गाळे रोडटच भाड्याने देणे.** १२ बाय १६, १० बाय २५ पीटनाळा, संडास बाथरूम चौकशी-चैतन्य दवाखाना, थोरात चौक,८/३२३, शहापूर रस्ता, विक्रम नगर, इचलकरंजी. ९४२००१०१५०, ९१७५१०८६२९

**२ बीएचके फ्लॅट** भाड्याने देणे आहे. हत्ती चौक, इचलकरंजी. फोन-९४२२०७६४६६

**३ रूम भाड्याने देणे.** आरसीसी सर्व सोयीनियुक्त कबनूर, इंदिरा कॉलनी, वोळी डॉक्टर शेजारी. फोन-९२७०७७५६१२

**खंजिरे इंडस्ट्रियल इस्टेटमध्ये** ४५०० व ५५०० फूटाचे दोन शेड एकत्रित/वेगवेगळे भाड्याने देणे. संपर्क-९३२६००६३६६

**बंगला भाड्याने देणे.** २४ तास पाणी, वेल फर्निश्ड फोर व्हिलर पार्किंगची सोय असणारा बंगला भाड्याने देणे. (शाकाहारी कुटूंबासाठी) सारथी बिल्डींग, सरस्वती कॉलनी, मारूती शोरूमजवळ, कोल्हापूर रोड, इचलकरंजी. म्हेतर सर-९४२११०८०५६

**भाड्याने देणे-** फॅथॉलॉजी लॅब, ॲक्युप्रेशर उपचार, फिजीओथेरपी दंतवैद्यक इ.साठी उपयुक्त १ बीएचके भाड्याने देणे आहे. संपर्क-९४२३८०००११, इचलकरंजी.

**भाड्याने देणे.** साधे डबल रूम सर्वसोयीनियुक्त छोट्या कुटूंबासाठी नदी रोड, गुरूकृपा रेडिमेडस, इचलकरंजी. संपर्क-भोसले-९५१८५४३६९५

**भाड्याने देणे.** जवाहर नगर, कोल्हापूर बेकरीमागे, सर्व सोयीनियुक्त १ बीएचके+ओपन टेरेससह फ्लॅट. संपर्क-९६६५४९३२६५, ९८९०२३६६२७

**लोकमान्य नगर,** कोरोची येथे ५६'' २० पॉवर लूम शेडसहीत चालू स्थितीत त्वरीत भाड्याने देणे आहे. संपर्क-८६२५०६५०१९, ८६२४९४१८३४

**२ बीएचके फ्लॅट** सर्वसोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. आदिनाथ हौ. सोसायटी, इचलकरंजी. उपाध्ये-९६०७१०३६७९ (फक्त शाकाहारीसाठी)

**२०० सिटींग कॅपेसिटी असलेला** बार रेस्टॉरंटमधील संपूर्ण सेट असलेला फक्त जेवण विभाग चालविण्यास देण्याचे आहे. यड्राव फाटा, इचलकरंजी, सांगली रोड. ७०६४९४२२५१

**गांधी कॅम्पमध्ये** २५० फूटाचा पुल्ल फर्निश गाळा भाड्याने देणे आहे. २ लाख डिपॉझिट, १७००० भाडे. कॉंटॅक्ट. मो. ७२७३८०३३३३

**विद्यार्थ्यांसाठी कॉट बेसिसवर** रूम भाड्याने मिळतील. फक्त मुलांसाठी. सांगली नाका, अभय दूध डेअरीमागे, इचलकरंजी. ९८२३०८१६८१, ७८४१८२२१७२

**शेड भाड्याने देणे.** आरसीसी २००० स्के. फूटाचे २ शेड व २ बीएचके नवीन महानगरपालिकाजवळ, इचलकरंजी. फोन-९६६५०३८६७७

## वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

# विजेचा धक्का लागून शेतकऱ्याचा मृत्यू

**शिराळा, ता.९ (प्रतिनिधी)**

**शिराळा तालुक्यातील भैरवाडी येथील बाजीराव रामचंद्र सुर्यवंशी (वय ५३) यांचा जनावरांच्या शेडमध्ये विद्युत मोटरचा शॉक लागल्याने दुर्दैवी मृत्यू झाला.**

माहितीनुसार, बुधवारी सायंकाळी ६ वाजण्यापूर्वी ही घटना घडली. जनावरांच्या शेडमध्ये असताना विद्युत मोटरचा शॉक लागल्याने बाजीराव सुर्यवंशी हे गंभीर जखमी झाले. त्यांचे भाचे रविंद्र सुर्यवंशी यांनी त्यांना तत्काळ उपचारासाठी ईश्वरपूर येथील कोयना हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र, रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. याप्रकरणी कोयना हॉस्पिटलचे डॉ. मुबीन मोमीन यांनी दिलेल्या माहितीवरून शिराळा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.



अतिक्रमण काढताना कर्मचारी.

# गंजीगल्ली ते बढी मस्जिद परिसरात अतिक्रमणावर कारवाई

**कोल्हापूर, ता.९ (प्रतिनिधी)**

**महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकामार्फत गंजीगल्ली ते बढी मस्जिद परिसरात धडक कारवाई करत अनधिकृत साहित्यांवर गुरूवारी कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये हातगाडीसह इतर साहित्य जप्त करण्यात आले. महानगरपालिकेच्या ठरावानुसार अतिक्रमण कारवाईदरम्यान जप्त करण्यात आलेले अनधिकृत साहित्य संबंधित व्यवसायधारकांना परत न देण्याचा निर्णय घेण्यात आला असून जप्त करण्यात आलेले साहित्य कायमस्वरूपी जप्त करण्यात आले आहे.**

ही कारवाई आयुक्त डॉ.राजेंद्र भारूड यांच्या आदेशानुसार करण्यात आली. आजची मोहिम उपआयुक्त किरणकुमार धनवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. या कारवाईमध्ये सहा.आयुक्त स्वाती दुधाणे, उपशहर अभियंता सुरेश पाटील, कनिष्ठ अभियंता सागर शिंदे, संजय नागरगोजे, अतिक्रमण प्रमुख प्रफुल्ल कांबळे, कनिष्ठ लिपीक सजन नागलोत तसेच अतिक्रमण, विभागीय कर्मचारी व लक्ष्मीपूरीकडील पोलिस कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

# अपघातातील मृताच्या कुटूंबास ७ लाख १० हजार भरपाईचा आदेश

**राधानगरी,ता.९**

**राधानगरी- गुडाळ दरम्यान मृताच्या चुकीमुळे अपघात होऊनही मयताच्या कुटुंबास ७ लाख १० हजार भरपाई देण्याचा आदेश न्यायालयाने दिला.**

येथील सुशांत सुरेश पाटील (वय २३) हे मोटारसायकलवरून गुडाळला जात असताना बस (एमएच -१२-सीएच -७७१७) ची धडक झाल्याने तो सुशांत पाटील याचा मृत्यू झाला होता.

पोलीस तपासात सुशांतच्या स्वत:च्या निष्काळजीपणामुळे वाहन चालवून तो स्वत:च मृत्यूस कारणीभूत ठरल्याचा गुन्हा पोलिसात दाखल झाला होता. अपघात नुकसान भरपाई मंजूर करण्याकामी ॲड.सी.बी. कोरे (रेंदाळकर) यांनी काम पाहिले.



रेंदाळ गावचे कवी महंमद नायकवाडे यांच्याकडे १५०००रूपयांचा चेक प्रदान करताना ॲड. सी. बी. कोरे.

# रेंदाळ कलाकारांचे गाव पुस्तक प्रकाशनास १५ हजारांची देणगी

**रेंदाळ,ता.९-**

**रेंदाळ कलाकारांचे गाव पुस्तक प्रकाशनासाठी ॲड. सी.बी. कोरे यांनी १५ हजार रूपयांची देणगी प्रकाशक महंमद नायकवाडे यांच्याकडे सुपुर्द केली.**

मागील १५० वर्षापासून ३ पिढ्यांमधील अचूक माहिती संकलीत करून प्रचंड कष्ट आणि श्रम करून रेंदाळ गावची माहिती व इतिहास प्रसिध्द व्हावा, असा ध्यास उरी बाळगून नायकवाडे हे मागील बरीच वर्षे प्रयत्न करीत होते. पुस्तकाच्या छपाईसाठी पैशाची गरज असल्याने ॲड. सी. बी. कोरे यांनी रेंदाळ गावची माहिती पुस्तकरूपाने प्रकाशित होण्यासाठी देणगीचा धनादेश नायकवाडे यांच्याकडे दिला. इतकेच नाही तर पुस्तक प्रकाशन सोहळा विठ्ठल मंदिर रेंदाळच्या हॉल मध्ये दिमाखात पार पाडण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे अभिवचन यावेळी दिले.लवकरच पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम होईल, असे महंमद नायकवाडे यांनी सांगीतले.

# गोरड वस्तीतील पाणंदवजा रस्त्याची दुरवस्था

### ग्रामस्थांचा संताप

**सातवे ता. ९ (प्रतिनिधी)**

**सातवे गावातील गोरड वस्तीला जोडणाऱ्या पाणंदवजा रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस अधिकच बिकट होत असून, पावसाळ्यात ग्रामस्थांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना अनेक कुटुंबे वास्तव्यास असून, रोजच्या ये-जा करण्यासाठी हा एकमेव मार्ग आहे. मात्र, सततच्या पावसामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल साचला असून ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांत पाणी भरल्याने वाहतूक धोकादायक बनली आहे.**

रस्त्यावरून दुचाकी, चारचाकी तसेच पायी प्रवास करताना नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे. चिखलामुळे वाहनांचे संतुलन बिघडत असून, घसरून अपघात होण्याची भीती कायम आहे. नवीन वाहनचालकांना तर या रस्त्यावरून प्रवास करणे धाडसाचे ठरत आहे. वाहन समोरासमोर आल्यास बाजूला होण्यासाठी जागा नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

# अनुदानच्या आमिषाने लाखोंची फसवणूक; संशयिताला अटक

कोल्हापूर,ता.९(प्रतिनिधी)–

**राजारामपुरीतील नवव्या गल्लीत सुरू असलेल्या वादाच्या तक्रारीवरून घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी शासकीय अनुदानाच्या आमिषाने शेतकरी व नागरिकांची लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या संशयिताला अटक केली. विशेष म्हणजे, ११२ आपत्कालीन क्रमांकावर आलेल्या एका कॉलमुळे हा संपूर्ण प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी एमबीएस पशु संवर्धन इंडिया लिमिटेड (गव्हर्नमेंट ऑफ इंडिया) या नावाने कार्यालय चालविणाऱ्या नीलेश मारुती गायकवाड (वय ४०,रा. कोल्हापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.**

पोलिस निरीक्षक विकास जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी सायंकाळी राजारामपुरीतील चव्हाण चेंबर येथे दोन गटांमध्ये वाद सुरू असल्याची माहिती ११२ क्रमांकावरून पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. चौकशीदरम्यान हा वाद आर्थिक व्यवहारातून झाल्याचे समोर आले.

तक्रारदार अमोल बाबासो तिरपणकर (वय ४३, रा. सांगवडे, ता. करवीर) यांनी गायकवाड याने जनावरे खरेदीसाठी १० लाखांचे शासकीय अनुदान मिळवून देण्याचे, जनावरांचा विमा करून देण्याचे तसेच विविध सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्याचे आमिष दाखवून अडीच लाख रुपये घेतल्याची तक्रार केली. मात्र, कोणतेही अनुदान मिळाले नसल्याने फसवणूक झाल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले.

चौकशी सुरू असतानाच कार्यालयात काम करणाऱ्या काही कर्मचाऱ्यांनीही गायकवाडविरोधात तक्रारी केल्या. अनेकांकडून पैसे घेतल्याचा आरोप करताना त्यांनी स्वतःचे पगारही थकविल्याचे पोलिसांना सांगितले. त्यानंतर पोलिसांनी गायकवाडला ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता फसवणुकीचा प्रकार समोर आला.

तिरपणकर यांच्या फिर्यादीवरून राजारामपुरी पोलिस ठाण्यात गायकवाडविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. गुरुवारी त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने १५ जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक रुपेश इंगळे करीत आहेत. प्राथमिक चौकशीत गायकवाड याने शासकीय अनुदान मिळवून देण्याच्या नावाखाली जिल्ह्यातील अनेक गावांतील शेतकरी आणि नागरिकांकडून लाखो रुपये उकळल्याचे समोर येत आहे. अमोल तिरपणकर यांच्याशिवाय अशोक पाटील आणि श्रीपती देसाई यांचीही प्रत्येकी अडीच लाख रुपयांची फसवणूक झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे.

सांगवडे गावातील २० ते २५ शेतकरी फसवणुकीचे बळी ठरल्याची चर्चा असून, आजरा, चंदगड आणि अन्य भागांतही अशाच प्रकारे पैसे घेतल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे या गुन्ह्याची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

## फास्टॅग अपडेटच्या बहाण्याने महिलेची फसवणूक

मिरज, ता.९ (प्रतिनिधी)–

**फास्टॅग आणि बँक खात्याचा बॅलन्स अपडेट करून देण्याचे आमिष दाखवत एका अज्ञात सायबर भामट्याने महिलेच्या बँक खात्यातून ऑनलाईन पद्धतीने तब्बल ८५ हजार रुपये लंपास केल्याची घटना महात्मा गांधी चौक पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली.**

माधुरी उमेश देशमुख (वय ५८, रा. यमिन बंगला, पार्श्वनाथ नगर, मिरज) असे फिर्यादी महिलेचे नाव आहे. फिर्यादी यांच्या मोबाईलवर एका अज्ञात व्यक्तीने संपर्क साधून बँक खात्यातील बॅलन्स आणि फास्टॅगशी संबंधित अडचण दूर करून देण्याचे सांगितले. त्याने विश्वास संपादन करून 'कस्टमर सर्व्हिस'च्या नावाचे एक प मोबाईलमध्ये डाउनलोड करण्यास सांगितले.

# 'धूम स्टाईल'ने दागिने पळवणाऱ्या दोघांना अटक

सांगली, ता. ९(प्रतिनिधी)–

**महिलांचे दागिने हिसडा मारून धूम स्टाईलने पळवणाऱ्या लक्ष्मण चंद्रकांत चाळके (वय ३४, रा. चांदोली वसाहत, आष्टा, ता. वाळवा) आणि अमित नानासाहेब बुधावले (वय २७, रा. शहापूर, इचलकरंजी) या दोघांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने पकडले आहे. दोघेही सराईत गुन्हेगार असून त्यांच्याकडून शिराळा व कोकरूड परिसरातील दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.**

शिराळा पोलिस ठाणे हद्दीतील कापरीफाटा येथे दि. २७ जून रोजी मनीषा सुनील पाटील (रा. टोप, ता. हातकणंगले) या पतीसह दुचाकीवरून लग्नकार्य आटोपून जात होत्या. तेव्हा पाठीमागून दुचाकीवरून आलेल्या दोघांनी हिसडा मारून त्यांच्या गळ्यातील दागिने तोडून पलायन केले. या घटनेपूर्वी १६ मे रोजी दुपारी आरळा (ता. शिराळा) येथील महिला गावातील चौगुले मळ्याकडे चालत निघाली होती. तेव्हा दुचाकीवरून आलेल्या दोघांनी महिलेच्या गळ्यातील दागिने हिसडा मारून पलायन केले. याबाबत कोकरूड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता.

पथकातील कर्मचारी सूरज थोरात, संकेत कानडे, ऋषिकेश सदामते, अभिजीत माळकर यांनी सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक माहितीच्या आधारे संशयित दोघांची नावे निष्पन्न केली. दोघांचा ठावठिकाणा शोधत असताना संशयित लक्ष्मण चाळके व अमित बुधावले हे दोघे चोरीचे दागिने विक्रीसाठी लक्ष्मी फाटा परिसरात येणार असल्याची माहिती मिळाली. पथकाने लक्ष्मी फाटा येथे जाऊन पाहणी केल्यानंतर दोघे संशयित थांबलेले दिसले. त्यांना ताब्यात घेऊन झडती घेतली. तेव्हा खिशात सोन्याचे दागिने आढळून आले. दागिन्यांबाबत चौकशी केल्यानंतर कापरीफाटा व आरळा येथे दागिने चोरल्याची कबुली दिली.

**दोघेही सराईत गुन्हेगार**

लक्ष्मण चाळके याच्यावर सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात चेन स्नॅचिंग व चोरीचे गुन्हे दाखल आहेत. तर अमित बुधावले याच्यावर खून, खुनाचा प्रयत्न यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

# कुमठे फाटा येथे दोघांना मारहाण ; चौघांविरुध्द गुन्हा

मिरज,ता.९(प्रतिनिधी)–

**कुमठे फाटा येथे दोघांना बेदम मारहाण करीत एडका व चाकू सारख्या शस्त्राने हल्ला करून जखमी करण्यात आल्याची घटना घडली आहे. याबाबत चौघांविरुध्द मिरज ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.**

ओंकार मारुती बंडगर (वय ३०, रा. भोसे, ता. मिरज) यांनी फिर्याद दिली आहे. बंडगर व त्यांचे मित्र ऋषिकेश भारत यादव हे दोघे यात जखमी झाले आहेत. सुरज सुनील कोळी, उत्कर्ष बाळू हराळे (दोघे रा. भोसे ) व दोघे अनोळखी व्यक्ती अशा चौघांविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. आरोपींनी ऋषिकेश यादव यांच्या दुकानातील मुन्ना नामक कामगारास शिवीगाळ केली होती. बंडगर व यादव यांनी फोन करून सुरज कोळी यांना याबद्दल विचारले. यावर कोळी याने त्यांना कुमठे फाटा येथे भांडण मिटवूया असे सांगून बोलावले.

बंडगर व यादव यांनी कुमटे फाटा येथे जाऊन आरोपींना तुम्ही कामगारांना शिवीगाळ का केली असे विचारले. संबंधित आरोपींनी तुम्हाला लय मस्ती आली आहे म्हणत यादव यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. बंडगर हे सोडवण्यासाठी गेले असता सुरज कोळी, उत्कर्ष हराळे या दोघांनी एडक्याने त्यांच्या पाठीत, डोक्यावर मारले. बंडगर यांनी हात मध्ये घातल्यानंतर हाताच्या बोटावर दुखापत झाली. त्यांच्यासोबत आलेल्या दोघा अनोळखी व्यक्तींपैकी एकाने चाकू सारख्या हत्याराने त्यांच्या ओठावर डाव्या बाजूला मारले. दुसऱ्या अनोळखी व्यक्तीने त्यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण केली.

# कृष्णेच्या पुराचे पाणी औदुंबरच्या दत्त मंदिरात ; दर्शन तात्पुरते बंद

भिलवडी,ता.९(प्रतिनिधी)–

**औदुंबर (ता.पलूस)मध्ये कृष्णा नदीच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ झाल्याने पलूस तालुक्यातील पवित्र तीर्थक्षेत्र औदुंबर येथील श्री दत्त मंदिरात गुरुवारी मध्यरात्री पुराचे पाणी शिरले. मंदिर परिसर जलमय झाल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने श्री दत्तांची मूर्ती मंदिरातील वरील देवघरात हलविण्यात आली असून पुढील आदेशापर्यंत भाविकांसाठी दर्शन व्यवस्था तात्पुरती बंद करण्यात आली आहे.**

गेल्या काही दिवसांपासून सातारा जिल्ह्यासह संपूर्ण कृष्णा खोऱ्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे कृष्णा नदी दुथडी भरून वाहत आहे.

गुरुवारी दुपारी १ वाजता भिलवडी येथील कृष्णा नदी पुलाजवळ पाणीपातळी तब्बल ३५ फूट इतकी नोंदविण्यात आली. त्यामुळे नदीकाठच्या अनेक भागांमध्ये पुराचे पाणी पसरले असून औदुंबर येथील श्री दत्त मंदिर परिसरातही पाणी शिरले आहे.

पहाटेपासूनच पाण्याची पातळी वाढू लागल्याने मंदिर प्रशासनाने तातडीने उपाययोजना करत श्री दत्तांची मूर्ती सुरक्षितस्थळी हलवली. भाविकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत मंदिरातील दर्शन व्यवस्था तात्पुरती बंद करण्यात आली आहे.

समस्त दत्त पुजारी व दत्त सेवाभावी मंडळाने भाविकांना कृष्णा नदीची पाणीपातळी कमी होईपर्यंत मंदिर परिसरात अनावश्यक गर्दी टाळण्याचे आणि प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे.

दरम्यान, प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून पावसाचा जोर कायम राहिल्यास नदीची पातळी आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांनी आणि भाविकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पूरस्थितीची सांगली महापालिकेकडून पाहणी

सांगली, ता. ९(प्रतिनिधी )–
कृष्णा नदीच्या पाणी पातळीत वाढ होत असून गुरुवारी सायंकाळपर्यंत पाणी पातळी ३० फुटांवर गेली होती. या पार्श्वभूमीवर सांगली महापालिकेने खबरदारीचा उपाय म्हणून पूरप्रवण भागांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. गुरुवारी महापौर धीरज सूर्यवंशी यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पुराचे पाणी शहरात शिरत असलेल्या परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. वाढती पाणी पातळी पाहता नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले.

## जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन: जिल्हा कोल्हापूर, तहसिल हातकणंगले पैकी कसबा इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील इचलकरंजी येथील रि.स.नं. ६८०/४ पैकी बिगरशेती प्लॉट नंबर १४ मधील न्यू निर्मला रेसिडेन्सी अपार्टमेंट या इमारतीमधील सेकंड फ्लोअरवरील पश्चिम बाजूची वन बी.एच.के. रहिवासी सदनिका क्र. ९ टी –१ बिल्ट अप क्षेत्र ३६५.० चौरस फुट याचे ३९.९२ चौरस मीटरची मिळकत, याचा इ.म.न.पा.मि.नं. ९/१०२/३/९ (नवीन ९१००००८६) ने नोंद असलेली निवासी सदनिका मिळकत, यांसी षष्ठ: सीमा: पुर्वेस : सदनिका नं. १०– टी २, पश्चिमेस: ओपन स्पेस, दक्षिणेस: टेरेस, उत्तरेसः ओपन स्पेस, खालीः सदनिका क्र. एस–३, वरःआकाश.

येणेप्रमाणे मिळकतीचे मालक श्री. भगवान मुकुंद पवार, सौ. ज्योती भगवान पवार, रा. नवी मुंबई आ.मु. इचलकरंजी यांनी सदरील मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगून संचकार रक्कम स्विकारून करारपत्र लिहून दिलेले आहे. त्याप्रमाणे आमचे स्नेही लवकरच खरेदीखत पूरे करून घेणार आहेत.

२) सबब कोणाचे हरकत तक्रार अगर काही हितसंबंध असतील तर ही नोटीस प्रसिद्ध झाले तारखेपासून सात दिवसांचे आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी कागदोपत्रानिशी समक्ष येवून भेटून खात्री करून द्यावी. अन्यथा आमचे स्नेही खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. म्हणून दिली जाहीर नोटीस, सही, ता. ०९–०७–२०२६ इ.

**श्री. अमित पारिसा वाटेगांवे**
बॉन्ड रायटर
पत्ता– ४/२३७, मोठे तळे, इचलकरंजी.
मो. ९९७५४३७१४९

## जाहीर नोटीस

मौजे लाटवाडी येथील गट नंबर ४६ पैकी क्षेत्र हे ०–४३ आर ची शेत जमिन मिळकत, यासी चतुः सिमा– पुर्वेस – १२ फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस– श्री घनश्यामदास तोतला यांची मिळकत, दक्षिणेस – श्री अमोल बाळगोंडा पाटील यांची मिळकत, उत्तरेस–लाट दत्तवाड रस्ता.. सदरची मिळकत श्री श्रीपाल जकाण्णा बडबडे रा. अब्दुल लाट यांच्या कब्जे मालकीची मिळकत असून सदर मिळकतीचा संचकारपत्र आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्वीकारून करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. ०७/०७/२०२६

**ॲड. आनंद प्रकाश पटवा**
रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी .
मो. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

जि. कोल्हापूर ता. हातकणंगले पैकी मौजे तारदाळ येथील क. ग.नं. ६४० पैकी प्लॉट नं.२३ क्षेत्र १११.५२ चौ. मी. ची खुली जागा व घर मिळकत, यांसी चतुः सिमा पूर्वेस – देशमुख यांची मिळकत, पश्चिमेस – पाटील यांची मिळकत, दक्षिणेस – १९ फूट रस्ता, उत्तरेस – शिंदे यांची मिळकत येणे प्रमाणे चतुः सिमेतील मिळकत श्रीमती सुवर्णा रामचंद्र गावडे रा. तारदाळ यांचे मालकी कब्जे वहिवाटीची आहे.

श्रीमती सुवर्णा गावडे यांनी सदर मिळकत दि आजरा अर्बन को–ऑप बँक, शाखा–इचलकरंजी यांचे कर्जाशिवाय निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा देवून आमचे अशिलांकडून संचकारादाखल भरीव रक्कम स्विकारून खरेदीपूर्व करारपत्र लिहून दिले आहे.

तरी सदर मिळकतीबाबत वर नमूद कर्ज बोजाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, दावा, बोजा, करार अथवा अन्य कोणतेही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असलेस जरूर त्या कागदपत्रांसह खाली सही करणार यांची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ५ (पाच) दिवसात समक्ष भेट घेवून खात्री करून देणेची आहे. मुदतीत कोणाचीही, कसलीही तक्रार न आलेस आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करून घेतील व नंतर कोणाची कसलीही तक्रार चालणार नाही.

म्हणून दिली जाहीर नोटीस. स. ता. ०९/०७/२०२६

**ॲड. आर.एम. मराठे**
कार्यालय– फ्लॅट नं.६, पॅलेस व्ह्यु अपार्टमेंट, झेंडा चौक, इचलकरंजी.
मो–९९२२८३६३३५

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ६५४ पैकी प्लॉट नं. ११ चे क्षेत्र – १२२ – ३० चौ. मी. खुली मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस – प्लॉट नं. १० ची मिळकत, पश्चिमेस – प्लॉट नं. १२ ची मिळकत, दक्षिणेस – २० फुट रस्ता, उत्तरेस–गट नं. ६५५ ची मिळकत. येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही सुनिता अशोक माळी, अशोक सदाशिव माळी व सौरभ अशोक माळी रा. शहापूर यांचे कब्जे मालकीची असुन त्यांनी आमचे अशिलांशी सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागद पत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता–०९/०७/२०२६

**ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने,**
पत्ता– गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,
मो. ७८२०९०९७०५

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ७५४ पैकी प्लॉट नं. २१ चे क्षेत्र – २३२–६५ चौ. मी. खुली मिळकत यासी चतुः सिमा पुर्वेस – प्लॉट नं. २० ची मिळकत, पश्चिमेस – सरकारी रस्ता, दक्षिणेस – सदर गट नं. मधील शिल्लक मिळकत, उत्तरेस – २० फुट रस्ता – येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही अर्जुन मारूती कदम यांचे कडून सुनीता अशोक माळी व सौरभ अशोक माळी यांनी करारपत्राने घेतलेली व त्यांचेकडून स्वप्निल यशवंत आरेकर रा. इचलकरंजी यांनी करारपत्राने घेतलेली असुन त्यांनी आमचे अशिलांशी सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे करारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागद पत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस . सही ता . ०९/०७/२०२६

**ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने,**
पत्ता– गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,
मो. ७८२०९०९७०५

## जाहीर नोटीस

मौजे कबनुर येथील गट नं. ७२९ /अ पैकी प्लॉट नं. ३४ चे क्षेत्र – २३२–०४ चौ. मी . खुली मिळकत यासी चतुः सिमा पुर्वेस – अमर मुजावर यांची मिळकत, पश्चिमेस – २० फुट रस्ता, दक्षिणेस – ३० फुट रस्ता, उत्तरेस – सदर गट नं. ची शिल्लक मिळकत येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही भारती चन्नाप्पा पोवार रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची असुन त्यांनी आमचे अशिलांशी सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे . तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागद पत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस. सही ता.०९/०७/२०२६

**ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने,**
पत्ता– गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,
मो. ७८२०९०९७०५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिल डॉ. संतोष शिवाजी कांदेकर रा. तारदाळ ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांनी दिली माहिती व दाखविले कागदपत्रानुसार जाहिर नोटीस देणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन– इचलकरंजी महानगरपालीका हद्दीतील सि.स.नं. ७२३१/अ क्षेत्र २५२.० चौ.मी. या मिळकतीवर भाहामाने डेव्हलपर्स तर्फे बांधणेत आलेल्या ''सरस्वती टॉवर'' या निवासी व वाणिज्य बहुउद्देशीय इमारतीमधील सेकंड फ्लोअर दुसरा मजला मधील (१) ऑफीस युनिट क्र. २०३ याचे बिल्टअप क्षेत्र २५.७५० चौ. मी. कॉमन एरिया ७.८९ चौ.मी. वापरा योग्य क्षेत्र ३०.४३ चौ.मी. जमीनीतील अविभाज्य हिस्सा २.५२०%

२) ऑफीस युनिट क्र. २०४ यांचे बिल्टअप क्षेत्र २३.७७० चौ.मी. कॉ. एरिया ७.२८ चौ.मी. वापरायोग्य क्षेत्र २८.०७ चौ.मी. जमिनीतील अविभाज्य हिस्सा २.३२६ %

३) ऑफीस युनिट क्र. २०५ याचे बिल्टअप क्षेत्र २७.१६० चौ.मी. कॉ. एरिया ८.०७ चौ.मि. वापरायोग्य क्षेत्र ३१.१४ चौ.मी. जमिनीतील अविभाज्य हिस्सा २.६५८ %. सदर मिळकती एकास एक लगत असून ,एकत्रित षष्ठ:सिमा –पूर्वेस– इमारतीची साईड मार्जिन, पश्चिमेस– ऑफिस युनिट २०२, दक्षिणेस– इमारतीचे साईड मार्जिन, उत्तरेस– पॅसेज, वरती– ३ रा मजला फ्लॅट युनिट ३०२ खाली दुकान गाळा नं. १०३ ते १०५

येणेप्रमाणे वहिवाटीच्या सर्व हक्कासह मिळकत.

२) वर नमुद चतुःसिमेतील मिळकत हि भाहामाने डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. चंद्रकांत धनपाल भागाजे, तानाजी तातोबा हराळे, श्रेणीक दादासो मगदूम, मिलींद मारूती नेमिष्टे यांनी डॉ. संतोष शिवाजी कांदेकर रा. तारदाळ ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांना रजि. खरेदीपत्राने खरेदी देण्याचे ठरलेले आहे, त्याकरीता आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे मालक भागीदार डेव्हलपर्स यांना संचकारपोटी भरीव रक्कम दिलेली आहे. व तसा खरेदीचा करारही आमचे अशिलांचे नांवे वर नमुद केले मिळकतीचे मालक भागिदार यांनी करून दिला आहे व मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा दिला आहे. तरी या सदर जाहिर नोटीसीने सर्वांना कळविण्यात येते की वर नमुद मिळकतीसंदर्भात कोणाचेही कसलेही हक्क अधिकार उदा. खरेदीपत्र, बक्षिसपत्र, कर्जबोजा, कब्जागहाण, तारणगहाण, मृत्यूपत्र इ. स्वरूपाचे हितसंबंध असलेस त्यानी योग्य ती कागदोपत्री पुराव्यानीशी सदर नोटीस जाहिर झाले पासून ७ दिवसाचे आत आमचे खाली नमुद केले पत्यावर भेटून तशी लेखी खात्री करून द्यावी, तसे न केलेस सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी आहे असे मानून आमचे अशिल नोंदणीकृत खरेदी व्यवहार पुर्ण करतील मुदतीनंतर येणाऱ्या तक्रारी आमचे अशिलांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. यांची नोंद घ्यावी म्हणून दिली जाहीर नोटीस. दि. ०७/०७/२०२६

**ॲड. बी. आर. कुंभार**
रा. अकिवाट, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
मो.नं. ९८८१२१८००२

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नंबर ६१८ प्लॉट नंबर ६ चे क्षेत्र १६० – ३१ चौ. मिटर ची मिळकत यासी चतुः सिमा– पुर्वेस – प्लॉट नंबर ५. पश्चिमेस – प्लॉट नंबर ७, दक्षिणेस – २० फुट रस्ता. उत्तरेस– श्री राजु साळुंखे यांची मिळकत. सदर मिळकत श्री. राकेश पभुसिंग मलके. रा. पुणे यांचे कब्जे वहीवाटीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारून करुन दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता.०६/०७/२०२६.इ

**ॲड. आनंद प्रकाश पटवा**
रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी .
मो. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ३०४ पैकी समजुतीच्या नकाशाप्रमाणे प्लॉट नं. ३९ चे क्षेत्र ९२.९३ चौरस मीटर खुली जागा मिळकत, यासी चतुः सिमा– पुर्वेस – प्लॉट नंबर ४०, पश्चिमेस – प्लॉट नंबर ३८, दक्षिणेस – प्लॉट नंबर २३ व २४, उत्तरेस – रस्ता, सदरची मिळकत ही श्री बसाप्पा सिध्दप्पा पुजारी व सलमा शब्बीर मुल्ला रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना संचकारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात अन्य कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता. ०७/०७/२०२६

**ॲड. आनंद प्रकाश पटवा**
रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी .
मो. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन :– जिल्हा कोल्हापूर तालूका शिरोळ पैकी यड्राव येथील गट नं. ५२५ / २ याचे क्षेत्र हे. ४= ३१ आर, आकार रू. ३=८४ पै. यापैकी बिगरशेती प्लॉट नं. १२ क्षेत्र १०५ चौ. मी. (११३० चौ. फूट) ( खरेदीपत्राप्रमाणे क्षेत्र) (ऑनलाईन ७/१२ उताऱ्याप्रमाणे क्षेत्र हे. ० = ०१.०५ आर) ची खुली मिळकत यासी चतुःसीमा पूर्वेस – गट नं. ४७२ ची मिळकत, पश्चिमेस – रस्ता, दक्षिणेस – प्लॉट नं. १३ ची मिळकत, उत्तरेस – प्लॉट नं. ११ ची मिळकत. येणेप्रमाणे चतुःसिमेतील खुली मिळकत त्यातील तदंगभुत वस्तुंसह आणि इझमेंटरी हक्कांसह.

२) वरील कलमी वर्णन केलेली मिळकत सौ. अर्चना विशाल बमणावर यांचे मालकी वहिवाटीची असून त्यांनी आमचे अशिलांना सदर मिळकत खरेदी देणेची ठरवुन संचकार रक्कम स्विकारून तसे खरेदीपूर्व करारपत्र लिहून दिलेले आहे. सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांना दिलेला आहे. तथापी सदर मिळकतीवर कोणाचा करार, वारसा, तारण, पोटगी, बोजा, कुळ, बक्षिसपत्र, मृत्युपत्र अगर अन्य कोणताही हक्क अगर हितसंबंध असलेस त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली नमूद वकिलांचे पत्त्यावर कागदपत्रांसहीत संपर्क साधून खात्री पटवून मुदतीत कोणाचीही तक्रार न आलेस आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही तक्रारींचा विचार केला जाणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस आज मुक्काम इचलकरंजी ता. ०९/०७/२०२६

**ॲड. श्रीप्रसाद लक्ष्मण उरूणकर**
रा. ३/४५७/१/२, पॅराडाईज कॉलनी, आमराई रोड, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
मो. नं. ९९२३४२२९५१

## जाहीर इशारा नोटीसीच्या उत्तरास प्रतिउत्तर

ॲड. मुकुंद ल. आजरेकर रा. इचलकरंजी यांनी त्यांचे अशिल सागर भुईबर व श्री जोतिबा भुईबर, व श्री सुहास भुईबर यांचेकरता दैनिक महासत्ता अंकातून दि. २३/६/२०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिर इशारा नोटिसीच्या उत्तरास आमचे अशिल श्री. युवराज चोथे व श्री. तुकाराम चोथे रा. इचलकरंजी यांचेवतीने प्रतिउत्तर देणेत येते की, आमचे अशिलांनी त्यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची रि.स. नं. ४७० / २ प्लॉ नं. ११/१२ पैकी ९०० चौ फूटावरील बंदिस्त घर मिळकतीवर कॅपरी ग्लोबल कं. लि. या फायनान्स कंपनीचे कर्ज घेतले होते. हे कर्ज थकीत झाल्यामुळे कर्जफेडीसाठी आमचे अशिलांनी सदर मिळकत श्री भुईबर यांना विक्री करण्याचे मान्य केले होते. त्यामुळे सदर मिळकतीबाबत श्री भुईबर यांचेसोबत संचकार करार करत असताना श्री भुईबर यांनी वर नमूद मिळकतीवरील कर्ज संपूर्ण परतफेड करून आमचे अशिलांना बँकेकडून नाहरकत प्रमाणपत्र करून घेण्याबाबत ठरले होते. परंतु श्री भुईबर हे करारात ठरल्याप्रमाणे वागले नाहीत म्हणजेच आमच्या अशिलांचे कर्ज संपूर्णपरतफेड करून कंपनीकडून नाहरकत प्रमाणपत्र घेतले नाही. त्यामूळे आमचे अशिलांना वर नमूद बँकेकडून कर्ज देय रक्कम परतफेडीबाबत व वर नमूद मिळकत जप्तीबाबत तगादा लावला जात आहे. त्यामुळे करारात ठरल्याप्रमाणे व्यवहार पूर्ण केलेशिवाय भुईबर यांना वर नमूद मिळकतीबाबत कोणताही व्यवहार करता येणार नाही म्हणून दिले जाहिर इशारा नोटिसीच्या उत्तरास प्रतिउत्तर ता.०८/०७/२०२६

**सौ. वैशाली शिवाजी पन्हाळकर**
ॲडव्होकेट
१३ / ७५३, संत मळा, इचलकरंजी.
मो. ९९२२२०७३९५.

# शाहूवाडीतील २५ गावे सहा दिवसांपासून अंधारात

## विजेअभावी पाणीपुरवठा योजना ठप्प; महापुरातही पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती

सरूड,ता.९(प्रतिनिधी)–

**शाहूवाडी तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे आंबा व विशाळगड परिसरातील सुमारे २० ते २५ गावांचा विद्युत पुरवठा गेल्या सहा दिवसांपासून खंडित झाला आहे. एकीकडे महापुराची परिस्थिती निर्माण झाली असताना दुसरीकडे वीजेअभावी पाणीपुरवठा योजना ठप्प झाल्याने नागरिकांवर पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे.**

वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी वीजखांब कोसळले असून, वारूळ, मानोली व गजापूर येथे प्रत्येकी चार, तर तळवडे, हुंबवली आणि घोळसवडे येथे प्रत्येकी एक वीजखांब पडल्याने संपूर्ण परिसर अंधारात बुडाला आहे. महावितरणकडे अपुरे मनुष्यबळ असल्याने दुरुस्तीचे काम संथगतीने सुरू असून, वीजपुरवठा सुरळीत होण्यास विलंब होत आहे.वीज नसल्याने पाणीपुरवठा योजना बंद



**विजेअभावी पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करतानाचे छायाचित्र तर दुसऱ्या छायाचित्रात वादळी वाऱ्यामुळे विद्युत खांब कोसळले आहे.**

पडल्या असून दूरध्वनी सेवाही विस्कळीत झाली आहे. भर पावसात महिलांना झऱ्यांवरून पाणी आणावे लागत आहे. शाळांमधील पोषण आहारासाठीही विकत पाणी आणण्याची वेळ प्रशासनावर आली आहे. गजापूर व विशाळगड परिसरात काही भागात दहा दिवसांपासून वीजपुरवठा खंडीत आहे. दोन वर्षांपूर्वी उभारण्यात आलेले वीजखांब कोसळल्याने कामाच्या दर्जाबाबत नागरिकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. महावितरणच्या नियोजनाचा अभाव आणि लोकप्रतिनिधींची उदासीनता यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

वीजपुरवठा खंडित झाल्याचा फटका आंबा, पावनखिंड आणि विशाळगड येथील पर्यटनालाही बसला आहे. शाहूवाडीहून आंबा भागाकडे जाणारी ३३ केव्ही वीजवाहिनी कडवी नदी आणि महामार्गालगत असल्याने पुराच्या पाण्यामुळे अनेक ठिकाणी खांब धोकादायक स्थितीत आले आहेत. काही ठिकाणी झाडे कोसळल्याने वीजवाहिन्या लोंबकळत पडल्या असून अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.डोळ्यांसमोर महापुराचे पाणी, पण पिण्यासाठी पाणी नाही, अशी विदारक परिस्थिती सध्या कडवी खोऱ्यात निर्माण झाली असून, तातडीने वीजपुरवठा पूर्ववत करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# अग्निवीरांच्या पुनर्वसनाबाबत शासन निर्णय कधी निघणार?

## -आमदार चंद्रदीप नरके यांचा विधानसभेत सवाल

बीडशेड,ता.९(प्रतिनिधी)–

**केंद्र सरकारच्या अग्निवीर योजनेअंतर्गत चार वर्षांची सेवा पूर्ण करणाऱ्या जवानांच्या पुनर्वसनाबाबत राज्य शासनाने अद्याप अधिसूचना (जीआर) जाहीर न केल्याने, याबाबतचा निर्णय नेमका कधी होणार, असा थेट सवाल करवीर विधानसभा मतदारसंघाचे आमदार चंद्रदीप नरके यांनी विधानसभेत उपस्थित केला.**



आमदार नरके यांनी सभागृहाचे लक्ष वेधताना सांगितले की, अग्निवीर योजनेतून सेवा पूर्ण करून बाहेर पडणाऱ्या जवानांसमोर मोठ्या प्रमाणात रोजगाराचा प्रश्न निर्माण होतो. या विषयावर त्यांनी मागील अधिवेशनातही तारांकित प्रश्न मांडला होता, त्यावेळी इतर राज्यांच्या धर्तीवर होमगार्ड,आपत्ती व्यवस्थापन, कारागृह विभाग, वनसंरक्षण तसेच अग्निशामक दल या सेवांमध्ये अग्निवीरांना विशेष प्राधान्य देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन शासनाकडून देण्यात आले होते.मात्र त्यानंतरही कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही, याकडे नरके यांनी लक्ष वेधले. समितीचा अहवाल सध्या कोणत्या टप्प्यावर आहे, तो कधीपर्यंत सादर होईल आणि त्यानंतर शासन निर्णय (जीआर) नेमका कधी होणार, याची स्पष्टता देण्याची मागणी त्यांनी केली. सैन्यदल, नौदल आणि वायुदलात सेवा बजावलेल्या अग्निवीर जवानांकडे शिस्त, कौशल्य आणि प्रशिक्षणाचा मोलाचा अनुभव असल्याचे सांगत, या अनुभवाचा उपयोग राज्याच्या सेवेत व्हावा तसेच राज्यातील हजारो अग्निवीर जवानांच्या भवितव्याचा प्रश्न लक्षात घेता, शासनाने विलंब न लावता स्पष्ट पुनर्वसन धोरण आणि तातडीने शासन निर्णय जाहीर करावा, अशी मागणी आमदार चंद्रदीप नरके औचित्याच्या मुद्द्याद्वारे विधानसभेत मागणी केली

## एस.टी.निवृत्त कर्मचारी संघटनेच्या केंद्रीय अध्यक्षपदी कमलाकर रोटे

कोल्हापूर,ता.९(प्रतिनिधी)



**राज्य परिवहन (एस.टी.) निवृत्त कर्मचारी संघटनेच्या महाराष्ट्र राज्य केंद्रीय कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी कोल्हापूर विभागीय कार्यकारिणीचे अध्यक्ष कमलाकर रोटे यांची सन २०२६ ते २०२८ या कार्यकाळासाठी एकमताने व बिनविरोध निवड करण्यात आली.**

संघटनेचे केंद्रीय सरचिटणीस सदानंद विचारे यांनी कमलाकर रोटे यांच्या अध्यक्षपदी झालेल्या एकमताने निवडीची अधिकृत घोषणा केली. यापूर्वी हे पद मा. खासदार स्व. गिरीश बापट यांनी भूषविले होते. त्यांच्या दुःखद निधनानंतर हे पद रिक्त झाले होते. महाराष्ट्र राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटनेची केंद्रीय कार्यकारिणीची बैठक व वार्षिक सर्वसाधारण सभा नंदुरबार येथे उत्साहात पार पडली. या बैठकीस राज्यातील सर्व विभागीय कार्यकारिण्यांचे अध्यक्ष, सचिव, पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. कमलाकर रोटे यांच्या निवडीबद्दल कोल्हापूर विभागीय कार्यकारिणीचे सचिव बाबा कोकणे, संघटक सचिव रवी जाधव, तसेच संघटनेचे इतर पदाधिकारी व सभासद यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## साईनाथतर्फे ग्राहकाभिमुख योजना राबविणार-जाधव

राधानगरी,ता.९(प्रतिनिधी)

**एकवीस शाखाद्वारे ३०० कोटींचा व्यवसाय करणाऱ्या कोल्हापूर येथील साईनाथ मल्टिस्टेट क्रेडीट सोसायटीच्या वतीने शनिवार ता.११ जुलै रोजी मुख्य कार्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**

याबाबतीत बोलताना चेअरमन उत्तम जाधव यांनी माहिती दिली की, ग्राहकांनी संस्थेवर दाखविलेल्या विश्वासाच्या जोरावर भविष्यात सर्व शाखा स्वमालकीच्या इमारतीत सुरू करण्याचा संकल्प चौदाव्या वर्धापन दिनानिमित्त करण्यात आला आहे. ग्राहकाभिमुख विविध योजना राबविण्यात येणार असून त्याचा लाभ ग्राहकांनी घ्यावा तसेच मुख्य कार्यालय रेल्वे फाटक राजारामपुरी कोल्हापूर येथे शनिवारी सकाळी कार्यक्रमास उपस्थित असे आवाहन संस्थापक चेअरमन जाधव यांनी केले आहे.

## प्रा.महेश गावडे यांना पीएच.डी.

वारणानगर,ता.९(प्रतिनिधी)–



**तळसंदे येथील डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ स्कूल ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इंजीनिअरिंगचे संशोधक प्रा.महेश वासुदेव गावडे यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स फॉर प्रायसिंग इन ई–कॉमर्स विथ रिस्पेक्ट टू मार्केट ट्रेण्ड्स या विषयावर यशस्वी संशोधन पूर्ण केले असून विद्यापिठाकडून त्यांना पीएच.डी. ही पदवी जाहीर झाली आहे.**

या संशोधनात ई–कॉमर्स क्षेत्रातील किंमत निर्धारण प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रांचा वापर करून बाजारातील ट्रेंड्सचा अभ्यास करण्यात आला.डी.वाय. पाटील कृषी व तंत्रज्ञान विद्यापिठाचे अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.जयदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हे संशोधन केले. कुलपती डॉ.संजय पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, प्र–कुलपती ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू प्रा. डॉ.ए.के.गुप्ता,प्रा.डॉ.जयेंद्र खोत,डॉ.संग्राम पाटील, डॉ.एस आर पावसकर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले .

# सैनिक टाकळीत नागरिकांचे बेमुदत उपोषण सुरू

## प्रस्तावित एमआयडीसी रद्द करण्याची मागणी

सै.टाकळी,ता.९(प्रतिनिधी)

**शिरोळ तालुक्यातील जमीन, पाणी आणि अस्मिता वाचवण्यासाठी गुरुवार, ता.९ जुलै रोजी सैनिक टाकळी येथील अमर जवान हुतात्मा स्मारकासमोर स्थानिक नागरिकांनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे.**

आपल्या लष्करी परंपरेला बाधा आणणारा प्रस्तावित एमआयडीसी प्रकल्प तातडीने रद्द करण्याच्या मागणीसाठी हे आंदोलन पुकारण्यात आले असून, त्याऐवजी परिसरात सैनिक स्कूल, भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र आणि केंद्रीय विद्यालय उभारण्याची मागणी आंदोलकांकडून



**प्रस्तावित एमआयडीसी रद्द करण्याच्या मागणीसाठी बेमुदत उपोषणास बसलेले सै.टाकळीतील ग्रामस्थ.**

होत आहे. यासोबतच, गावातील गायरान जमीन केवळ गावाच्या विकासासाठी राखीव ठेवणे आणि वादग्रस्त दानवाड–राधाकृष्ण पाणी योजना रद्द करणे, या मागण्यांसाठी हे उपोषण करण्यात येत आहे. यावेळी उपोषणकर्त्यांनी ''सैनिक वाचवा! शेतकरी वाचवा!'' आणि 'जय जवान! जय किसान!'अशा घोषणांनी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. या लढाईत परिसरातील सर्व नागरिक सहभागी झाले आहेत. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा संयोजकांकडून देण्यात आला आहे.उपोषणास माजी सैनिक सुभेदार डॉ. सिद्धू पाटील ,शामराव पाटील, अनिल पाटील, कृष्णा पाटील, विजय गायकवाड, डॉ. संजय पाटील, बी.डी. पाटील, सदाशिव पाटील,चेतन पाटील, महेश पाटील या माजी सैनिकांसह अंकुश संघटनेचे जिल्हाध्यक्ष दीपक पाटील, विनोद पाटील व माजी सैनिक रिटायर ऑ.कॅप्टन विजय गायकवाड आदी बसले आहेत.

यावेळी अमर पाटील,अमोल वासमकर,आंदोलन अंकुशचे तालुकाध्यक्ष नागेश काळे, प्रदीप पाटील ,माणिक पाटील, रणजीत पाटील, सुनील कोष्टी ,मनोहर भोसले, अमोल शेळके ,हणमंत पाटील, विकास पाटील, नवनाथ पाटील, रोहन पाटील, प्रवीण निर्मळे ,संदीप पवार,सागर शिरट्टी,आनंदराव पाटील, संभाजी गायकवाड, सुधीर पाटील,संतोष गायकवाड, श्रीधर भोसले इत्यादी शेतकरी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी-जंगटे

बोरगांव,ता.९(प्रतिनिधी)–

**शहरात पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर दूषित पाण्यामुळे होणाऱ्या आजाराचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक शरद जंगटे यांनी नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन केले आहे.**

यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, पिण्याचे पाणी किमान १० ते १५ मिनिटे उकळून थंड करूनच वापरावे.ताप, जुलाब किंवा उलट्यांचा त्रास झाल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, नागरिकांनी स्वतःची व कुटुंबाची काळजी घेऊन सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा वापर करावा आणि प्रशासनालाही सहकार्य करावे, असे आवाहन नगरसेवक शरद जंगटे यांनी केले.

# रुईतील संभाव्य पूर बाधितांना स्थलांतराच्या नोटीसा

रुई,ता.९(वार्ताहर)–

**गेल्या ४ दिवसांपासून कोल्हापूर जिल्ह्यातील धरण क्षेत्रात पडणाऱ्या अतिवृष्टीमुळे पंचगंगा नदीच्या पातळीवर मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने रुई(ता. हातकणंगले) येथील संभाव्य पूर बाधितांना स्थलांतराच्या नोटीसा प्रशासनाच्या वतीने देण्यात आल्या आहेत.**

पंचगंगा नदी काठी वसलेल्या रुई गावास सन २००५ पासून महापुराचा फटका बसत आहे. तसेच २०१९, २०२१ व २०२४ साली देखील महापुराचे पाणी नागरी वस्तीत शिरल्याने मानवी जीवन विस्कळीत झाले होते. त्याचा फटका अनेक पूर बाधित कुटुंबांना बसला होता. सध्या महाराष्ट्रासह कोल्हापूर जिल्ह्यात जोरदार पाऊस पडत असून नद्यांच्या पाणी पातळीत झपाट्याने



**रुई येथील संभाव्य पूर बाधितांना स्थलांतराच्या नोटीस देताना तलाठी पूजा सावंत सोबत इतर मान्यवर.**

वाढ होत आहे. पंचगंगा नदी दोन दिवसांपूर्वीच पात्राबाहेर आली असून सध्या वाढते पाणी पाहता पुन्हा एकदा महापुराचे संकट नदी काठच्या गावांवर आले आहे. परिणामी ,संभाव्य पूर परिस्थिती लक्षात घेता खबरदारी म्हणून प्रशासनाच्या माध्यमातून संभाव्य पूर रेषेतील कुटुंबांना आपले प्रापंचिक साहित्य व आपली जनावरे घेवून वेळीच सुरक्षित स्थळी स्थलांतरित होण्याच्या नोटीसा मंडळ अधिकारी जानकी मिराशी, तलाठी पूजा सावंत, पोलिस पाटील नितीश तराळ व सरपंच सावंत यांच्या माध्यमातून देण्यात आल्या आहेत.

# बाजारभोगावात आपत्ती व्यवस्थापनाची पूर्वतयारी बैठक

## पंचायत समिती सदस्यांकडून आरोग्य विभाग धारेवर

बाजारभोगाव,ता.९(प्रतिनिधी)–

**बाजार भोगाव (ता.पन्हाळा) येथे संभाव्य पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाची पूर्वतयारी बैठक उत्साहात पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे सभापती रवींद्र पाटील हे होते.**

यावेळी गटविकास अधिकारी सोनाली माडकर यांनी पूरस्थिती निर्माण झाल्यास प्रशासनाने करावयाचे नियोजन, बचाव व मदतकार्य, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी घ्यावयाच्या उपाययोजना तसेच विविध विभागांमधील समन्वयाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पंचायत समिती सदस्य दत्तात्रय खोत यांनी आरोग्य यंत्रणेने पावसाळ्यात सतर्क राहून आवश्यक औषधसाठा, वैद्यकीय पथके व प्रतिबंधात्मक उपाययोजना सज्ज ठेवाव्यात, अशा सूचना केल्या.

बैठकीस मंडल अधिकारी नलिनी मोहिते, विस्ताराधिकारी पी. डी.भोसले. ग्रामपंचायत अधिकारी सुरेश पाटील, आर. टी. कुंभार. ऋषी गुरव,आर. एस. वाघमारे, बाजारभोगावचे नितीन हिंडेकर तसेच ग्राममहसूल अधिकारी चंदू मसवेकर, राजाराम चौगुले, वासिम मुल्ला, शरद पाटील, राणी सुतार, सुनंदा माने,कोतवाल संभाजी कुंभार,पोलीस पाटील, विक्रम पाटील तसेच कळे पोलीस ठाण्याचे कर्मचारी तसेच विविध विभागांचे कर्मचारी उपस्थित होते. आपत्तीच्या काळात सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करून नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे,असे आवाहन यावेळी करण्यात आले.


श्रीहरी
शुक्रवार, ता. १०/०७/२०२६ पासून
रोज ३ खेळ, दु. १ व ४ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
भिगी औरत
सायं. ७ वा.
हवस की रात
A प्रौढांसाठी


श्रीदत्त
शुक्रवार, ता. १० पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
स्ट्रोलिन सेल्स
A फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी चित्रमंदिर, इचलकरंजी.
संपर्क : 9623150103
पंचवटी वॉटसअॅप ग्रुप
शुक्रवार ता.10 पासून रोज ४ खेळ
*१२*३*६*९ वा.


अॅडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
DOLBY DIGITAL PLUS 7.1
मनोरंजनाचा धमाका अनुभवा आपल्या आवडत्या पंचवटी चित्रमंदिरात
ऑनलाईन पेमेंट स्विकारले जाईल G Pay PhonePe
ऑनलाईन बुकिंग साठी bookmyshow

५७ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजिटल साऊंड सिस्टीम
शुक्रवार ता. १० पासून
रोज ४ खेळ १२-३-६-९ वा.


धमाल-४ (हिंदी)

कल्पना
लेजर प्रोजेक्टरसहीत
शुक्रवार ता.१० पासून
रोज ४ खेळ १२ * ३ * ६ * ९
फुल्ल कॉमेडी चित्रपट


(हिंदीमध्ये)

गुरु
शुक्रवार,ता. १० पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ४ खेळ १२.१५ * ३.३० * ६.३० * ९.३० वा.
सुपरहिट धमाल सेरीजमध्ये लेटेस्ट ४ था भाग


अॅडव्हान्स बुकींग रोज सकाळी ११ पासून

RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070
bookmyshow


" धमाल 4 " ( हिंदी )
09:30 AM, 10:30 AM
01:30 PM, 03:30 PM
04:30 PM, 07:30 PM
09:30 PM, 10:30 PM
" वेलकम टू द जंगल " ( हिंदी )
02:00 PM, 10:15 PM
" मोआना " - हिंदी ( 3D )
11:30 AM, 08:00 PM
" तुला पाहता " ( मराठी )
05:15 PM
" अल्फा " ( हिंदी )
12:30 PM, 06:30 PM
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क
+91 88 88 01 51 11


धमाल 4 (HIN) (U/A)
11.00am, 12.45, 01.45, 03.30, 04.30, 06.30, 07.30, 09.30, 10.30pm
ऐल्फा (HIN) (A)
11.00am, 07.30pm
वेलकम टू द जंगल (HIN) (U/A)
01.45pm
ईव्हिल डेड बर्न (HIN) (A)
10.30am, 10.30pm
तूला पाहता (MAR) (U/A)
04.45pm
आता पहा मॉर्निंग शो 100 रु. पासून पुढे

# चांदोली परिसरातील धबधबे प्रवाहित

## पर्यटकांची गर्दी; धुक्याची चादर, हिरवाईने नटलेले डोंगर याचे निसर्गप्रेमींना आकर्षण

शिराळा/चांदोली,ता.९(प्रतिनिधी)-

**गेल्या काही दिवसांपासून चांदोली धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण चांदोली परिसराने हिरवागार साज चढवला असून येथील धबधबे नव्या जोमाने प्रवाहित झाले आहेत. उखळू, उदगीर, गुढे-पाचगणी तसेच मणदूर आणि सोनवडे परिसरातील धबधबे सध्या पूर्ण क्षमतेने कोसळत असून, त्यांचे विहंगम दृश्य अनुभवण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे.**



उखळू, उदगीर, गुढे-पाचगणी तसेच मणदूर आणि सोनवडे परिसरातील धबधबे सध्या पूर्ण क्षमतेने कोसळत असून याठिकाणी पर्यटकांची गर्दी होत आहे.

सुमारे ३०० फूट उंचीवरून फेसाळत कोसळणारे पांढरेशुभ्र धबधबे, दाट हिरवाईने नटलेले डोंगर आणि धुक्याची चादर यामुळे चांदोली परिसराने निसर्गप्रेमींना अक्षरशः मोहिनी घातली आहे.आठवड्याच्या सुट्टीच्या दिवशी या परिसरात पर्यटकांची विशेष वर्दळ पाहायला मिळत आहे.या निसर्गरम्य धबधब्यांपर्यंत पोहोचण्यासाठी पर्यटकांना तीन ते चार किलोमीटर जंगलातून पायपीट करावी लागते. बहुतांश ठिकाणी पक्का रस्ता नसल्याने पावसाळ्यात हा प्रवास अधिकच कठीण ठरतो. जंगलात मोठ्या प्रमाणावर जळूंचा त्रास, निसरड्या वाटा आणि दाट झाडीत भरकटण्याची शक्यता असल्याने स्थानिक मार्गदर्शकाशिवाय या ठिकाणी जाणे धोकादायक ठरू शकते, असे स्थानिकांचे म्हणणे आहे.

**पर्यटन विकासाची मोठी संधी**

चांदोली धरण आणि चांदोली राष्ट्रीय उद्यानालगत असलेल्या या निसर्गस्थळांमध्ये पावसाळी पर्यटनाच्या दृष्टीने मोठी क्षमता आहे. प्रशासनाने सुरक्षित ट्रेकिंग मार्ग, दिशादर्शक फलक,संरक्षक कठडे, वाहनतळ आणि अन्य मुलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यास उखळू धबधब्यासह संपूर्ण परिसर राज्यातील महत्त्वाचे पावसाळी पर्यटनस्थळ म्हणून विकसित होऊ शकतो,अशी अपेक्षा स्थानिक नागरिक व निसर्गप्रेमींनी व्यक्त केली आहे.

**पर्यटकांसाठी सूचना**

पावसाळ्यात जंगलात फिरताना जळू अंगाला चिकटल्यास ती जबरदस्तीने ओढून काढू नये. त्यावर मीठ किंवा तंबाखू टाकल्यास जळू स्वतःहून सुटते. त्यामुळे या परिसरात भटकंती करणाऱ्या पर्यटकांनी मीठ किंवा तंबाखू सोबत ठेवावी. तसेच घसरड्या वाटांवर काळजीपूर्वक चालावे, स्थानिक मार्गदर्शकाची मदत घ्यावी आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



# बहे येथील बंधारा पाण्याखाली

वाळवा,ता.९(प्रतिनिधी)-

**अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर अखेर पावसाने जोरदार हजेरी लावली असून, कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे कृष्णा नदीच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत आहे.**

या वाढत्या पाणीपातळीमुळे वाळवा तालुक्यातील बहे येथील बंधारा पूर्णपणे पाण्याखाली गेला असून परिसरातील अनेक गावांमध्ये नदीचे पाणी पात्राबाहेर पडले आहे.मसुचीवाडी, बोरगाव, ताकारी, बनेवाडी, साटपेवाडी आणि गौंडवाडी परिसरात कृष्णा नदीचे पाणी शेतांमध्ये व नदीकाठच्या भागात पसरू लागल्याने नागरिकांमध्ये सतर्कतेचे वातावरण निर्माण झाले आहे. नदीकाठच्या नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, बहे येथील बंधारा पाण्याखाली गेल्यामुळे रामलिंग बेटावरील श्री राम मंदिराकडे जाणारा मार्ग पूर्णपणे बंद झाला आहे. त्यामुळे भाविकांना मंदिरात जाणे सध्या शक्य नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे, अद्याप कोयना धरणातून एक थेंबही विसर्ग सुरू झालेला नसतानाही कृष्णा नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ होत आहे.त्यामुळे पुढील काही दिवसांत पावसाचा जोर कायम राहिल्यास नदीकाठच्या गावांना अधिक सतर्क राहण्याची गरज असल्याचे जाणकारांनी सांगितले आहे.

# भिलवडी शिक्षण संस्थेच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव

भिलवडी,ता.९(प्रतिनिधी)-

**इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परिक्षेच्या गुणवत्ता यादीत भिलवडी शिक्षण संस्थेने उल्लेखनीय यश संपादन करत तालुक्याच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.या यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ संस्थेच्यावतीने उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.**



भिलवडी : शिष्यवृत्ती परिक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा संस्था अध्यक्ष विश्वास चितळे, मानसिंग हाके,संजय मोरे,रौनक तांबोळी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सेकंडरी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, भिलवडीचा विद्यार्थी सारंग कुलकर्णी याने शिष्यवृत्ती परिक्षेत राज्यात १२ वा क्रमांक मिळवून संस्थेचा गौरव वाढविला. संस्थेतील एकूण २२ विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या गुणवत्ता यादीत झळकले. यामध्ये इयत्ता पाचवीचे १२, इयत्ता आठवीचे ६ आणि इंग्लिश प्रायमरी अँड हायस्कूलच्या इयत्ता आठवीचे ४ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचा मानाचा फेटा, पेरूचे रोप आणि प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात मार्गदर्शक शिक्षक प्रल्हाद पवार यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यामागील अनुभव सांगताना, सुरुवातीला विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून सायकल देण्याचे आश्वासन दिले होते, असे सांगितले. विद्यार्थ्यांच्या मेहनतीने प्रभावित होऊन त्यांनी स्वतःच्या वतीने रु.५००१ चे रोख बक्षीस जाहीर केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष विश्वास चितळे यांनी २२ गुणवंत विद्यार्थ्यांना दर्जेदार गिअर सायकली भेट देण्याची घोषणा करून विद्यार्थ्यांचे तसेच शिक्षकांचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमासाठी मुंबई महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. मंदार तेंडुलकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी इयत्ता दहावी व बारावी सीईटीमधील गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य भेट दिले. त्यांचे माजी विद्यार्थी अझरुद्दीन जमादार यांच्यासह त्यांनी विद्यार्थ्यांचा गौरव केला.

या कार्यक्रमाला संचालक चंद्रकांत पाटील, संभाजी सूर्यवंशी, महावीर वठारे, मुकुंद जोग, विश्वस्त अशोक चौगुले, सचिव मानसिंग हाके, सहसचिव के.डी.पाटील, मुख्याध्यापक संजय मोरे, उपमुख्याध्यापिका अनुराधा शिंदे, पर्यवेक्षिका रौनक तांबोळी, इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका विद्या टोणपे, सेमी इंग्लिशचे मुख्याध्यापक शंकर बल्लाळ, पत्रकार, पालक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सणबूर, ढेबेवाडी परिसरात २६ घरांची पडझड

## संततधार पावसाने जनजीवन विस्कळीत; नुकसानग्रस्तांचे पंचनामे

ढेबेवाडी,ता.९(प्रतिनिधी)-

**पाटण तालुक्यातील सणबूर, ढेबेवाडी आणि कुठरे-काळगाव परिसरात गेल्या आठवड्याभरापासून सुरू असलेल्या संततधार पावसाने जनजीवन विस्कळीत केले आहे. गेल्या दोन दिवसांत पावसाचा जोर वाढल्याने परिसरात घरांच्या पडझडीचे सत्र सुरू झाले असून, एकूण २६ घरांचे मोठे नुकसान झाले आहे. यात ढेबेवाडी मंडलात १७, तर कुठरे-काळगाव मंडलात ७ घरांचा समावेश आहे.**



काळगाव-कसणी परिसरात अतिवृष्टीमुळे पडलेल्या भिंती.

ढेबेवाडी मंडलातील सातर, मोडकवाडी, सणबूर, बनपुरी, सळवे-वर्पवाडी, निगडे, तामिणे, जिंती, पानेरी आणि कुठरे-काळगाव मंडलातील करपेवाडी, पवारवाडी, लोटळेवाडी, वाझोली, कसणी या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर घरांची पडझड झाली आहे. सततच्या पावसामुळे दगड-मातीची कच्ची घरे कमकुवत होऊन कोसळली आहेत. अनेक ठिकाणी घरांवरील पत्रे उडाल्याने नागरिकांचे संसार उघड्यावर आले आहेत.

या नैसर्गिक आपत्तीमध्ये दाजी लाखन, तानाबाई लाखन, अभिमान जाधव, सचिन कांबळे, चंद्रकांत कदम, गणपत ऐकावडे, प्रकाश कदम, ताराबाई माने, यशवंत सावंत, सुनील पाटील, सुरेश जाधव, सुरेखा कदम, अनुसया शिर्के, मालन माने, परशराम पाटील, खलील पटेल, रामचंद्र मानुस्करे, मनीषा पवार, भिवाजी पवार, मारुती लोटळे, तुकाराम मोरे, काशिनाथ मोरे आणि निवृत्ती मेथे यांच्यासह काही शाळांच्या इमारतींचेही नुकसान झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तात्काळ संबंधित गावांमध्ये धाव घेतली. नुकसानग्रस्त ठिकाणी पाहणी करून तातडीने पंचनामे पूर्ण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून असून, बाधित नागरिकांना तातडीने मदत मिळावी, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून होत आहे.

# चव्हाण पॉलिटेक्निकमध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी मोफत मार्गदर्शनाची सोय

कराड,ता.९(प्रतिनिधी)-

**महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी डिप्लोमा अभियांत्रिकी प्रथम वर्ष प्रवेशाच्या पहिल्या केंद्रीय प्रवेश प्रक्रिये (कॅप राऊंड) ला प्रारंभ झाला असून प्रवेश प्रक्रियेतील पुढील टप्प्यांकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.**

या पार्श्वभूमीवर यशवंत विद्यापीठ, कराड संचलित श्रीमती प्रेमलाताई चव्हाण पॉलिटेक्निक, कराड यांनी विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेसंदर्भात महत्त्वपूर्ण सूचना देत ऑप्शन फॉर्म अचूक भरावा, असे आवाहन केले आहे. संचालनालयाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार ता.१० जुलै २०२६ रोजी अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध होणार असून, त्यानंतर ता.११ ते ता.१३ जुलै २०२६ या कालावधीत विद्यार्थ्यांना पहिल्या कॅप फेरीसाठी ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची संधी उपलब्ध होणार आहे. याच कालावधीत विद्यार्थ्यांनी महाविद्यालये आणि अभ्यासक्रमांची निवड अत्यंत विचारपूर्वक करणे आवश्यक असल्याचे तंत्रनिकेतनने स्पष्ट केले आहे.

विद्यार्थ्यांचे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी श्रीमती प्रेमलाताई चव्हाण पॉलिटेक्निक, कराड येथे ऑप्शन फॉर्म निशुल्क आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली भरून देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी अर्जाची प्रत तसेच नोंदणीसाठी वापरलेला मोबाईल क्रमांक सोबत आणावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या संदर्भात प्राचार्य स्वागत एस.किणीकर यांनी सांगितले की, प्रवेश प्रक्रियेत केवळ एका चुकीमुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे कोणतीही घाई न करता तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ऑप्शन फॉर्म भरावा. महाविद्यालयाने ही सुविधा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिली असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा.

# वाड्या-वस्त्यांना गावठाण फिडरमधून वीजपुरवठा करा

## आ.सत्यजीत देशमुख यांची मागणी

शिराळा,ता.९(प्रतिनिधी)-

**ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींच्या पाणीपुरवठा योजनांना अखंड वीजपुरवठा मिळावा तसेच गावालगतच्या छोट्या वाड्या-वस्त्यांना कृषी फिडरऐवजी गावठाण फिडरमधून २४ तास वीज द्यावी, अशी ठाम मागणी आ.सत्यजीत देशमुख यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे केली.**



लक्षवेधी मांडताना आ.देशमुख म्हणाले, वारंवार होणाऱ्या वीज खंडितीमुळे पाणीपुरवठा विस्कळीत होत असून हजारो नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. त्यामुळे पाणीपुरवठा योजनांसाठी स्वतंत्र वीजपुरवठा, सौरऊर्जा प्रकल्पांना गती, नेट मीटरिंगमधील अडथळे दूर करणे आणि महावितरणची परवानगी प्रक्रिया सुलभ करण्याची त्यांनी मागणी केली. तसेच गावालगतच्या छोट्या वस्त्यांना गावठाण फिडरमधून २४ तास वीज दिल्यास घरगुती वीज, पाणीपुरवठा, विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि दैनंदिन जीवन अधिक सुलभ होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी उत्तरात सांगितले की, राज्यात ग्रामीण विकास विभागाकडे ६२,७२५ पाणीपुरवठा वीजजोडण्या असून त्यापैकी ५८,५९९ जोडण्यांची २,६४८ कोटी रुपयांची थकबाकी आहे. २०२४-२५ मध्ये शासनाने वीजबिलासाठी १,१३६ कोटी रुपये महावितरणला दिले असून सर्व योजनांचा समावेश कंपोझिट बिलिंग प्रणालीत करण्यात आला आहे. ता.६ जुलै २०२६ पर्यंत १,०९८ सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांवर ४५.८९ मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. सुधारित वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत प्रस्तावित ४,४५७ कृषी फिडरपैकी ३,२२३ फिडरचे काम पूर्ण झाले असून १,२३४ फिडरचे काम सुरू असल्याची माहितीही त्यांनी सभागृहात दिली.



डॉ.मोहन पटवर्धन यांना जीवनगौरव पुरस्कार देताना मान्यवर.

# मिरज 'आयएमए'तर्फे जीवनगौरव पुरस्कार वितरण

मिरज,ता.९(प्रतिनिधी)-

**मिरज आय.एम.ए.तर्फे डॉक्टर्स डे उत्साहाने साजरा करण्यात आला. स्वागत मिरज आय.एम.ए. च्या अध्यक्षा डॉ.सारा धनवडे यांनी केले. डॉ.बी.सी.रॉय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली.**

यावेळी समाजाच्या डॉक्टरांकडून अपेक्षा व डॉक्टरांच्या समाजाकडून अपेक्षा याबाबत चर्चासत्र झाले. पोलीस उपअधीक्षक मुकुंद कुलकर्णी, ज्येष्ठ साहित्यिक भीमराव धुळूबुळू, नगरसेवक डॉ.पंकज म्हेत्रे, प्रसिद्ध चित्रकार अनिल दबडे, सेवासदन हॉस्पिटलचे प्रमुख डॉ.रविकांत पाटील, अॅड.पंकज पांडे उपस्थित होते. यावेळी डॉ.मुकुंद पाठक, डॉ.मोहन पटवर्धन, डॉ.एस.एस.शेटे, डॉ.परिचारक, डॉ.एम.आर.कुलकर्णी यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी यशस्वी डॉक्टरांचा व त्यांच्या गुणवंत मुलांचा सत्कार करण्यात आला. सचिव डॉ. पृथ्वीराज मेथे यांनी आभार मानले.

### चार गावांमध्ये आढळले दूषित पाणी

सांगली,ता.९(प्रतिनिधी)-

**सांगली जिल्ह्यातील ग्रामीण भागात पिण्यासाठी पुरवठा करण्यात येणारे पाणी बहुतांश ठिकाणी स्वच्छ असल्याचे दिसत आहे. जून महिन्यात जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या तपासण्यात आलेल्या १ हजार ३१४ पाणी नमुन्यांपैकी चारच ठिकाणचे पाणी दूषित आढळले आहे.**

सरकारच्या निर्णयानुसार जिल्ह्यातील सर्व तालुक्यातून दरमहा पाणी स्त्रोतांचे नमूने तपासले जातात. जूनमध्ये जिल्ह्यातील दहाही तालुक्यातील १३१४ ठिकाणचे पाणी नमूने तपासण्यात आले.तपासणीतून दूषित पाणी आढळलेल्या गावांमध्ये जत तालुक्यातील जाडरबोबलाद, वाळवा तालुक्यातील ऐतवडे बुद्रुक, शिराळा तालुक्यातील सागाव आणि कडेगाव तालुक्यातील शेळकबाव या गावांचा समावेश आहे.

# कृष्णा कारखान्याच्या चेअरमनपदी डॉ.सुरेश भोसले यांची निवड

## जे.डी.मोरे यांची व्हाईस चेअरमनपदी वर्णी; कार्यकर्त्यांचा जल्लोष

कराड,ता.९(प्रतिनिधी)-

**येथील यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी डॉ.सुरेश भोसले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तर रेठरे हरणाक्ष (ता.वाळवा) येथील संचालक जे.डी.मोरे यांची व्हाईस चेअरमनपदी वर्णी लागली आहे. या निवडीनंतर जयवंतराव भोसले सहकार पॅनलच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा करत, नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.**



रेठरे बुद्रुक : कृष्णा कारखान्याच्या चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल डॉ.सुरेश भोसले यांचा सत्कार करताना निवडणूक निर्णय अधिकारी सौ.अपर्णा यादव,बाजूस संचालक.

निवडणूक निर्णय अधिकारी सौ.अपर्णा यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या निवड प्रक्रियेवेळी चेअरमनपदासाठी डॉ. सुरेश भोसले यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. यासाठी कारखान्याचे माजी व्हा.चेअरमन तथा विद्यमान संचालक जगदीश जगताप हे सूचक; तर संचालक दयानंद पाटील अनुमोदक होते. तसेच व्हा.चेअरमनपदी जे.डी.मोरे यांनी दाखल केलेल्या अर्जासाठी संचालक सुनील पाटील हे सूचक; तर संचालक सत्यजीत पाटील हे अनुमोदक होते. यानंतर सर्वानुमते चेअरमनपदी डॉ.सुरेश भोसले व व्हा.चेअरमनपदी जे.डी.मोरे यांची निवड जाहीर करण्यात आली. सौ.अपर्णा यादव यांच्या हस्ते नूतन चेअरमन डॉ.सुरेश भोसले व व्हाईस चेअरमन जे. डी. मोरे यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी सहाय्यक निबंधक संजय जाधव,राहुल देशमुख, उर्मिला राजमाने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना डॉ. भोसले म्हणाले,कृष्णा कारखान्यात सभासदांनी सलग तिसऱ्यांदा संधी देत आमच्यावर मोठा विश्वास दाखविला आहे. येत्या ५ वर्षात अधिकाधिक ऊसदर देण्यासाठी आणि चांगल्या सोयीसुविधा पुरविण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. कृष्णा कारखान्याला राज्यातील पथदर्शी आदर्श कारखाना घडविण्याचा आमचा संकल्प असून, यासाठी सभासदांची आम्हाला निश्चित साथ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

याप्रसंगी संचालक जगदीश जगताप, लिंबाजी पाटील, दयानंद पाटील, धोंडिराम जाधव, आनंदा खबाले, अरविंद पाटील, बाजीराव थोरात,छबन कांबळे, दत्तात्रय देसाई, संभाजीराव पाटील,सत्यजीत पाटील, सुनील पाटील, बाळासो जगताप, संग्राम पाटील,बाबासो शिंदे, अविनाश खरात, बाजीराव निकम, सुजाता जाधव,सुनीता शेवाळे,एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर सी.एन.देशपांडे,मॅनेजिंग डायरेक्टर बाजीराव सुतार यांच्यासह कराड व वाळवा तालुक्यातील विविध मान्यवर, कार्यकर्ते व ऊस उत्पादक शेतकरी सभासद उपस्थित होते.



मिरज हायस्कूल येथे शालेय साहित्य वाटपप्रसंगी मान्यवर.

# मिरजेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

मिरज,ता.९(प्रतिनिधी)-

**भाजप सांगली शहर जिल्हा सरचिटणीस बाबासाहेब आळतेकर यांच्यातर्फे मिरजेत गरजू विद्यार्थ्यांना शालेय पुस्तके, वह्या आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. आळतेकर यांच्या कार्याचे भाजपचे ज्येष्ठ नेते मकरंद देशपांडे यांच्याकडून कौतुक करण्यात आले.**

शहरातील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित कार्यक्रमात गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम डॉ.विनोद परमशेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी डॉ.विकास पाटील, प्रभात हेटकाळे उपस्थित होते. मिरज हायस्कूलमध्ये इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना शालेय पुस्तके देण्यात आली. यावेळी नगरसेवक गणेश माळी, नगरसेवक निरंजन आवटी, नगरसेवक दयानंद खोत, मुख्याध्यापक राजेंद्र नागरगोजे उपस्थित होते.

# कळंबा कारागृहावर कैद्यांचा वाढता ताण

## सोलापूरहून १०६ कैद्यांची रवानगी; क्षमतेपेक्षा २४४ कैदी अधिक

## २६८ अधिकारी-अंमलदारांवर १,९४३ कैद्यांच्या सुरक्षेची जबाबदारी

कोल्हापूर,ता.९(प्रतिनिधी)-

**शासनाने राज्यातील दुय्यम कारागृहे टप्प्याटप्प्याने बंद करण्याच्या घेतलेल्या निर्णयानंतर विविध जिल्ह्यातील कैद्यांचे मध्यवर्ती कारागृहांमध्ये स्थलांतर सुरू झाले आहे.त्याचाच भाग म्हणून सोलापूर जिल्ह्यातील ३ दुय्यम कारागृहातील १०६ कैद्यांना कळंबा मध्यवर्ती कारागृहात हलविण्यात आले आहे. कळंबामध्ये आधीच क्षमतेपेक्षा जास्त कैदी आहेत. त्यामुळे याठिकाणी कैद्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.**

राज्य सरकारने एकूण ११६ दुय्यम कारागृहे कायमस्वरूपी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यापैकी ८० कारागृहे पूर्वीपासूनच बंद होती, तर कार्यरत असलेल्या ३६ कारागृहांतील कैद्यांना संबंधित मध्यवर्ती कारागृहांमध्ये हलविण्याची प्रक्रिया सुरू आहे. या प्रक्रियेत सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथून ५१, मोहोळ येथून ३० आणि सांगोला येथून २५ असे एकूण १०६ कैदी कळंबा मध्यवर्ती कारागृहात दाखल झाले आहेत.

कळंबा मध्यवर्ती कारागृहाची अधिकृत क्षमता १,६९९ कैद्यांची आहे. मात्र सध्या येथे १,९४३ कैदी असून क्षमतेपेक्षा २४४ कैदी



अधिक आहेत. त्यामुळे कारागृहातील व्यवस्थापन आणि सुरक्षा यंत्रणेवर अतिरिक्त जबाबदारी पडली आहे.

कारागृहात बरॅक, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि अन्य मूलभूत सुविधा उपलब्ध असल्याने निवास व्यवस्थेची मोठी अडचण निर्माण झालेली नसली, तरी वाढत्या कैदी संख्येमुळे सुरक्षेच्या दृष्टीने अधिक दक्षता घ्यावी लागत आहे.

''कळंबा मध्यवर्ती कारागृहात क्षमतेपेक्षा अधिक कैदी असले तरी आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत. आधुनिक सुरक्षा यंत्रणेमुळे कैद्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य होत आहे.''
**नागनाथ सावंत, कारागृह अधीक्षक,** कळंबा मध्यवर्ती कारागृह

**कळंबा कारागृहाची सद्यस्थिती**
एकूण क्षमता : १,६९९
प्रत्यक्ष कैदी : १,९४३
क्षमतेपेक्षा अधिक कैदी : २४४
नव्याने दाखल कैदी : १०६
कार्यरत अधिकारी व अंमलदार : २६८

सध्या कारागृहात २६८ अधिकारी व अंमलदार कार्यरत असून त्यांच्यावर तब्बल १,९४३ कैद्यांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी आहे.

कैद्यांकडून कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी कारागृह प्रशासनाकडून सतत देखरेख ठेवली जात असून आधुनिक सुरक्षा प्रणालीचाही वापर केला जात आहे.



# अणदूर तलाव शंभर टक्के भरला

## परिसरातील शेतकरी सुखावला

गगनबावडा,ता.९(प्रतिनिधी)-

**गगनबावडा तालुक्यातील आठवडाभर धुवांधार झालेल्या पावसामुळे अणदूर लघु पाटबंधारे तलाव पूर्ण क्षमतेने भरला आहे.तलाव भरल्यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांची शेतीच्या तसेच पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली आहे.**

जून महिन्यात पावसाने ओढ दिल्याने अणदूर लघु पाटबंधारे तलावाने तळ गाठला होता, त्यामुळे या परिसरातील २५ ते ३० गावातील शेतकऱ्यांना शेतीच्या पाण्याची चिंता वाटत होती, मात्र जुलैच्या पहिल्या आठवडाभर गगनबावडा तालुक्यात दमदार पावसाने हजेरी लावल्याने केवळ आठवडाभरातच अणदूर लघु पाटबंधारे तलाव १०० टक्के भरला आहे.यामुळे तलावाच्या पाण्यावर अवलंबून असणारे नागरिक व शेतकरी सुखावले आहेत. अणदूर तलाव पूर्ण क्षमतेने भरल्याने तसेच धरण क्षेत्र हे निषिद्ध क्षेत्र असल्याने पर्यटकांना तलाव परिसरात जाण्यास पाटबंधारे विभागाने बंदी केली आहे. यापुढील काळात या परिसरात मोठा पाऊस झाल्यास धरणाच्या पाणी पातळीत वाढ होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन कोल्हापूर पाटबंधारे विभाग (उत्तर), यांनी केले आहे.

# पावसाने ऊस भुईसपाट

## शेतकरी संकटात ;प्रशासनाने पंचनामे करण्याची मागणी

बीडशेड,ता.९(प्रतिनिधी)-

**करवीरच्या पश्चिम भागात पावसाने शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ केली आहे. प्रतिक्षेनंतर तालुक्यात दमदार पावसाने सुरुवात केल्याने अनेक भागांतील ऊस भुईसपाट झाला आहे. पुराच्या पाण्याने ऊस कुजण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाल्याने शासनाने पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.**



पावसाच्या एक महिन्याच्या प्रतिक्षेनंतर हातातोंडाशी आलेले पीक आडवे झाल्याने तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. उन्हाळ्यात पाण्याचा मोठा खंड पडल्यामुळे उसाची मुळे आधीच कमकुवत झाली होती, त्यात वादळी वारे, पाऊस सहन न झाल्याने शेतातील उभे ऊस जमिनीवर लोळले आहेत. भुईसपाट झालेल्या उसाला उंदीर आणि इतर किडींचा फटका बसण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी संकटात सापडणार आहे.ऊस जमिनीवर पडल्याने त्याची पुढील नैसर्गिक वाढ थांबते आणि वजनात घट होते. अशामुळे मोठा आर्थिक तोटा होणार आहे. आडवा झालेला ऊस तोडताना मजुरांना मोठा त्रास होतो, ज्यामुळे तोडणी खर्च वाढतो. याचाही फटका शेतकरी वर्गाला बसणार आहे. दरम्यान पुराच्या पाण्यामुळे ऊस पीके कुजण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे.कृषी विभागाने आणि प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून शासनाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यातून होत आहे.

# शिरोळ तालुक्यातील खरीपाला नवसंजीवनी

## दुबार पेरणीचे संकट टळले; नद्यांच्या वाढत्या पाणी पातळीने चिंता

जयसिंगपूर,ता.९(प्रतिनिधी)-

**राज्यात जून महिन्यात सरासरीच्या केवळ १३ टक्के पावसाची नोंद झाल्याने यंदाचा खरीप हंगाम धोक्यात आला होता. कडक उन्हाळ्यानंतर पावसाने पाठ फिरविल्याने आणि अल निनोच्या प्रभावामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली होती.**

शिरोळ तालुक्यात इतर जिल्ह्यांच्या तुलनेत कमी पाऊस झाला असला तरी चार प्रमुख नद्या आणि सात धरणांच्या जलसाठ्यामुळे येथील सिंचन व्यवस्थेला मोठा आधार मिळाला आहे. त्यामुळे ऊस, भाजीपाला आणि अन्य बागायती पिकांसाठी आवश्यक पाण्याची उपलब्धता मोठ्या प्रमाणात सुनिश्चित झाली



पावसामुळे सोयाबीन पिके डोलु लागले आहेत.

आहे.विशेषतःतालुक्यातील सर्वाधिक क्षेत्र व्यापलेल्या ऊस पिकाला या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. यंदाच्या हंगामाच्या सुरुवातीला निर्माण झालेली निराशा आता आशावादात बदलू लागली आहे.पावसाने योग्य वेळी दमदार हजेरी लावल्यामुळे खरीप हंगामावरील संकट मोठ्या प्रमाणात टळले आहे. सुमारे ३२ हजार हेक्टर बागायती क्षेत्र असलेल्या शिरोळमध्ये तब्बल २६ हजार हेक्टरवर ऊस आहे. पाण्याच्या अतिवापराने तालुक्यातील सुमारे १९ हजार एकर क्षेत्र हे क्षारपड झाले होते. त्यात आता बदल होताना दिसत आहे.क्षारपड जमीन पिकाऊखाली येत असून त्यासाठी अधिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. वाढलेला उष्मा जोखमीचा सापळा' ठरू लागला आहे. भाजीपाल्याची शेती बुडीत ठरत आहे. काही वेळा तर उत्पादन खर्चही निघत नसल्याने भाजीपाल्याची शेती बुडणारा बाजार ठरली आहे.त्यात यंदा कडक उन्हाळ्यानंतर पाऊस लांबल्याने दुहेरी संकट उभे होते.मात्र या आठवड्यात झालेल्या पावसाने शेतकऱ्यांना हात दिला. तसेच नैसर्गिक संकटा बरोबरच शेतकरी आज या संकटांशी दोन हात करताना सरकारचे धोरणात्मक अपयश उघड आहे.

आजवरच्या धोरणांनी शिरोळला काय दिले? हा आता संशोधनाचा विषय ठरला आहे., 'बोलाची कढी आणि बोलाचा भात' या युक्तीप्रमाणे सगळे सुरू आहे. या आठवड्यात पावसाने हात दिला असला तरी त्याचे रूपांतर महापुरात होऊ नये अशी अपेक्षा शेतकऱ्यांची आहे. मात्र २००५,२००६ आणि २०१९ या सालात आलेल्या महापुरानंतर पूरनियंत्रणाची ठोस यंत्रणा नाही. हे उघड झाले आहे. पावसाने खरोखरच हात दिल्याने आता शिरोळ तालुक्यात माळभागाबरोबरच बागायती क्षेत्रात पेरणीला गती येणार आहे.बागायती क्षेत्रात सोयाबीन संकरित ज्वारी कडधान्य आदी पिकांची पेरणी झाली असली तरी पावसाने ओढ दिल्याने दुबार पेरणीचे संकट होते ते आता टळले असून त्या पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे.

# दानोळीत नवीन पाण्याच्या टाकीला गळती

## हजारो लिटर पाणी वाया;ग्रामस्थांमधून तीव्र नाराजी

दानोळी,ता.९(वार्ताहर)-

**गावातील सुमारे साडेसहा लाख लिटर क्षमतेच्या नवीन पाण्याच्या टाकीला मोठ्या प्रमाणात गळती लागल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पाणीटंचाईच्या काळात एकीकडे नागरिकांना पाण्यासाठी धावपळ करावी लागत असताना, दुसरीकडे टाकीतून मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.**

टाकीच्या बाहेरील भिंतीवरून सतत पाणी झिरपत असल्याने दररोज हजारो लिटर पाणी वाया जात आहे. त्यामुळे



**सूचना देऊनही दुर्लक्ष?**
ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, नवीन पाण्याच्या टाकीला गळती लागल्याची माहिती वेळोवेळी ग्रामपंचायत प्रशासनाला देण्यात आली होती. मात्र, याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्याने आज गळतीचे प्रमाण वाढले असून मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होत आहे.

बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, भविष्यात टाकीला कोणताही धोका निर्माण होऊ नये म्हणून तातडीने तांत्रिक पाहणी करून दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. पाणी टंचाईच्या काळात सार्वजनिक निधीतून उभारलेल्या टाकीतूनच पाण्याची गळती होणे ही गंभीर बाब आहे.संबंधित विभागाने ही गळती रोखून पाण्याचा अपव्यय थांबवावा अशी मागणी जोर धरत आहे.

पाणीटंचाईच्या काळात हजारो लिटर पाणी वाया जात आहे. प्रशासनाने तातडीने दुरुस्ती करून गळती थांबवावी.अन्यथा भविष्यात मोठा धोका निर्माण होऊ शकतो. सद्य परिस्थितीला पाणी तर वाया जातच आहे.भविष्यात मोठी पडझड झाली तर पाणी पुरवठा ठप्प होईल.तसेच मोठा अपघात होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.
- डॉ. विजयकुमार साळोखे, दानोळी

# राजर्षि शाहू शेतकरी समविचारी आघाडीला विजयी करा-आम.पाटील

कोल्हापूर,ता.९(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर जिल्ह्याची अर्थवाहिनी समजल्या जाणाऱ्या 'गोकुळ' दूध संघाच्या निवडणूक रणधुमाळीत सध्या 'गोकुळचा बाप कोण?' या मुद्द्यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. संस्थेचे माजी अध्यक्ष अरुण डोंगळे यांनी केलेल्या एका वक्तव्याचा समाचार घेत काँग्रेस नेते आणि आमदार सतेज पाटील यांनी डोंगळेंवर जोरदार पलटवार केला आहे.**



'पहाटेपासून गोठ्यात काम करून घाम गाळणारा कष्टकरी दूध उत्पादक शेतकरी हाच या गोकुळचा खरा मालक आणि बाप आहे,'अशा शब्दांत सतेज पाटील यांनी अरुण डोंगळेंना चोख प्रत्युत्तर दिले.

दूध उत्पादकांचा सन्मान, दुधाला जास्तीत-जास्त दर मिळवून देणे, गोकुळ दूध संघ टिकविणे हाच माझा प्रयत्न आहे.त्यामुळे या निवडणुकीमध्ये गट-तट तसेच पक्ष बाजूला ठेवून आपण राजर्षि शाहू शेतकरी समविचारी आघाडीला सहकार्य आणि आशीर्वाद द्यावेत,गोकुळच्या विकासाची जबाबदारी मी तसेच आमच्या समविचारी आघाडीचे उमेदवार निश्चितपणे पार पाडू, अशी ग्वाही देऊन तुम्ही आणि आम्ही सर्वजण मिळून गोकुळ टिकविण्यासाठी आणि वाढविण्यासाठी कटिबध्द राहण्याचे आवाहन आम.पाटील यांनी केले आहे.



कबनूर ग्रा.प.कार्यालयात गावठाण हद्दवाढ लेआउट प्रस्ताव प्रकरणी आयोजित बैठकीप्रसंगी बोलताना जि.प.सदस्य कुमार कांबळे,शेजारी सरपंच सुलोचना कट्टी,व इतर मान्यवर.

# कबनूरमध्ये गावठाण हद्दवाढ लेआउट प्रस्ताव प्रकरणी बैठक

कबनूर,ता.९(वार्ताहर)-

**येथील ग्रामपंचायत सभागृहात आमदार राहुल आवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद सदस्य कुमार कांबळे यांनी गायरान जागेवर अतिक्रमण केलेल्या लाभार्थ्यांसाठी गावठाण हद्दवाढ लेआउट प्रस्ताव व कायमस्वरूपी सातबारा मिळणेसाठी बैठक घेतली.**

यावेळी विस्तारअधिकारी श्री.कटारे, ग्रामविकास अधिकारी संजय बर्डे, पंचायत समिती सदस्य प्रकाश पाटील, पंचायत समिती सदस्या गौराबाई काडाप्पा, सरपंच सुलोचना कट्टी, उपसरपंच सुधीर लिगाडे, ग्रामपंचायत सदस्य व सदस्या आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सकारात्मक चर्चा झाली.अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर प्रस्ताव करून पाठविण्यात येईल अशी ग्वाही दिली.

# ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे हळदी, कांडगाव रस्त्याची प्रचंड दुरावस्था

हळदी,ता.९(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर-परिते-गडहिंग्लज राज्यमार्गावरील कामातील त्रुटी अद्यापही कायम असून संबंधित ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे हळदी व कांडगाव रस्त्यावर खड्डेच खड्डे पडले आहेत.त्यामुळे वाहन चालकांना रस्ता कुठे आणि खड्डा कुठे, याचा अंदाज येत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. नाल्यांची सफाई न करणे आणि ड्रेनेजची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याने ऐन पावसाळयात पावसाचे पाणी थेट रस्त्यावर साचत आहे.**

**रस्त्यावरील खड्डयात पावसाचे पाणी साठल्याने अपघाताचा धोका**

राज्यमार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतरही अनेक ठिकाणी उणिवा कायम आहेत. रस्त्यालगत खोदलेली चर तसेच पडून असल्याने पावसाच्या पाण्याचा निचरा होत नाही. अनेक ठिकाणी पाणी रस्त्यावरूनच वाहत असून काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात साचत आहे. परिणामी हळदी व कांडगाव परिसरातील राज्यमार्ग पावसाळ्यात धोकादायक बनला आहे.

वारंवार तक्रारी करूनही संबंधित ठेकेदाराने त्रुटी दूर करण्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागानेही या गंभीर प्रकाराकडे कानाडोळा केल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी नाल्यांची तातडीने सफाई करून ड्रेनेजमधील त्रुटी दूर कराव्यात, अशी जोरदार मागणी वाहनचालक व ग्रामस्थांतून होत आहे.

# विनाअनुदानित शिक्षकांचा वनवास संपणार कधी?

धामोड,ता.९(संजय गुरव)-

**राज्यातील विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षकांनी अनुदानासाठी व वेतनासाठी तब्बल २६ वर्षे प्रदीर्घ संघर्ष केला आहे. या काळात शिक्षकांनी मुंबईतील आझाद मैदान, संचालक, उपसंचालक कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयांवर तब्बल ३१० आंदोलने आणि विविध प्रकारची धरणे आंदोलने केली आहेत.**

शासनाच्या चुकीच्या धोरणांमुळे आणि वेळोवेळी काढलेल्या जाचक अटींमुळे अनेक शाळांना विनाअनुदानित म्हणून राहावे लागले, परिणामी शिक्षकांना विनावेतन काम करावे लागले. शिक्षक संघटनांनी वेळोवेळी मूक मोर्चे,धरणे आंदोलने,अर्धनग्न आंदोलने आणि आमरण उपोषणांचे मार्ग अवलंबले. २०, ४०,६०, किंवा ८० टक्के अनुदानावर असलेल्या शाळांसह सर्व पात्र शाळांना कायद्यानुसार १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अपात्र तसेच त्रुटी पुर्ण केलेल्या शाळा व शिक्षकांना मागील टप्प्यासह त्वरित वेतनावर आणण्यात यावे,



**२६ वर्षात तब्बल ३१० आंदोलनानंतरही मागण्या प्रलंबित**

सर्व शिक्षकांसाठी जुनी, सुधारीत पेन्शन योजना मिळावी, निवृत्तीचे वय ५८ वरून ६० करावे,मेडिकल प्रतिपूर्ती योजना लागू करावी अशी मागणी लावून धरण्यात आली आहे. या मुख्य मागण्यांसाठी हा लढा उभारण्यात आला आहे.

या शिक्षकांनी मुंबईतील आझाद मैदान येथे पावसातही अनेक दिवस ठिय्या मांडला आहे. तरीही अनेकदा शासन पातळीवर केवळ आश्वासनेच मिळाल्याने शिक्षकांमध्ये प्रचंड संताप दिसून आला आहे. आता तर ६ जुलै पर्यंत निर्णय घ्या अन्यथा शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी व अनुदानासाठी स्वतः उपोषणाला बसण्याचा किंवा रस्त्यावर उतरण्याचा इशारा आमदार रोहित पवार यांनी दिला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुद्धा त्यांनी अनुदानाबाबत निवेदन दिले आहे. दरम्यान शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सरकार सकारात्मक निर्णय घेईल,असे आश्वासन दिले आहे.

दरम्यान शिक्षक समन्वय संघाच्या आवाहनानुसार महाराष्ट्रातील अंशतः अनुदानित शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिक्षक समन्वय संघाने ७ व ८ जुलै २०२६ रोजी राज्यातील सर्व अंशतः अनुदानित शाळा बंद ठेवण्याचा निर्णय जाहीर करून या निर्णयानुसार राज्यभरातील हजारो शाळांमधील अध्यापनाचे कामकाज दोन दिवस बंद ठेवून आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी आझाद मैदानावर उपस्थित होते.

# कासारवाडीत शेकडो वृक्षांची कत्तल

टोप,ता.९(प्रतिनिधी)-

**कासारवाडी येथील वनपरिक्षेत्रातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पर्यावरण नियमांना धाब्यावर बसवत या भागात शेकडो वृक्षांची बेकायदेशीर कत्तल करून या वनक्षेत्रातून तब्बल ५०० मीटर लांबीचा विनापरवाना रस्ता करण्यासाठी वृक्षतोड करण्यात आली आहे.**



हा प्रकार ग्रामपंचायत कासारवाडी व वन व्यवस्थापन समिती यांनी वन विभागाच्या निदर्शनास आणून दिला. यावर तत्काळ कारवाई करून येथे वृक्षारोपण करण्याची मागणी ग्रामपंचायतीने केली आहे.याबाबतीत बोलताना कासारवाडीचे सरपंच अच्युत खोत यांनी गावचे गायरान संरक्षीत ठेवण्यासाठी वनविभागाकडे वर्ग केले पण वनविभाग पण जंगलाचे संरक्षण करु शकत नसेल तर जंगल कोण वाचवणार असा सवाल उपस्थित केला.

# शिक्षण धोरणाविरोधात शिक्षकांचा एल्गार

## जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा; हजारोंचा सहभाग



सातारा, ता.९ (प्रतिनिधी)–

..............................

**राज्य व केंद्र शासनाच्या शिक्षण धोरणाविरोधात जिल्ह्यातील हजारो शिक्षकांनी गुरुवारी शाळा बंद ठेवत जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. शिक्षकांना शिक्षक म्हणूनच काम करू द्या, टीईटीची सक्ती रद्द करा, अशैक्षणिक कामांचा बोजा हटवा, जुनी पेन्शन लागू करा अशा घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणून गेला.**

मोर्चेकऱ्यांनी टीईटीची सक्ती तातडीने रद्द करण्याची मागणी करत, आजपर्यंत स्पर्धा परीक्षा आणि नियमानुसार नियुक्त झालेल्या शिक्षकांवर पुन्हा पात्रतेची अट लादणे हा विश्वासघात असल्याचे म्हटले आहे. तसेच एसआयआर, बीएलओसह विविध अशैक्षणिक कामांमध्ये शिक्षकांना अडकविल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत असल्याचा आरोप करण्यात आला.

बीएलओसारखी कामे शिक्षकांकडून काढून ती सुशिक्षित बेरोजगार युवकांना द्यावीत, सर्व शिक्षकांना विनाअट जुनी पेन्शन योजना लागू करावी, पदोन्नतीसाठी टीईटी उत्तीर्ण असण्याची अट रद्द करून सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नती द्यावी, संचमान्यतेचे अन्यायकारक धोरण मागे घ्यावे आणि शिक्षकांना कायमस्वरूपी अशैक्षणिक कामांतून मुक्त करावे, अशा प्रमुख मागण्या आंदोलनातून करण्यात आल्या. निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांनी निवेदन स्वीकारले.आंदोलनात उदय शिंदे, सिध्देश्वर पुस्तके, विश्वंभर रणनवरे, महेंद्र जानुगडे, गणेश जाधव, दीपक भुजबळ, किरण यादव, राजेश शिंगाडे, उदय भंडारे, शरद यादव, सुलभा सस्ते, सुनिता देवकर, जयश्री कदम, मच्छिंद्र ढमाळ, रितेश गायकवाड, नवनाथ जाधव, विशाल कणसे, विजय शिर्के, समीर बागवान यांच्यासह सातारा जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटनांचे हजारो शिक्षक सहभागी झाले होते.

# संकेश्वरच्या शंकराचार्य मठात सहस्त्रचंडी देवी महायागास प्रारंभ

संकेश्वर,ता.९ (प्रतिनिधी)–

..............................

**श्री शंकराचार्य संस्थानमठ, संकेश्वर–करवीर यांच्या पावन छत्राखाली, मठाच्या दैदिप्यमान इतिहासात प्रथमच सुवर्णाक्षरांनी लिहिला जाणारा अभूतपूर्व श्री सहस्रचंडी देवी महायागला पंच दिनात्मक कार्यक्रमांनी प्रारंभ झाला.**

गुरूवारी प्रांत स्मरण,प्रधान संकल्प गणपती पूजन,पुण्याह वाचन,मातृका पूजन नांदी श्राध्द, शंकराचार्य पूजन अग्निस्थापन,मंडप देवता स्थापन, प्रधान देवता आवाहिक पूजन,कर्पूर आरती, ग्रह होम, सप्तशती पाठ यजन महाआरती आदी कार्यक्रम झाले.

विश्व कल्याण व उत्तम पर्जनवृष्टीसाठी श्री शंकराचार्य संस्थान मठात सहस्त्रचंडी देवी महायाग केला जात असल्याचे मठाचे श्री सच्चिदानंद अभिनव विद्यानृसिंह भारती महास्वामी यांनी सांगितले. या अलौकिक आणि आध्यात्मिक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी संकेश्वरातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. मंगलमयी महोत्सवाची सुरुवात ८ जुलैपासून झाली असून ज्येष्ठ वद्य त्रयोदशी, १२ जुलैपर्यंत चालणार आहे.



**श्री शंकराचार्य मठात सहस्त्रचंडी देवी महायागास प्रारंभ करताना वैदिक मंडळी.**

महोत्सवात नाशिक, पुणे, तुळजापूर आणि धाराशिव येथील मूर्धन्य व वेदशास्त्रसंपन्न घनपाठी वैदिक मंडळी सहभागी झाले असून,दिव्य मंत्रोच्चाराने संपूर्ण परिसर न्हाऊन निघणार आहे.सोहळ्यादरम्यान नित्यकृत्य, मंत्रजागर, अष्टावधान सेवा, शयन सेवा, कुलदेवता पूजा, कुंकुमार्चन, कुमारी व सुवासिनी पूजा, ब्राह्मण पूजा आणि पवित्र श्री सहस्रचंडी होम यांसारखे धार्मिक विधी शास्त्रोक्त पद्धतीने संपन्न होणार आहेत.भव्य महायज्ञाचे प्रधान ऋत्विज म्हणून वेदशास्त्रांचे गाढे अभ्यासक वेदमूर्ती धर्मभूषण नागेशशास्त्री वि.अंबुलगे गुरुजी हे मुख्य पौरोहित्य भूषवणार आहेत.



**करमजाई पूर्ण क्षमतेने भरला असून तलावाच्या सांडव्यातून पाणी कोसळत आहे.(छाया : संतोष बांदिवडेकर)**

# करमजाई तलाव तुडुंब

## मोरणा धरणात ७० टक्के पाणीसाठा

शिराळा,ता.९ (प्रतिनिधी)–

..............................

**तालुक्यातील लघु पाटबंधारे विभागाचा वाकुर्डे बुद्रुक (करमजाई) तलाव पूर्ण क्षमतेने भरला असून सांडव्यातून पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे. दरम्यान, मोरणा धरणातील पाणीसाठाही झपाट्याने वाढून ७० टक्क्यांवर पोहोचल्याने शेती आणि पिण्याच्या पाण्याची चिंता दूर झाली आहे.**

मे महिन्यापासून मोरणा धरणासह परिसरातील तलावांतील पाणीसाठा वेगाने घटल्याने शेतकरी आणि नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण होते. वाकुर्डे योजनेतून मोरणा धरणात पाणी सोडण्यात आले होते; मात्र पुरेशा पावसाअभावी साठ्यात अपेक्षित वाढ झाली नव्हती. आता दमदार पावसामुळे करमजाई तलाव तुडुंब भरल्याने त्याचा थेट लाभ मोरणा धरणाला होत आहे. सध्याची पाण्याची आवक कायम राहिल्यास मोरणा धरणही येत्या काही दिवसांत पूर्ण क्षमतेने भरण्याची शक्यता आहे.

# डीकेटीईच्या टेक्स्टाईल डिप्लोमाचा उच्चांकी निकाल

इचलकरंजी, ता. ९ –

........................

**महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या उन्हाळी परीक्षा २०२५–२६ मध्ये डीकेटीईच्या डिप्लोमा टेक्स्टाईल विभागाचा उच्चांकी निकाल लागला.**

टेक्स्टाईल डिप्लोमाच्या तिन्ही विभागातून दर्शन जितेंद्र श्रीश्रीमाल हा ९०.६५ टक्के गुणांसह डिप्लोमा विभागात सर्वप्रथम आला आहे. संस्थेतील ३५ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणीमध्ये तर ५५ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. डिप्लोमा इन टेक्स्टाईल मॅन्युफॅक्चरर्स विभागातील प्रथम वर्षात दर्शन श्रीश्रीमाल (९०.६५ टक्के), यश चितलांगिया (८७.६५ टक्के), अंजली पाटील (८२.८३ टक्के), द्वितीय वर्षात आर्यन जाधव (८७.३९ टक्के), साकिब नदाफ (८६.०४ टक्के), प्रांजल मगदूम (८१.३७ टक्के), तृतीय वर्षात– शंतनू केस्तीकर (८९.४५ टक्के), राजवर्धन काकडे (८८.२८ टक्के), अरुष दिंडे (८५.५९ टक्के) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाला.

संस्थेतील डिप्लोमा इन टेक्स्टाईल टेक्नॉलॉजी विभागात प्रथम वर्षात दृष्टी उमारनिया( ८३.७७ टक्के), मुजामिल मिस्त्री( ८१ टक्के), समकित चंगेडिया(७७.४७ टक्के), द्वितीय वर्षात प्रकाश घट्टे(८६.९६ टक्के), मलिकरेहान कलावंत (८३.९९ टक्के) क्षितीज भांडवले (८२.८४ टक्के) तृतीय वर्षात रेहान नायकवडी–(९०.३७ टक्के), शुभांगी कुंभार (९० टक्के), श्रेय गजमल (८९.७८ टक्के) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला.

तसेच डिप्लोमा इन फॅशन अँण्ड क्लोदिंग टेक्नॉलॉजी विभागात प्रथम वर्षात आदिती साखरे(८२.५९ टक्के), मदिया बोरकर(८०.३० टक्के), सुपर्णा पाटील(७८.१२ टक्के), द्वितीय वर्षात प्रतिभा मगदुम (८४.५६ टक्के), ईश्वरी रंगापुरे (८१.७५ टक्के), पूजा चौधरी (७८.०५ टक्के), तृतीय वर्षात आरती जाधव (८९.३३ टक्के), पूर्वा जाधव (८८.६७ टक्के), श्रेया सरबी (८३.११ टक्के) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, मानद सचिव डॉ.सपना आवाडे, कार्यकारी संचालक रवी आवाडे, सर्व ट्रस्टी यांचे प्रोत्साहन तर डॉ.एल.एस.आडमुठे, डॉ. यु.जे.पाटील, प्रा.आर.के. वळसंग तसेच सर्व प्राध्यापक यांचे मार्गदर्शन मिळाले.



# श्री भैरवनाथ डीएमएलटी डिप्लोमा व नर्सिंग कॉलेजचा १०० टक्के निकाल

इचलकरंजी,ता.९–

....................

**श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (मुंबई) यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या उन्हाळी २०२६ परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यात कोरोची येथील श्री भैरवनाथ डीएमएलटी डिप्लोमा आणि बीएससी सीएलसी पदवीच्या तृतीय वर्षाचा निकाल १०० टक्के लागला असल्याची माहिती प्राचार्या वैशाली पाटील यांनी दिली.**

यामध्ये जुलेखा पिरजादे, सिमा आवळे, पायल बाबर, अर्पिता हराळे यांनी घवघवीत यश संपादन केले.यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्थेच्या अध्यक्षा डॉ.शुभांगी पाटील (माई) यांच्या हस्ते सत्कार झाला.विशेष म्हणजे मुलींना संस्थेमार्फत १०० टक्के फ्री शिक्षण दिले जाते. प्राचार्या वैशाली पाटील म्हणाल्या, १०० टक्के निकालामुळे संस्थेतील अनेक विद्यार्थ्यांना शासकीय लॅबमध्ये संधी मिळाली.काही विद्यार्थ्यांनी स्वत:ची लॅब सुरु केली आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (नाशिक) चाही निकाल ९० टक्के लागला आहे,अशी माहिती संस्थेचे संस्थापक डॉ.प्रदीप पाटील यांनी दिली.

# ‘श्री दत्त शिरोळ’ मध्ये रोलर पूजन

## यंदा १४ लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट

शिरोळ,ता.९ –

................

**येथील श्री दत्त सहकारी साखर कारखान्याच्या २०२६–२७ च्या गळीत हंगामातील मिल रोलर पूजन कारखान्याचे मार्गदर्शक संचालक, गणपतराव पाटील यांच्या हस्ते झाले. आगामी गळीत हंगामासाठी १४ लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित केले असल्याची माहिती गणपतराव पाटील यांनी दिली.**

कार्यक्षेत्रातील सर्व ऊस तोडणी व वाहतूकदारांनी मोठ्या प्रमाणात करार करावेत. तसेच ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांनी आपला संपूर्ण ऊस आपल्याच कारखान्याकडे पाठवून सहकार्य करावे. गाळप हंगामासाठी सर्व यंत्रसामग्रीची देखभाल–दुरुस्ती वेगाने सुरू आहे. ऊस तोडणी व वाहतूक कंत्राटदारांशी करार करण्याची, तसेच त्यांना उचल रक्कम देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.



यावेळी कारखान्याचे चेअरमन रघुनाथ पाटील, व्हा. चेअरमन शरदचंद्र पाठक, संचालक अनिलकुमार यादव, बाबासो पाटील, रणजित कदम, इंद्रजित पाटील, विश्वनाथ माने, शेखर पाटील, बसगोंडा पाटील, अँड. प्रमोद पाटील, निजामसो पाटील, अमर यादव, दरगु माने गावडे, सिदगोंडा पाटील, सुरेश कांबळे, महेंद्र बागे, विजय सूर्यवंशी, प्रदिप बनगे, बाळासाहेब पाटील–हालसवडे, रावसाहेब नाईक, मंजूर मेस्त्री, कार्यकारी संचालक संजीव देसाई, सचिव अशोक शिंदे, वर्क्स मॅनेजर एस. ए. चौगुले, प्रोडक्शन मॅनेजर एम. एस. जाधव यांच्यासह सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

# भिंत कोसळून महिलेचा मृत्यू

कागल,ता.९( प्रतिनिधी)–

............................



**घराची भिंत व छप्पर कोसळून झालेल्या दुर्घटनेत महिलेचा मृत्यू झाला. ही घटना रात्री ११ वाजण्याच्या सुमारास कागल येथे घडली. उर्मिला उदय कुलकर्णी, (वय ३८,रा. लोहार गल्ली,कागल) असे त्या महिलेचे नाव आहे. या दुर्दैवी घटनेत त्यांचा बारा वर्षाचा मुलगा सुदैवाने बचावला.**

येथील लोहार गल्लीत कुलकर्णी कुटुंब राहते. दगड मातीचे असलेल्या घराची भिंत रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास कोसळली. त्यात उर्मिला कुलकर्णी या मातीच्या ढिगाऱ्या खाली सापडल्या. त्यांना तात्काळ कागल ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले. ज्योती कुलकर्णी यांनी कागल पोलीसात वर्दी दिली.



# डॉक्टरांवरील हल्ल्याचा माई असो.च्यावतीने निषेध

इचलकरंजी,ता.९–

....................

**डोंबिवलीतील शास्त्रीनगर हॉस्पिटलमध्ये डॉक्टर्स व परिचारिका यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध करत व या प्रकरणातील आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन मेडिकल असोसिएशन ऑफ इचलकरंजी (माई)च्यावतीने प्रांताधिकारी यांना देण्यात आले. दरम्यान, सदर निवेदन माजी मंत्री प्रकाश आवाडे यांना देण्यात आले.**

निवेदनात, दोन दिवसांपूर्वी डोंबिवली येथील शास्त्रीनगर हॉस्पिटलमधील ड्युटीवर असणारे डॉ. वैभव साळुंखे, डॉ. सृष्टी बाविस्कर व परिचारिका यांच्यावर नगरसेवक रमेश म्हात्रे व त्यांच्या समर्थकांनी हल्ला केला. हा प्रकार अत्यंत निंदनीय व संतापजनक आहे. रुग्णालयातील कर्तव्यदक्ष डॉक्टर व परिचारिकांना मारहाण करणाऱ्यांवर वैद्यकीय सेवा व्यक्ती संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करून तात्काळ कारवाई करण्यात यावी. शिवाय शासकीय रुग्णालयामध्ये कायमस्वरूपी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात यावा. डॉक्टर व कर्मचाऱ्यांना कोणताही राजकीय व बाहेरील दबाव न बाळगता निर्भयपणे रुग्णसेवा करण्यात येईल, असे वातावरण निर्माण करण्यात यावे. राज्यातील आरोग्य सेवेचा कणा असलेल्या डॉक्टर, वैद्यकीय कर्मचाऱ्यांवर असे प्राणघातक हल्ले झाल्यास त्यांचे मानसिक खच्चीकरण होईल. त्यामुळे या प्रकरणातील संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. खाजगी किंवा शासकीय रुग्णालयात अशा घटना घडू नयेत याबाबतही शासनाने योग्य ती खबरदारी घ्यावी, असेही निवेदनात म्हटले आहे. शिष्टमंडळात जी.पी.असोसिएशन, डेंटल असोसिएशन, एमएजीएमओ असोसिएशनचे पदाधिकारी, शहर व परिसरातील डॉक्टर्स उपस्थित होते.

# आजाराला कंटाळून युवकाची आत्महत्या

हुपरी, ता.९(वार्ताहर)

**गुडघ्याच्या शस्त्रक्रियेनंतर होणाऱ्या असह्य त्रासाला कंटाळून यळगुड येथील एका २५ वर्षीय युवकाने गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. विनायक शशिकांत पाटील (वय २५, रा. यळगुड) असे मृत तरूणाचे नाव आहे.**

या घटनेची नोंद हुपरी पोलीस ठाण्यात झाली आहे. सुमारे एक वर्षापूर्वी विनायकच्या गुडघ्याचे ऑपरेशन झाले होते. मात्र, त्यानंतर त्याला गुडघ्याचा प्रचंड त्रास होत होता. या सततच्या त्रासाला आणि वेदनांना कंटाळून त्याने गुरुवारी दि.९ रोजी राहत्या घरी गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली.


## महावितरण — ई–निविदा सूचना

म. रा. वि. वि. कं. मर्या. विभागीय कार्यालय इचलकरंजी अंतर्गत कार्यक्षेत्रातील O & M उपविभागासाठी २४*७ टॉवर लॅडर वाहन (प्रकार: टाटा Ace किंवा तत्सम शक्यतो इलेक्ट्रिकवर चालणारे ) ०३ वर्षांच्या कालावधीसाठी भाडेतत्त्वावर घेण्यासाठी पात्र कंत्राटदारांकडून ई–निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई–निविदा म.रा.वि.वि.कं. मर्या. च्या https://etender.mahadiscom.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर निविदा दि. १०.०७.२०२६ ते दि. २०.०७.२०२६ या कालावधीत उपलब्ध राहतील.

| अ. क्र. | निविदा क्र. | विभागाचे नाव | ई–निविदा रक्कम (लाखांमध्ये) Excl. GST | निविदा शुल्क | इसारा (EMD) रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/ICH/T-11/2026-27 | इचलकरंजी | १६.२० लाख | रु. १,१८०/– | रु. १६,२००/– |

कार्यालयीन संपर्क क्र. : ७८७५९३२०७०

पी.आर.ओ.क्र. PRO/KOPZ/११२/२०२६–२७ कार्यकारी अभियंता, इचलकरंजी

## गजानन सह. गृहनिर्माण संस्था मर्यादित, तारदाळ.

### ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

### नोटीस

(फक्त सभासदांकरीता)

सर्व सभासदांना कळविणेत येते की, संस्थेची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २६–७–२०२६ इ. रोजी सकाळी ठिक १०.३० वा. संस्थेच्या असलेल्या जी.के. नगर सांस्कृतिक भवन, जी.के. नगर, तारदाळ येथे बोलाविण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

* सभेपुढील विषय *

१) मागील ३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.
२) दि. ३१–३–२०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा ताळेबंद, नफा–तोटा पत्रक वाचून मंजूर करणे व डेडस्टॉक, घसारा मंजूर करणे.
३) सन २०२५–२०२६ सालात बजेटपेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
४) सन २०२५–२०२६ चा शासकीय लेखापरिक्षण अहवाल स्विकारून दोष दुरूस्ती मंजूर करणे.
५) सन २०२६–२०२७ या सालासाठी संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
६) सन २०२६–२०२७ या सालासाठी वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
७) ग्रामपंचायत तारदाळ यांचे संस्थेस आलेले दि.२२–०२–२०२६ इ. रोजीचे सार्वजनिक आरोग्य उपकेंद्र उभारणीकरीता ४ गुंठे संस्थेची जागा देणेबाबत आलेल्या अर्जावरती विचार करणे.
८) संस्थेचे ऑफीस नुतनीकरण करणेकामी येणाऱ्या अंदाजित खर्चास मान्यता देणेबाबत.
९) मे. अध्यक्षसो यांच्या परवानगीने आयत्या वेळच्या प्रश्नांचा विचार करणे.

मे. कळावे,

स्थळ : तारदाळ मा. संचालक मंडळाच्या आदेशानुसार

दिनांक : ०५/०७/२०२६

श्री. सुनिल गजानन कांबळे — चेअरमन

श्री. रणजित शामराव माने — व्हा. चेअरमन

श्री. विनायक रामचंद्र माळी — सेक्रेटरी

-------------* सूचना *-------------

१) गणपूर्तीअभावी सभा तहकूब झालेस ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल. त्यास गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही. २) सभासदांना वरील विषयासंदर्भात काही माहिती हवी असलेस त्यांनी दि. १९–०७– २०२६ इ. रोजीपर्यंत संस्थेच्या ऑफीसमध्ये संस्थेशी संपर्क साधून लेखी द्यावे. ३) जमा–खर्च व विषयासंबंधी सर्व माहिती संस्थेच्या ऑफीसमध्ये पहावयास मिळेल. ४) संस्थेच्या सभासदांनी सभासद वार्षिक वर्गणी व बिगरशेतसारा संस्थेकडे जमा करून सहकार्य करावे. ५) मयत सभासदांच्या वारसांनी संस्थेशी संपर्क साधून वारस नोंद करणेची आहे. ६) रिकाम्या प्लॉटधारकांनी प्लॉटची स्वच्छता ठेऊन सार्वजनिक आरोग्यहित जपावे.

## श्री आदिनाथ को–ऑप. बँक लि; इचलकरंजी

### ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येत आहे की, **बँकेची सन २०२५ – २०२६ सालाची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २५/०७/२०२६ रोजी सकाळी ठिक १०.३० वा. मराठा मंडळ सांस्कृतिक भवन, डी मार्ट शेजारी, तांबे माळ, इचलकरंजी.** येथे खालील विषयांवर विचार करणेसाठी बोलाविणेत आलेली आहे, तरी सदर सभेस आपण वेळेवर उपस्थित रहावे. ही नम्र विनंती.

* सभेपुढील विषय *

१. दि. ०६ जुलै २०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृतांत वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०२६ अखेरचा वैधानिक लेखापरिक्षक यांचेकडून आलेला ताळेबंद, नफा–तोटा पत्रक स्विकारणे व मंजुरी देणे.
३. सन २०२५–२०२६ सालाच्या मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या निव्वळ नफा विभागणीस मंजुरी देणे.
४. सन २०२५–२०२६ सालात अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२६–२०२७ साला करिता सुचविलेल्या उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
५. सन २०२५–२०२६ या सालाचा वैधानिक हिशोब तपासणीस यांचेकडुन आलेला तपासणी अहवाल वाचून नोंद घेणे. तसेच सन २०२४–२५ चा सहकार खात्याकडे पाठविलेल्या दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.
६. सन २०२६–२०२७ या वर्षासाठी मा. संचालक मंडळाने अंतर्गत तपासणीसांची केलेली नेमणुक व त्यांचे मानधन याची नोंद घेवुन त्यास मंजुरी देणे.
७. मे.नाईक पटेल अॅन्ड कंपनी, कोल्हापूर या फर्मची सन २०२६–२०२७ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून झालेल्या फेर नेमणुकीबाबत नोंद घेवुन त्यास मंजुरी देणे.
८. बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
९. सन २०२६–२०२७ सालाकरीता बाहेरुन कर्जे व ठेव उभारणीची मर्यादा ठरविणे.
१० महाराष्ट्र शासनाच्या नागरी सहकारी बँकासाठी एकरकमी कर्ज परतफेड योजना व बँकेच्या आपसात तडजोड धोरणामध्ये समाविष्ट केलेल्या थकीत कर्ज खात्यांच्या माहितीची नोंद घेणे.
११. मा. अध्यक्षसो यांचे परवानगीने सभेपुढे ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

ठिकाण : इचलकरंजी.

दिनांक : ०९/०७/२०२६ संचालक मंडळाचे आदेशावरुन

श्री. जयकुमार अजितकुमार उपाध्ये (मुख्य कार्यकारी अधिकारी)

श्री. बाळासाहेब पारीसा चौगुले (चेअरमन)

-------------* महत्वाची सूचना *-------------

१. गणसंख्येअभावी तहकुब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरेल व त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता असणार नाही. २. सन्माननीय सभासदांनी सभेपुढे लेखी सुचना व प्रश्न ठेवावयाचे असतील तर बँकेच्या प्रधान कार्यालयात दि. २०/०७/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशा रितीने पाठवावेत. ३. दि. ३१/०३/२०२६ अखेर वैधानिक लेखापरीक्षण झालेले ताळेबंद व नफा तोटा पत्रके बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करणेत आलेली आहेत. ४. आपल्या पत्त्यामध्ये बदल झाला असल्यास सभासदांनी आपला बदललेला पत्ता व मोबाईल नंबर प्रधान कार्यालयाकडे त्वरीत कळवावा. ५. सर्व सभासद व ग्राहकांना नम्र आवाहन आहे की, आपल्या बँकेमार्फत मोबाईल बँकिग, युपीआय व क्युआर कोड सेवा पुरविल्या जात आहेत. सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा. ६. क्रियाशिल सभासद होणेसाठी सभासदाची शेअर्स रक्कम रु.१०००/– इतकी असणे आवश्यक आहे. अपुर्ण शेअर्स रक्कम असणाऱ्या सभासदांनी त्वरीत रक्कम भरुन पुर्तता करावी. ७. रिझर्व्ह बँकेच्या आदेशाप्रमाणे बँकेच्या सर्व ग्राहक, खातेदार व सभासदांनी आपला ग्राहक ओळखा (KYC) ची पूर्तता करणे सक्तीचे केले आहे.तरी सर्व ग्राहक, खातेदार व सभासदांनी सबंधित कागदपत्रांची पुर्तता करणे बाबतची विनंती आहे.





# फिफा अध्यक्षांच्या अडचणी वाढल्या

## आयओसीच्या एथिक्स कमिटीकडे तक्रार

नवी दिल्ली,ता.९–

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हस्तक्षेपानंतर अमेरिकन फुटबॉलपटू फोलारिन बालोगुनवरील वर्ल्ड कप बंदी हटवण्याच्या निर्णयामुळे फिफा अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांच्या अडचणी वाढल्या आहेत. लंडनस्थित मानवाधिकार संघटना फेअरस्क्वेअरने त्यांच्याविरोधात आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीच्या एथिक्स कमिटीकडे तक्रार दाखल केली आहे.**

इन्फँटिनो यांनी ऑलिंपिक चार्टरच्या राजकीय निष्पक्षतेच्या नियमाचे उल्लंघन केले आहे. आयओसी सदस्य असल्याने त्यांना राजकीय तटस्थतेचे नियम लागू होतात. फेअरस्क्वेअरने डिसेंबर २०२५ मध्येही त्यांची तक्रार फिफाच्या एथिक्स कमिटीकडे केली होती. तेव्हाही त्यांच्यावर राजकीय निष्पक्षतेच्या उल्लंघनाचे आरोप लावण्यात आले होते. मात्र, त्या प्रकरणात कोणतेही अधिकृत अपडेट देण्यात आले नाही.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ६ जुलै रोजी त्यांच्या फोननंतर फिफाने अमेरिकन स्ट्रायकर फोलारिन बालोगुनवरील एका सामन्याची बंदी हटवली. बालोगुनला मागील नॉकआउट सामन्यात रेड कार्ड मिळाले होते, त्यामुळे त्याला बेल्जियमविरुद्धच्या राउंड ऑफ-१६ सामन्यातून बाहेर राहावे लागले असते. परंतु फिफाच्या शिस्तपालन समितीने त्याची बंदी हटवून त्याला खेळण्याची परवानगी दिली. यामुळेही अमेरिकेला बेल्जियमविरुद्ध ४-१ ने पराभव पत्करावा लागला.

**तक्रार मिळाल्यास चौकशी करू**

आयओसी अध्यक्ष किर्स्टी कोव्हेंट्री म्हणाल्या की, या प्रकरणात औपचारिक तक्रार मिळाल्यास एथिक्स कमिशन याची चौकशी करेल. त्या म्हणाल्या की, आयओसी संपूर्ण घडामोडींवर लक्ष ठेवून आहे, कारण अमेरिका २०२८ लॉस एंजेलिस ऑलिम्पिकचेही यजमानपद भूषवणार आहे.

# ३२ वर्षांनंतर ६ युरोपियन संघ क्वार्टर फायनलमध्ये

न्यूयॉर्क,ता.९–

**२०२६ फिफा वर्ल्ड कपमध्ये ३२ वर्षांनंतर अंतिम-८ मध्ये ६ युरोपियन (युएफा) संघांनी आपले स्थान निश्चित केले आहे. वर्ल्ड कपच्या इतिहासात असे घडण्याची ही केवळ चौथी वेळ आहे. यापूर्वी, फक्त १९९४ (७ संघ), १९५८ (७ संघ) आणि १९३४ (८ संघ) मध्येच उपांत्यपूर्व फेरीत ६ पेक्षा जास्त युरोपियन संघ पोहोचले होते.यावेळी उपांत्यपूर्व फेरीत जे ८ संघ विजेतेपदाच्या लढतीसाठी सज्ज आहेत, ते अर्जेंटिना, बेल्जियम, इंग्लंड, फ्रान्स, मोरोक्को, नॉर्वे, स्पेन आणि स्वित्झर्लंड आहेत.**

हा सामना स्पेनच्या विक्रमी बचावाचा आणि बेल्जियमच्या अनुभवी आक्रमणाचा संघर्ष आहे. स्पेनने या वर्ल्ड कपमध्ये आतापर्यंत एकही गोल खाल्ला नाही. मार्क कुकुरेला, आयमेरिक लापोर्टे, पाउ कुबार्सी, पेड्रो पोरो आणि गोलकीपर उनाई सिमोन हे स्पेनच्या बचावाची ताकद आहेत.बेल्जियम मागील दोन सामन्यांत ९ गोल करून शानदार फॉर्ममध्ये आहे. ३४ वर्षीय थिबो कोर्टुआ, ३३ वर्षीय रोमेलु लुकाकू, ३५ वर्षीय केविन डि ब्रुएन आणि ३१ वर्षीय लिएंड्रो ट्रॉसार्ड हे संघाची ताकद आहेत. स्पेनचा आफ्रिकन वंशाचा स्टार लामिने यमालची भूमिकाही महत्त्वाची राहील. नॉर्वेचा अर्लिंग हालेंड आणि



इंग्लंडचा हॅरी केन हे स्पर्धेतील सर्वात धोकादायक स्ट्रायकर्सपैकी आहेत. हालेंडला रोखण्याची जबाबदारी मार्क गुएही, एजरी कोन्सा आणि गोलकीपर जॉर्डन पिकफोर्ड यांच्यावर असेल.इंग्लंड पुन्हा एकदा मजबूत इराद्यांनी उपांत्यपूर्व फेरीत आहे. प्रशिक्षक थॉमस ट्यूशेल यांचे संघ निवडीचे कठोर आणि वादग्रस्त निर्णय आतापर्यंत योग्य ठरले आहेत. तथापि, नॉर्वेचा अनपेक्षित विजय इंग्लंडचे स्वप्न भंग करू शकतो.

मेस्सी सध्याच्या विश्वचषकातील सर्वाधिक गोल करणारा खेळाडू आहे. त्याने ८ गोल केले आहेत. डिफेंडिंग चॅम्पियन अर्जेंटिनाचा सामना स्वित्झर्लंडशी होईल. जर अर्जेंटिनाने हा विश्वचषक जिंकला, तर मेस्सी कर्णधार म्हणून दोनदा विश्वचषक ट्रॉफी उचलणारा फुटबॉल इतिहासातील पहिला खेळाडू बनेल. यासोबतच अर्जेंटिना सलग दोन पुरुष विश्वचषक जिंकणारा दुसरा देश बनेल. ब्राझीलने हा पराक्रम यापूर्वीच केला आहे.दुसरीकडे, आधुनिक फुटबॉलच्या मोठ्या महासत्तांमध्ये समाविष्ट नसतानाही, स्वित्झर्लंड १९३४, १९३८, १९५४ आणि २०२६ मध्ये उपांत्यपूर्व फेरीपर्यंत पोहोचला आहे. मात्र, संघाने कधीही उपांत्य फेरीत स्थान मिळवले नाही.



# एमबाप्पे मेस्सीला मागे टाकणार?

## क्वार्टरफायनलमध्ये फ्रान्सचा मोरोक्कोशी सामना

बोस्टन,ता.९–

**किलियन एमबाप्पेच्या फ्रान्सचा सामना जायंट किलर्स मोरोक्कोशी होईल. फ्रान्सचा स्ट्रायकर एमबाप्पेने या स्पर्धेत ७ गोल केले आहेत. मेस्सी ८ गोलसह गोल्डन बूटच्या शर्यतीत आघाडीवर आहे. जर एमबाप्पेने या सामन्यात गोल केला, तर तो मेस्सीला मागे टाकेल.**

फ्रान्स आणि मोरोक्को यांच्यात ६ आंतरराष्ट्रीय सामने खेळले गेले आहेत. यामध्ये फ्रान्सचे एकतर्फी वर्चस्व राहिले आहे. फ्रान्सने ४ सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे. मोरोक्कोला फक्त १ मध्ये विजय मिळाला आहे. १ सामना अनिर्णित राहिला आहे.फिफा विश्वचषकाच्या इतिहासात दोन्ही संघ दुसऱ्यांदा आमनेसामने येतील. यापूर्वी २०२२ च्या विश्वचषक उपांत्य फेरीत फ्रान्सने मोरोक्कोचा २-० ने पराभव केला होता. मोरोक्को या पराभवाचा बदला घेऊ इच्छितो.

फ्रान्सचा संघ या स्पर्धेत अजिंक्य राहिला आहे. संघाने आपले सर्व ५ सामने जिंकले आहेत. ग्रुप स्टेजमध्ये फ्रान्सने नॉर्वेला ४-१, इराकला ३-० आणि सेनेगलला ३-१ ने हरवले.राउंड ऑफ ३२ मध्ये संघाचा सामना स्वीडनशी झाला. यात संघाने ३-० ने विजय मिळवला. नंतर राउंड ऑफ १६ मध्ये पॅराग्वेला १-० ने हरवून उपांत्यपूर्व फेरीत पोहोचली.

फ्रान्सचा संघ एमबाप्पेकडून आक्रमक फिनिशिंगची अपेक्षा करेल. त्याच्यावर मोरोक्कोचा बचाव भेदण्याची जबाबदारी असेल. दुसरीकडे, मोरोक्को स्टार डिफेंडर आणि कर्णधार अचराफ हकिमीच्या जोरावर फ्रान्सचा हल्ला रोखण्यासाठी मैदानात उतरेल. मात्र, सामन्यात फ्रान्सचे पारडे जड राहण्याची शक्यता आहे.



# अभिषेक शर्मा प्रकरणात न्यायालयाकडून समन्स

नवी दिल्ली, ता.९ –

**भारतीय क्रिकेटपटू अभिषेक शर्माच्या प्रतिमेचा आणि व्यक्तिमत्त्वाचा कथित गैरवापर करणाऱ्या विविध आक्षेपार्ह पोस्ट आणि लिंक्स हटवण्यासाठी अंतरिम आदेश दिला जाईल,असे सांगत दिल्ली उच्च न्यायालयाने या प्रकरणात समन्सही जारी केले आहे.**

शर्माच्या वकिलाने यूआरएलच्या माहितीसह एक अतिरिक्त प्रतिज्ञापत्र दाखल केले. काही पोस्ट हटवण्यात आल्या आहेत, परंतु क्रिकेटपटूविरुद्ध अपमानास्पद भाषा असलेल्या दोन पोस्ट फेसबुक आणि इंस्टाग्रामवर अजूनही आहेत. मेझॉन आणि फ्लिपकार्टने अभिषेक शर्माच्या परवानगीशिवाय त्याच्या प्रतिमेचा व्यावसायिक वापर केला आहे आणि संबंधित मजकूर अद्याप हटवण्यात आलेला नाही.सुनावणीदरम्यान, मेटा आणि मेझॉनने सांगितले की, ते त्यांच्या प्लॅटफॉर्मवरून अभिषेक शर्माच्या प्रतिमेला हानी पोहोचवणाऱ्या पोस्ट काढून टाकतील. या प्रकरणाची पुढील सुनावणी १७ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

# लॉर्ड्सवर १४२ वर्षांनी आजपासून महिला कसोटी

## दुखापतीमुळे प्रतिका रावल संघाबाहेर; महिला भारतीय संघाला इतिहास रचण्याची संधी

मुंबई,ता.९–

**महिला भारत संघ टी-२० वर्ल्ड कप २०२६ मध्ये साखळी फेरीतच बाहेर पडला होता. या निराशजनक कामगिरीनंतर आता इतिहास रचण्याची संधी आहे. क्रिकेटची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लॉर्ड्स मैदानावर १४२ वर्षानंतर पहिल्यांदाच महिला कसोटी सामन्याचे आयोजन करण्यात आले आहे. १९३४ मध्ये पहिला महिला कसोटी सामना खेळला गेला होता. उद्या १० जुलैला हा सामना होणार आहे. परंतु या सामन्याआधी स्टार खेळाडू प्रतिका रावल दुखापतीमुळे सामना खेळू शकणार नाही. याबाबत कोच अमोल मुझुमदार यांनी माहिती दिली.**



भारत आणि इंग्लंडमधील कसोटी सामना १० ते १३ जुलै दरम्यान होणार असून दुपारी ३.३० वाजता सामन्याला सुरुवात होणार आहे. या सामन्यांची जवळपास ३० हजारांपेक्षा अधिक तिकिटे आधीच विकली गेली आहेत. भारत आणि इंग्लंड कसोटी मालिकेआधी दुखापतीमुळे बाहेर पडलेल्या प्रतिका रावल हिच्या जागी प्रिया पुनिया हिची निवड केली गेली आहे. आता तिला उद्या होणाऱ्या सामन्यामध्ये प्लेइंग ११ मध्ये संधी मिळते की नाही हे पाहावे लागणार आहे. महिलांचा कसोटी सामना चार दिवसांचा असतो. आतापर्यंत दोनच पाच दिवसांचे कसोटी सामने झाले आहेत.

महिला भारतीय संघाचा आणि महिला इंग्लंड संघाचा रेकॉर्ड पाहता आतापर्यंत दोन्ही संघांमध्ये १५ सामने झाले असून भारताने ३ तर इंग्लंडने एकच सामना जिंकला असून ९ सामने अनिर्णित राहिल आहेत. विशेष म्हणजे इंग्लंड संघ भारताला त्यांच्या मैदानावर एकदाही पराभूत करू शकलेला नाही. ९ सामन्यांमध्ये भारताने दोनवेळा पराभूत केले आहे तर सात सामने ड्रॉ झाले आहेत.



# नोस्कोव्हा -कोस्त्युक पहिल्यांदाच उपांत्य फेरीत

लंडन,ता.९–

**चेक टेनिसपटू लिंडा नोस्कोव्हाने विम्बल्डन स्पर्धेत इतिहास रचला. २१ व्या वर्षी लंडनमध्ये पहिल्यांदाच उपांत्य फेरीत धडक मारणारी ती सर्वात युवती टेनिसपटू ठरली आहे. लिंडाने एलिस मर्टेन्सचा ६-३, ७-५ असा सरळ सेटमध्ये पराभव केला. २०१० मध्ये पेट्रा क्विटोव्हानंतर विम्बल्डनच्या उपांत्य फेरीत प्रवेश करणारी ती सर्वात युवती टेनिसपटू ठरली आहे.**

मर्टेन्सवरील या महत्त्वपूर्ण विजयानंतर, नवव्या मानांकित लिंडाने दोन वेळा विम्बल्डन विजेती ठरलेल्या क्विटोव्हाच्या पावलावर पाऊल टाकण्याची इच्छा व्यक्त केली. ती म्हणाली की, मला तिच्या पावलावर पाऊल ठेवायला नक्कीच आवडेल. जर निकालही तसाच लागणार असेल, तर त्यापेक्षा आनंदाची गोष्ट दुसरी कोणतीही नसेल.दुसरीकडे, २०२४ च्या स्पर्धेची अंतिम फेरी गाठणाऱ्या जस्मिन पाओलिनीचा पराभव करून मार्ता कोस्त्युकनेही उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले. महिलांच्या गटातील एकमेव माजी अंतिम फेरी गाठणाऱ्या पाओलिनीला आणखी एका चेक टेनिसपटूने स्पर्धेतून बाहेरचा रस्ता दाखवला. यामुळे २००० सालापासून विम्बल्डनची उपांत्य फेरी गाठणाऱ्या चेक महिला टेनिसपटूंची एकूण संख्या आठ झाली आहे, जी इतर कोणत्याही देशापेक्षा जास्त आहे. कोस्त्युकने पाओलिनीचा ६-३, ६-२ असा सरळ सेटमध्ये पराभव केला.

कोस्त्युक म्हणाली की, देवाचे आभार की माझ्या प्रशिक्षकाने मला काल इथे फिरवले. इथले प्रवेशद्वार आणि आतील सर्व काही पाहून मी थक्क झाले होते. नऊ वर्षांपूर्वी मी प्रेक्षक म्हणून या कोर्टवर आले होते आणि रॉजर फेडररचा खेळ पाहिला होता. तो अनुभव खूप खास होता.

# आयसीसीची वेस्ट इंडिज संघावर दंडात्मक कारवाई

नवी दिल्ली, ता.९ –

**अँटिग्वा आणि बार्बुडा येथील सेंट जॉर्जमधील नॉर्थ साउंड येथे श्रीलंकेविरुध्दच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात धीम्या गतीने षटके टाकल्याबद्दल वेस्ट इंडिज संघाला त्यांच्या सामना शुल्काच्या १० टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. याव्यतिरिक्त, आयसीसी जागतिक कसोटी चॅम्पियनशिपचे दोन गुणही वजा करण्यात आले आहेत.**

आयसीसीने दोन डब्ल्यूटीसी गुण गमावण्याव्यतिरिक्त, वेस्ट इंडिजच्या क्रिकेटपटूंना त्यांच्या सामना शुल्काच्या १० टक्के दंडही ठोठावण्यात आला आहे. वेळेची सवलत विचारात घेता, वेस्ट इंडिजने लक्ष्यापेक्षा दोन षटके कमी टाकल्याचे आढळल्यानंतर, अमिरात आयसीसी एलिट पॅनेल ऑफ मॅच रेफरीजचे जवागल श्रीनाथ यांनी हा दंड ठोठावला. खेळाडू आणि खेळाडूंच्या सहाय्यक कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या आयसीसी आचारसंहितेच्या कलम २.२२ नुसार, जे किमान षटकांच्या दराच्या उल्लंघनाशी संबंधित आहे, जर संघ निर्धारित वेळेत प्रत्येक षटक टाकण्यात अयशस्वी ठरला, तर क्रिकेटपटूंना त्यांच्या सामना शुल्काच्या पाच टक्के दंड आकारला जातो आणि कमाल दंड सामना शुल्काच्या ५० टक्क्यांपर्यंत मर्यादित आहे.दोन गुण गमावूनही, वेस्ट इंडिज संघ डब्ल्यूटीसी २०२५-२७ गुणतालिकेत आठव्या स्थानावर कायम आहे, परंतु त्यांची गुणांची टक्केवारी (पीसीटी) १६.६७ वरून १५.०० पर्यंत घसरली आहे. दुसरी कसोटी अनिर्णित राहिल्याने वेस्ट इंडिजने मालिका १-० ने जिंकली.वेस्ट इंडिजने चार वर्षांहून अधिक काळानंतर मायदेशात कसोटी मालिका जिंकली आहे.

# ब्रिटनचा आर्थर फेरी पहिल्यांदाच उपांत्य फेरीत

## विम्बल्डनमध्ये कोबोलीला नमवले

लंडन,ता.९–

**ब्रिटनचा वाईल्डकार्ड आर्थर फेरीने विम्बल्डन २०२६ मध्ये अनपेक्षित विजय मिळवत पहिल्यांदाच ग्रँड स्लॅमच्या उपांत्य फेरीत पोहोचला. ११४ व्या क्रमांकावरील फेरीने इटलीच्या ९ व्या सीड फ्लावियो कोबोलीला ६-४, ७-६ (७-४), ६-० अशा सरळ सेटमध्ये हरवले.**

२३ वर्षीय फेरी विम्बल्डन पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत पोहोचणारा केवळ दुसरा वाईल्डकार्ड खेळाडू ठरला आहे. त्याच्या आधी २००१ मध्ये गोरान इव्हानिसेविचने ही कामगिरी केली होती. त्याने त्याच वर्षी विजेतेपदही पटकावले होते. फेरीचा उपांत्य फेरीत फ्रेंच ओपन विजेता आणि दुसरी सीड अलेक्झांडर झ्वेरेव्हशी सामना होईल.फेरीने पहिला सेट ६-४ ने जिंकला. त्यानंतर दुसऱ्या सेटचा टाय-ब्रेक ७-४ ने आपल्या नावावर केला.नंतर तिसरा सेट ६-० ने जिंकून सामना आपल्या नावावर केला. हा फेरीच्या कारकिर्दीतील पहिला ग्रँड स्लॅम उपांत्यपूर्व सामना होता.फेरी ओपन एरामध्ये विम्बल्डन पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत पोहोचणारा पाचवा ब्रिटिश खेळाडू ठरला. त्याच्या आधी अँडी मरे (७ वेळा), टिम हेनमन (४ वेळा), रॉजर टेलर (२ वेळा) आणि कॅमेरॉन नॉरी (१ वेळा) उपांत्य फेरीत पोहोचले होते.



# साई किशोर ग्लॉस्टरशायरकडून काउंटी क्रिकेटमध्ये पुनरागमन करणार

लंडन,ता.९–


**भारताचा डावखुरा फिरकी गोलंदाज आर. साई किशोर पुन्हा एकदा इंग्लंडमध्ये काउंटी क्रिकेट खेळणार आहे. या २९ वर्षीय खेळाडूने २०२६ काउंटी चॅम्पियनशिप हंगामातील शेवटच्या सहा सामन्यांसाठी ग्लॉस्टरशायरसोबत करार केला आहे. तो २० ऑगस्टपासून चेल्टनहॅम येथे वॉर्सेस्टरशायरविरुद्ध होणाऱ्या सामन्यासाठी संघात सामील होईल.**

त्यानंतर तो ग्लॉस्टरशायरचे प्रतिनिधित्व करत ब्रिस्टल येथे डर्बीशायर आणि मिडलसेक्सविरुद्ध, तसेच डरहॅम, लँकेशायर आणि केंटविरुद्ध परदेशातील सामने खेळेल. साई किशोरने तामिळनाडूसाठी ५४ प्रथम-श्रेणी सामन्यांमध्ये २२३ बळी घेतले आहेत, ज्यात १४ वेळा पाच बळी आणि ११ वेळा चार बळींचा समावेश आहे.



यापूर्वी तो २०२५ मध्ये सरे संघाकडून काउंटी चॅम्पियनशिपमध्ये खेळला होता, जिथे त्याने डरहॅमविरुद्धच्या विजयादरम्यान स्पर्धेतील आपला पहिला पाच बळींचा टप्पा गाठला होता.

ग्लॉस्टरशायरचे मुख्य प्रशिक्षक जॉन लुईस म्हणाले, साई किशोर एक अनुभवी आणि सिद्ध खेळाडू आहे. जो आमच्या संघाला लक्षणीयरीत्या मजबूत करेल. काउंटी चॅम्पियनशिपच्या अंतिम सहा सामन्यांमध्ये चांगली कामगिरी करण्यासाठी क्लब पूर्णपणे कटिबद्ध आहे.या टप्प्यात एक परदेशी फिरकी गोलंदाज संघावर किती प्रभाव टाकू शकतो हे पाहणे मनोरंजक असेल. हंगामाच्या या टप्प्यावर इंग्लंडमधील खेळपट्ट्या साधारणपणे फिरकी गोलंदाजीसाठी अनुकूल असतात. आम्हाला आशा आहे की, साई किशोर संघासाठी महत्त्वपूर्ण योगदान देईल आणि एक सकारात्मक ठसा उमटवेल.



# रोनाल्डोच्या पोस्टने निवृत्तीच्या चर्चेला उधाण

नवी दिल्ली,ता.९–

**स्पेनविरुध्दच्या पराभवानंतर पोर्तुगालचे फिफा वर्ल्ड कपमधील आव्हान संपुष्टात आले. या पराभवानंतर ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधील भविष्याबाबत तर्कवितर्क लावले जात असतानाच, रोनाल्डोने इन्स्टाग्रामवर भविष्याबाबत कोणताही थेट संकेत न देता आपल्या संपूर्ण संघाचा एक फोटो शेअर केला. या फोटोसोबत त्याने पोर्तुगाल फॉरएव्हर अशी पोस्ट केली आहे. सामन्यानंतर रोनाल्डो म्हणाला की, हा माझा शेवटचा वर्ल्ड कप असला, तरी पोर्तुगालच्या जर्सीमधील माझ्या भविष्याबाबत मी कोणताही घाईघाईने निर्णय घेणार नाही.**

रोनाल्डोची फिफा वर्ल्ड कप कारकीर्द २७ सामने आणि अवघ्या ११ गोल्ससह संपली, जी त्याच्या क्लब फुटबॉलमधील कामगिरी आणि महानतेच्या तुलनेत थोडी फिकी मानली जाईल. या स्पर्धेत खेळण्यापूर्वी त्याच्यावर अनेक प्रश्न उपस्थित केले जात होते, परंतु वैयक्तिक पातळीवर त्याने या मोसमात ५ सामन्यांत ३ गोल करत चांगली कामगिरी केली. मात्र, त्याच्या शेवटच्या सामन्यात त्याच्या नावावर एक नकोसा विक्रम नोंदवला गेला. त्याने या वर्ल्ड कपमध्ये सहकाऱ्यांसाठी एकही संधी निर्माण न करता तब्बल १७ शॉट्स मारले, जे कोणत्याही खेळाडूकडून झालेले सर्वाधिक शॉट्स आहेत.

सहा वेगवेगळ्या फिफा वर्ल्ड कप स्पर्धांमध्ये गोल करणारा रोनाल्डो हा जगातील पहिला खेळाडू बनला आहे. यासह त्याने प्रमुख स्पर्धांमधील (फिफा वर्ल्ड कप आणि युरो चॅम्पियनशिप) आपला सलग १० सामन्यांचा गोलचा दुष्काळ संपवला. अखेर, कोलंबियाविरुद्ध गोलशून्य बरोबरी साधत पोर्तुगालने आपला ग्रुप स्टेजचा प्रवास संपवला होता.